# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. १३/११/२००३

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरूवार दिनांक १३/११/२००३ रोजी सभा सुचना क्र. २२ दि. ०७/११/२००३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस रॉड्रीक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | सभापती |
| २) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| ३) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ४) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ५) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| ६) | श्री. नितीन गोपीनाथ ठाकूर | सदस्य |
| ७) | श्री. दिनेश द. नलावडे | सदस्य |
| ८) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सदस्य |
| ९) | श्री. पाटील अशोक बळवंत | सदस्य |
| १०) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | सदस्य |
| ११) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| १२) | श्री. जोजफ जॉन घोन्सालवीस | सदस्य |
| १३) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |

### गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. पाटील मोहन मधुकर | सदस्य |
| २) | श्री. आसिफ गुलाब शेख | सदस्य |

### रजेचे अर्ज आलेले सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग, आपणा सर्वा चे स्वागत करून आजच्या सभेच्या कामकाजाला प्र. सचिवांनी सुरूवात करावी.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १६५ चे वाचन केले.)

**अशोक पाटील :-**

पान न. १२ वर सभा बोलावयाची होती ती बोलावण्यात आली का?

**प्र. सचिव :-**

सभा बोलावण्यात आली होती.

**प्रकरण क्र. १६५ :-**

दिनांक ३०/८/२००३ ची तहकुब सभा दिनांक ३/१०/२००३ रोजीचे मा. स्थायी समितीचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १४५ :-**

दिनांक ३०/८/२००३ ची तहकुब सभा दिनांक ३/१०/२००३ रोजीचे मा. स्थायी समितीच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. अनंत रा. पाटील.** **अनुमोदन :- श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १६६ चे वाचन केले.)

**अनंत पाटील :-**

अध्यक्ष महोदय, आपला जो विषय आहे. ह्याच्यात ठराव करण्यात आला आणि जो अठरा नंबरचा ठराव आहे प्रकरण २१ ह्यांच्यामध्ये काही लोकांना भुईभाडे आकारणी केलेली आहे ती भरमसाठ आहे. आकारणी करतेवेळी नमूद केले आहे की, मार्केटच्या अंतर्गत काही गाळे असतील त्याकरिता पाण्याची आणि विजेची व्यवस्था केलेली आहे. म्हणून भाडेवाढ करण्याचे ठरविले आहे. परंतु बाहेर बसणारी सामसन्य माणसे आहेत. रोजंदारीप्रमाणे ती माणसे असतात त्यांच्यावर अन्याय झालेला आहे. ग्रामपंचायतचे वार्षिक भाडे त्यावेळेचे रु. २४०/- होते. ते भाडे तुम्ही जवळ जवळ रु. ७५००/- वार्षिक आकारणार आहात. त्यामध्ये वीस टक्के ते पस्तीस टक्के वाढ केलेली आहे. त्याच्यावरती जो अन्याय झाला आहे तो अन्याय दूर होण्यासाठी या ठिकाणी शहानिशा होणे गरजेचे आहे आणि या ठरावात राई गावाचा कुठेही उल्लेख नाही.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय, स्थायी समितीमध्ये हा ठराव झाला आणि पहिल्यांदा मा. महासभेत झाला होता की भुईभाडे आहे ते आपण वाढवून घेतले पाहिजे होते. मा. महासभेत येउन परत काय भाडे लावायचे याबाबत प्रस्ताव परत स्थायी समितीमध्ये आला आणि सगळयांनी ह्याच्यात विचार करून वीस रूपये रोज जे बाजाराचे ठेकेदार घेतो तो ऑफीशियली दहा रुपये घेतो आणि दहा रूपये तो असेच घेतो.

**मा. सभापती :-**

दहा रूपयेच घेतले जातात.

**धनराज अग्रवाल :-**

दहा रूपये बोलतात आणि वीस रूपये घेतले जातात. आणि वीस रूपयाच्या हिशोबाने महिन्याचे सहाशे रूपये होते. आपण त्यांना पाणी, लाईट, मोफत देतो म्हणून आपण सहाशे रूपये लावले होते. त्याप्रमाणे आपल्याला आजपर्यंत किती भाडे मिळाले आहे. ते भुईभाडे कोणी दिले कोणी दिले नाही त्याचा रिपोर्ट आहे का?

**मा. सभापती :-**

खांबित किती वसुली झाली आहे. भुईभाडे दिले का नाही दिले.

**दिपक खांबित :-**

दर ठरवायचे काम आमच्या विभागामार्फत होते. आणि वसुली करण्याचे काम कर विभागाचे आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त साो.) :-**

कर विभाग भुईभाडे वसुली होते का नाही?

**विजय पाटील :-**

भुईभाडयाची वसुली होत असते पण जो स्थायी समितीने ठराव केलेला आहे. त्या अनुषंगाने आम्ही मटन आणि मासळी विक्रेत्यांना बिले पाठवली आहेत. त्यापैकी फक्त मटन विक्रत्यांनी पैसे भरलेले आहे. व मासळी विक्रेत्यांनी कोणीही पैसे भरलेले नाही.

**धनराज अग्रवाल :-**

आपण जे भुईभाडे लावले त्यांना मार्केटचा ठेका ज्या ठेकेदाराने घेतला आहे. तो परत वसुली करतो त्याची तुमच्याकडे काय माहिती आहे.

**विजय पाटील :-**

ज्यांना आपण बाजार लिलाव दिलेला आहे असे ठेकेदार मासळी विक्रत्यांकडून वसुली करतात.

**धनराज अग्रवाल :-**

आपली मालकीची जागा आहे त्याच्यातून बाजार वसुली करू शकत नाही असा ठराव स्थायी समितीमध्ये झालेला आहे. त्याच्यावर तुम्ही काय ॲक्शन घेता. आपण एका वस्तुचे दोनदा भाडे वसुली करू शकतो का?

**विजय पाटील :-**

नाही करू शकत.

**धनराज अग्रवाल :-**

मग आपण त्यांना का बोलत नाही. तुमचे हे भाडे लावलेले आहे आणि बाजार लिलाव ठेकेदार कसे वसुल करतो. हे बघा मासळीवाले सभापती महोदयांकडे आले होते आणि सांगितले होते हे जे पैसे आहेत आणि परत ठेकेदार आमच्याकडून पैसे घेतो.आपण देखील तिथे उभे होता. आपण त्यांच्यावर काय ॲक्शन घेतली का?

**विजय पाटील :-**

बाजार ठेकेदार आहेत त्यांना आम्ही पत्र देतो जिथे मासळी विक्रेते मार्केटमध्ये आहेत तिथे वसुली करू नयेत.

**धनराज अग्रवाल :-**

आपल्याकडे किती प्रॉप्रटी आहेत.

**विजय पाटील :-**

भाईंदर पश्चिममध्ये मोर्वा, खारी गाव, उत्तन, गोडदेव या जागा आहेत.

**धनराज अग्रवाल :-**

सगळयांना भाडे लावले आहे का? एकतर आपण महानगरपालिकेच्या समोर दुकान बांधून दिले आहे. त्यांचे भाडे फिक्स झाले का?

**विजय पाटील :-**

कोर्टामध्ये असल्यामुळे आपण त्यांना भाडे आकारलेले नाही.

**धनराज अग्रवाल :-**

कोर्टामध्ये आपण गेलो त्याचे कारण काय? माझ्या माहितीप्रमाणे कोणीतरी बळजबरीने एका माणसाने त्याच्यावर कब्जा केलेला आहे. आणि आपण त्याच्या विरूद्ध केस केलेली आहे. आणि आपले वकील त्याच्या विरूद्ध कोर्टामध्ये भांडत आहेत की, आपण त्यांना तेथून परत काढले पाहिजे. टॅक्स लावायला तुम्हाला नाईक साहेबांनी सांगितले असेल की सगळयांना टॅक्स लावा. तुम्ही त्या गाळयाला ते बळजबरीने घुसले आहे त्याला टॅक्स लावले का?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

सभापती महोदय, यामध्ये महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, पुर्वी जे भाडेकरू ग्रामपंचायत काळापासून होते. त्यांना पर्यायी जागा देण्यासाठी महानगरपालिकेपुढे जे शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधले. त्यामध्ये ती लोक हायकोर्टात गेली होती. आणि हायकोर्टाने ऑर्डर दिली की, महापालिकेने अटीशर्ती ठरवून त्या पद्धतीने त्यांना द्यावे. त्यानंतर महापालिकेने अटीशर्ती ठरवून मा. महासभेने मंजूरी दिली की, एक लाख रूपये डिपोझिट आणि एकवीस रूपये स्वेअर फीट याप्रमाणे भाडे लावावे. अशी मा. महासभेने मंजूरी दिल्यानंतर आम्ही त्यांना कळविले की, एक लाख रूपये डिपोझिट आणि एकवीस रूपये स्वेअर फीट प्रमाणे भाडे भरा. आणि तसे अग्रीमेंट करून द्या. मा. महासभेच्या ठरावाप्रमाणे त्यांना आम्ही कळविले. कळविल्यानंतर कुणीही त्याला प्रतिसाद न देता ते कोर्टात गेले, आम्ही कोर्टात गेलो नाही. ते कोर्टात गेले की आम्हाला जे भुईभाडे होते तेच भुईभाडे आपण आम्हाला येथे आकारावे. त्याबाबत वाद कोर्टात चालू आहे.

**धनराज अग्रवाल :-**

जो बळजबरीने घुसलेला माणूस आहे तो कोर्टात गेला की, आपण कोर्टात गेलो. ती रूम खाली करायची आहे का, आपल्याला त्याला द्यायची आहे. असे आहे का?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

तो त्या गाळयात शिरला ही वस्तुस्थिती आहे.

**धनराज अग्रवाल :-**

त्या माणसाला आपण टॅक्स पावती दिली पाहिजे का? तो माणूस शिरला आहे त्याला खाली करायचे आहे म्हणून आपले वकील कोर्टात भांडतोय. आणि त्या माणसाला आपण टॅक्स लावून दिले पाहिजे का? तो पहिला शिरला आहे आणि टॅक्स पावती आता दिलेली आहे.

**विजय पाटील :-**

असा जो माणूस शिरलेला असेल त्याला प्रशासनाकडून भाड्याची पावती नाही दिली पाहिजे. म्हणजे भुईभाडे लावायला नाही पाहिजे.

**धनराज अग्रवाल :-**

पण त्याच्याकडे पावती आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

टॅक्सची पावती नाही आहे. आपण जो स्थायी समितीने ठराव करून दिला सहाशे रूपयाप्रमाणे ते तिथे लावले ते तिथे लावायचे काही कारण नव्हते. कारण ही अतिक्रमण केलेली व्यक्ती होती. रस्त्यावरचे अतिक्रमण केलेली व्यक्ती होती. आणि अतिक्रमण सन १९९८ साली काढून टाकले होते. अतिक्रमण काढून टाकल्यानंतर जो कुलूप तोडून आत शिरतो, त्याला भाडे किंवा टॅक्स आकारणी करायला नको होती. पण आकारणी केली.

**धनराज अग्रवाल :-**

त्यामुळे त्याची केस मजबुत झाली. मी जुना भाडोत्री होतो असा त्याचा अर्थ होतो.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

यापूर्वी म्हणजे ग्रामपंचायतीच्या काळापासून आजपर्यंत त्याच्याकडे काही भाडे पावती नाही. आता पावती आहे म्हणजे तो भाडेकरू होत नाही. भाडेकरू करण्यासाठी स्थायी समितीचा, मा. महासभेचा ठराव हा लागतोच. आणि ह्यांनी केलेली चुक म्हणून ह्यांना नोटीसा दिल्या. आणि स्विकारलेले पैसे रद्द करून त्यांचे जे ३,६००/- रूपयाचे चेक आहे. तो चेक पाठवायची ऑर्डर दिली आहे.

**धनराज अग्रवाल :-**

पावती कोणी दिली आहे.

**विजय पाटील :-**

पावती कर विभागाकडून दिली गेली आहे.

**धनराज अग्रवाल :-**

तुमच्याकडे सहीसाठी आले असेल.

**विजय पाटील:-**

त्याच्यावर माझी सही आहे.

**धनराज अग्रवाल :-**

कोर्टात केस चालू आहे हे तुम्हाला माहित होते का नव्हते.

**विजय पाटील :-**

कोर्टात केस चालू आहे हे माहित होते.

**धनराज अग्रवाल :-**

मग तुम्ही त्याच्यावर सही का केली. जेव्हा कुठलेही काम नगरसेवक आणतात. त्यावेळी आपण आम्हाला त्याच्यावर दहा बारा पाने सांगतात की असे करा, असे करायला पाहिजे आणि आता तुम्ही अनधिकृतपणे सही करून ताबडतोब देउन टाकली त्याचे कारण काय. आमचे कुठलेही प्रकरण असेल तर तुम्ही त्याचे शहानिशा करत नाही. आणि काहीतरी त्याच्यात तोडा घालून त्याला बाजूला ठेवतात. आज चारशे पेन्डींग पडले आहे आणि एक करोड रूपयाची तुमची वसुली येत नाही. त्याचे काय कारण आहे? अनधिकृत आहे त्याला तुम्ही पावती द्यायची आणि जे अधिकृत आहे, पैसे भरायला येतात त्यांना तुम्ही तिथे उभे करत नाही. मग ती जबाबदारी कुणाची? दोन कोटी तुम्ही नगरपालिकेचे नुकसान केले असे आम्ही सांगतो. त्याच्या व्याजाचे नुकसान झाले आहे. त्याला जबाबदार कोण?

**मा. सभापती :-**

धनराज अग्रवालजी आपण गेल्या सभेत बोललो आहोत की, सर्वांची पावती फाडणार आणि टॅक्स वसुली करणार. एकही माणूस परत जाणार नाही.

**धनराज अग्रवाल :-**

आपण कालावधी ठरवा. एकदा फाईल आली तर त्याने किती दिवस येथे चकरा मारायचे. लोकांना काम नाही आहे का?

**मा. सभापती :-**

ज्या दिवशी कर विभागात पैसे घेतले नाही तर ताबडतोब त्या अधिका-यावर कार्यवाही करण्यात येईल.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

यामध्ये शुक्रवारी संध्याकाळी प्रत्येक प्रभाग अधिका-याना बोलावले होते. व त्यांच्याकडून लिस्ट मागितली आहे. त्या सगळया प्रभाग अधिका-यांना फाईल घेउन यायला सांगितले आहे. आठ दिवसात सगळे प्रकरण निकाली लागतील. मला माहित नव्हते इतके प्रकरण आहेत. आठ दिवसात सगळया प्रकरणांचा निकाल लागून पैसे वसूल करण्यात येईल.

**धनराज अग्रवाल :-**

पैसे वसुल करण्याकरिता आपण सक्षम आहात हे मला माहित आहे. आपण टि.व्ही. , फ्रिज उचलून आणता एवढे सुद्धा आपण करता. पण पैसे आपले अधिकारी घेत नाही त्याचे काय? पैसे भरले नाही तर आपण त्याच्याकडून वस्तु उचलून आणता.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

विजय पाटील एकही माणूस पैसे न भरता परत जाता कामा नये.

**नितीन ठाकूर :-**

तुमच्या अधिका-यांना माहिती होते की, हे कोर्ट मॅर्टर चालू आहे. तरी त्यांनी सही केली आहे. याचा अर्थ काय? आणि आम्ही नगरसेवक तुमच्याकडे जी ऑफीशियली कामे आणतो तर आपण हे कागदपत्र नाही ते नाही असे सांगून चालढकल करता. आणि हे पण तुमचेच अधिकारी आहेत. त्यांना माहिती आहे हे कोर्ट मॅर्टर आहे. त्या अधिका-याला वाचता येते, लिहिता येते, बसल्या बसल्या त्यांना माहिती पडते की कुठले प्रकरण आहे ते तरी ते सही करतात तर त्याचे काय?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

घडलेले मला माहित नव्हते. मी दुस-या केससाठी वकीलाकडे गेलो होतो. वकीलांनी सांगितले तुमच्या नगरपालिकेत असे असे झाले. केस हेअरिंग झाली. डिसजनला आली असताना ह्या पावत्या कशा गेल्या? त्यावेळेला दुस-या दिवशी मी ऑफीसमध्ये आल्यानंतर त्यांच्याकडून मी झेरॉक्स मारून आणले आणि मग मला समजले की, हा प्रकार वेगळा आह.

**नितीन ठाकूर :-**

साहेब, आपणाला समजला की, हा प्रकार वेगळा आहे. मग आपण त्या अधिका-यावर कार्यवाही का केली नाही. तुमचा आणि महापालिकेचा कोर्टामध्ये अपमानच झाला ना.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

याबाबत संबंधित क्लार्क आणि संबंधित अधिका-यांवर ॲक्शन घ्यावे म्हणून आस्थापना विभागात पाठवलेले आहे. व त्यांच्याकडे नोटीसा तयार झालेले आहे. त्यात फक्त सही करायचे राहिले आहे. म्हणजे ज्यावेळेला पैसे परत पाठवायचे होते ३,६००/- रूपये भरलेले आणि पावत्या रद्द करायच्या होत्या. त्यावर त्या संबंधित अधिका-यावर कार्यवाही करण्याच्या अटीवर रक्कम परत पाठवा. आणि बिल आणि ते पैसे रद्द करून त्याचे काढून पाठवले. त्यावरच सायमल्टेनिअसली आस्थापना विभागात नोटीस काढून कार्यवाही करण्याचे सांगितले आहे.

**नितीन ठाकूर :-**

कार्यवाही कधी करणार आहात. नोटीसवर सही करायची बाकी आहे ती सही कधी करण्यात येईल.

**धनराज अग्रवाल :-**

आपण संबंधित अधिकारी असे म्हणता आणि आपण क्लार्कचे नाव घेता तर त्या क्लार्कची काय चुकी आहे. जर तुमच्या अधिका-यांनी सांगितले नाही तर तो क्लार्क काय करणार आहे. त्याच्यात त्या क्लार्कची चुकी कुठे आहे. अधिकारी आहेत अधिका-यांना सर्व माहिती असते. खालच्या क्लार्कला माहिती नसते. नगरपालिकेने केस टाकली आहे. प्रत्येक जो खालचा क्लार्क असतो त्याला माहित नसते. त्यानी एवढयाप्रमाणे पावती बनवली. सही करताना तुम्ही बघायला पाहिजे होते की, ही पावती चुकीची बनवली आहे. व ती पावती तुम्ही बाजूला काढली पाहिजे होती.

**विजय पाटील :-**

लिपीकाला या आधी मी जे जुने कार्यालय आहे. व जे भुईभाडेचे गाळे आहेत त्यांना कर लावू नये. याबाबत मी तोंडी आदेश त्यांना दिले होते.

**नितीन ठाकूर :-**

साहेब, तोंडी आदेश नाही आपण लेखी स्वरूपामध्ये द्यायला पाहिजे होते. नगरपालिकेचे जेवढे असे मोठे प्रकार होतात त्याच्यात तोंडी आदेश असते. तोंडी आदेश नाही पाहिजेत.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, शिवमुर्ती नाईक साहेबांनी जे सुरूवातीला सभागृहाला जी माहिती दिली. ते तदांत खोटे आहे. त्याला कारण असे आहे सर्वप्रथम जोशी नावाचा गृहस्थ फक्त दोन व्यक्ती तेवढया गाळयापैकी हायकोर्टात गेले होते. सत्यपरिस्थिती काय आहे ती मी तुम्हाला सांगतो, सगळयात अगोदर जे सात आठ लोक आहेत त्यापैकी फक्त दोन जण हायकोर्टात गेली. हा मॅटर सव्वावर्ष कोर्टात पेन्डींग राहिला. एकदा डिसपोझ अप झाला परत तो रिओपन झाला. त्यानंतर तुम्हाला ह्याच्यामध्ये डिपोझिट, भाडे, रक्कम किती घेणार किती नाही त्याला निगोशिएशन म्हणतात. आपल्या वकीलाने सांगितले आणि हायकोर्टामध्ये तसे ॲफीडेव्हीट करून दिले. त्याच्यापुढे जाउन मी सांगतोय आम्ही निगोशिएशन करायला तयार आहोत, त्यांना रेन्ट लावायला तयार आहोत. कोर्टाने सांगितले ते तुम्हचे अधिकार आहेत आणि तुम्ही ते नक्की करा. हा विषय मा. महासभेला आला ह्याच्यामध्ये अनेक वेळेला माझे वकत्यव्य सुद्धा महासभेत रेकॉर्ड झालेले आहे. तुम्हाला जे काय भुईभाडे लावायचे आहे ते तुम्ही लवकरात लवकर लावा आणि त्यांना पझेशन द्या. जवळ जवळ सव्वावर्ष त्यांना पझेशन प्रशासनाने दिले नाही. का, तर ते कोर्टात गेले आणि त्याचा त्यांनी खुन्नस ठेवला. ह्याच्या अगोदर जे तत्कालिन नगराध्यक्ष होते त्यांनी पझेशन दिले त्याला कुठलाही घटनात्मक अधिकारी नाही आहे. एखादा जर कडक आयुक्त येथे आला तर जेवढे सगळे भरले आहेत आठच्या आठ त्यांना सर्वांना तो बाहेर काढेल, हे लक्षात ठेवा. हे जे सगळे भरले आहेत त्यांना कुठलेही वैधानिक स्वरूप नाही आहे. त्यानंतर आपण त्यांना अमाउंट फिक्स केली आहे. एक लाख रूपये डिपोझिट घेणार आणि भाडे जे काय ठरले ते घेणार. आम्हाला अजून काही कळविले नाही, काय काय झाले आहे. आज पहिला विषय येथे आला आहे. त्यानंतर ते कोर्टात परत गेले. ते दुसरे गेले. हे जे पहिले गेले होते ते गेले नाहीत. आणि ते दुसरे कोर्टात गेले, आम्हाला हे मान्य नाही म्हणून आणि त्याच्यामध्ये त्याच्यातला नंतर एक गुंतला गेला. एक अजुन त्याच्यामध्ये गेलेला नाही. जो माणूस सगळयात पहिला कोर्टात गेला त्याला अजून पझेशन मिळालेले नाही. आणि जो कशातही नव्हता ज्याने दादागिरी केली, तुमचे टाळे तोडले आणि जबरदस्ती आतमध्ये घुसला त्याला पझेशन मिळाले. आणि त्याच्या नावाने ह्या पावत्या फाडून देण्यात आलेल्या आहेत. आता मागच्या वेळेला आम्ही शास्तीचा जो ठराव ठेवला त्यावेळेला सर्वांची तोंड बारीक झाली. एवढा कठोर ठराव का ठेवला? त्या ठरावावर सह्या झाल्या का? सर्टिफाईड कॉपीसाठी अर्ज केला आहे. ह्याच्यामध्ये १/६/२००३ ला लागले आणि शिवमुर्ती नाईक साहेब बोललात की मला माहिती नाही. १६/०६/२००३ ऐवजी शिस्तीचा ठराव दिला व तो ०६/११/२००३ ला पास झाला आणि ०६/११/२००३ ते २४/११/२००३ एवढे दिवस का लागले? परवा तारखेला गेलो होतो. हा सगळा पिच्चर १/६/२००३ ला प्रकरण ८ मधील सेक्शन ४० नुसार अठराशे रूपयाची पावती आहे. वर नंबर ०००४९८ ही फक्त सिंगल माणसाला तुम्ही फाडून दिली आहे. तुम्ही टोटल दहाच्या दहा लोकांना करायला पाहिजे होती. त्याच्यानंतर रेव्हेन्यु स्टँपवर सही करून दिले आहे. खाली दहा लिहिले आणि वरती परत नउ लिहिले आहे. ०३ ह्याच्यात खाडाखोड झाली आहे. पावती नंबर २४५८१२. त्याच्यानंतर २४५८११ लगेच दुसरी पावती आणि त्याला तारीख आहे ३१/८/२००३ आणि ३१, १० आणि ९ ह्याचे अठराशे रूपये आहे. आणि वरची परत अठराशे रुपयाची पावती मला दिसते. फिगर डार्क केली आहे. त्यामुळे काही कळायला मागत नाही. रेव्हेन्यु स्टॅम्प दोघांवरती आहे. कोर्ट मॅटर चालू असताना ह्याच्यावर सही कोणाची? कोर्टाने तुम्हाला आदेश दिले का, ह्याचे भुईभाडे लावा. ट्रेस पास केलेल्या माणसाला तुम्ही भाडे आकारलेले आहे. स्टे असताना त्याने टाळे तोडले. ज्यावेळेला स्टे आला त्यावेळेला शटर बंद होते. पझेशन तुम्हचे होते. आणि तो स्टे आल्यानंतर टाळे तोडून आतमध्ये घुसलेला आहे. हे मी प्रत्येक सभेत बोलत आहे आणि तसे असताना सुद्धा हा आयुक्त कोण? ही सही कुणाची?

**विजय पाटील :-**

करिता म्हणून मी सही केली आहे. आणि दुसरी सही रेखा कुंभारे यांची आहे.

**मिलन म्हात्रे :-**

क्लार्कला नोटीसा काढली आहे असे आपण आता बोललात तर कोणा कोणाला नोटीसा काढण्यात आलेले आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

अहवाल प्राप्त झाला. यामध्ये रेखा कुंभारे यांना कारणे दाखवा नोटीस काढलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

विजय पाटील यांना नोटीस का काढली नाही?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

विजय पाटील यांची देखील कारणे दाखवा नोटीस तयार आहे. त्याची बजावणी आज करण्यात येईल.

**मिलन म्हात्रे :-**

कुंभारेंना किती तारखेला काढली?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

कालच त्यांना बजावली.

**मिलन म्हात्रे :-**

१/६/२००३ त्याच्यानंतर पंधरा दिवस पकडा. कोर्ट मॅटर चालू आहे. महिन्या महिन्याला तारखा पडत आहेत. माझ्याकडे ह्या मॅटरचा रोजनामा आहे. मी आता काही बोलणार नाही. असेच कागदपत्र मी अचानक तुमच्यासमोर आणेन. हे झाल्यानंतर किती तारखा पडल्या ते ही मला माहिती आहे. हे सगळे मी तुम्हाला आता सादर करणार नाही. या तारखेला आपले वकील रोज जात आहेत. जर १/६/२००३ ला पहिली नोटीस निघते त्यानंतर ही २८/१०/२००३ तुमचे पैसे घेतले गेले. या तारखेत गडबड आहे. ही सही कोणी केली आहे. या क्लार्कला तुम्हाला सुद्धा नोटीस द्यावी लागेल. या प्रकरणामध्ये जे जे सिगनेचर ॲथोरिटी आहेत. ह्या सगळया पावत्या मी ॲप्लीकेशन करणार व ह्या केस मध्ये मी पण इनव्हॉल होतोय. नगरपालिकेचा एक विश्वस्त नगरसेवक या नात्याने मी पण ॲप्लीकेशन करणार. माझा वकील देणार मी. आणि नगरपालिका जी बाजू समोर मांडत नाही. ते मी कोर्टापुढे मांडणार आणि यांना जर तुम्ही नोटीसा नाही काढल्या तर कोर्टाकडून नोटीसा काढायला लावणार. आम्ही एखादे प्रकरण नेले तर त्याच्या अनेक प्रकारचे गोष्टी सुचवितात. त्याला रजिस्ट्रेशन नाही, हे झाले नाहीत, अमुक झाले नाहीत, हा मालक बराबर नाही, सही बरोबर नाही असे अनेक कारणे सांगून ॲग्रीमेंट लावलेले नाही, ॲग्रीमेंट जुने लावलेले नाही, फस्ट ओनरचे नाही, आता पर्यंतचे ओनर किती, हे सगळे प्रश्न विचारून आम्हाला भंडावून सोडतात. हे क्लिअरकट कोर्ट ऑर्डर आहे. त्याच्यात राजकीय दबाव आहे. आणि या दबावाला सर्व अधिकारी फशी पडले आहेत. राजकीय दबाव हे परत एकदा बोलतोय. ते जे जोशी म्हणून होते ते तुमच्या दरवाजामध्ये दहा दहा वेळेला येउन डोके आपटून गेलेले आहेत. अध्यक्षांकडे ज्यावेळेला गाळयाचे अलाउंटमेंट झाले त्यावेळेला ह्या दोन व्यक्ती नगरपालिकेच्या कॅबिनमधून तुमच्या अध्यक्षांच्या कॅबिनमधून हाकलले गेले. तुम्ही कोर्टात गेले, तुम्हाला आम्ही बरोबर घेणार नाहीत. ज्यांनी काही केले नव्हते त्यांना तिथे जाउन पझेशन दिले गेले होते. आणि त्यांना टाळे उघडले आणि आतमध्ये घुसवले गेले. तेव्हा मला बोलावले गेले होते म्हात्रे साहेब तुम्ही चला आणि या कागदावर सही करा. तेव्हा मी गेलो नाही. कारण मला माहिती आहे त्यावेळेला फक्त अध्यक्ष गेले होते. प्रशासनातर्फे एकही अधिकारी उपस्थित नव्हता. असे त्यांचे पझेशन दिले गेले आहे. मी स्वतः सभेमध्ये मागणी केली आपण ट्रेस पासिंगचा गुन्हा दाखल केला का? अजून पर्यंत तो गुन्हा दाखल झालेला नाही. आणि त्याच्यावरती आणखीन कहर झाला. गुन्हा दाखल तर सोडून द्या तर पावत्या देखील फाडल्या गेल्या आहेत. आम्ही पण तुमची कुठली तरी गोडाउन फोडतो आणि त्याला टाळे मारतो. आता आपण आम्हाला उत्तर द्या.

**रिटा शाह :-**

साहेब, उत्तर देण्याच्या अगोदर मिलन म्हात्रे आणि धनराज अग्रवाल साहेब यांनी जो मुद्दा मांडला त्याला तर मी चांगला मुद्दा असे म्हणणार नाही. कारण हे आपल्या महानगरपालिकेसाठी दुःखाची गोष्ट आहे की, असे प्रकरण आपल्याकडे घडत आहे. आपण अधिकारी आणि क्लार्कला प्रशासनातर्फे काय करायचे आहे ते करणारच आहोत. पण जे अधिकारी आणि क्लार्क यांच्यावर ज्यांनी राजकीय दबाव आणला. आता जसे बोलण्यात आले की कोणाचा काहीतरी राजकीय दबाव आला होता. प्रशासनाने राजकीय दबाव कोणी आणला त्याचे देखील नाव द्यायला पाहिजे. तर महानगरपालिका आणि आम्ही बसलेले स्थायी समितीचे नगरसेवक, सभापती खरोखर या शहराचे भले करण्यासाठी बघत असतील, राजकीय माणसाचे नाव पुढे आले नाही आणि फक्त अधिकारी आणि क्लार्कचे नाव आले तर त्याचा अर्थ असा होणार की, परत काहीतरी राजकरण चालू झाले आहे. पहिले राजकीय माणसाचे नाव द्या आणि मग अधिकारी आणि क्लार्कवर जे काय करायचे आहे ते करा.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

सभापती साहेब, मिलन म्हात्रे साहेबांनी जे नाईक साहेब बोलले ते पूर्ण धादांत खोटे आहे असे म्हणाले. ज्यावेळेला गाळे पूर्ण झाले, ते त्यांचे म्हणणे पुर्णपणे चुकीचे आहे. कारण एखादी केस हायकोर्टात गेल्यानंतर त्या केसच्या निर्णयाप्रमाणेच सर्व भाडेकरू ना टॅक्स लावले पाहिजे. किती लोकांना अलॉटमेंट करायचे आहे. मुळ जोशींचा मुद्दा आहे ते हातगाडी घेउन कोपऱ्यावर वडापाव विकणारी हातगाडी होती. नगरपालिकेचे महापालिकेत रुपांतर होत असताना त्या गाळयांचे वाटप झाले. त्या गाळयामध्ये नगरपालिका असताना त्यांचे ज्यांचे भुईभाडयाने जागा दिल्या होत्या. त्यांचेच पुर्नवसन करण्यासाठी हे बांधकाम केले आहे. बांधकाम केले असताना गाळे तयार झाले आणि भाडे व डिपोझिट ठरविण्यासाठी नगरपालिका असताना कलेक्टर आणि कमीशनरची मंजूरी घ्यावी लागते. नगरपालिका होती त्यावेळी हे प्रकरण मंजूरीसाठी पाठविले होते. मंजूरी न मिळाल्यामुळे अलॉटमेंट करायचे बाकी राहिले. आणि नगरपालिकेचे महापालिकेत रूपांतर होत असताना २७ तारखेला गाळयाचे वाटप झाले. त्यावेळेला प्रशासनाने गाळयाचे वाटप केलेले नव्हते. मीनव्हाईल आम्हाला पण गाळे द्या म्हणून जोशी ही व्यक्ती आली. त्यांना भुईभाडे ग्रामपंचायती पासून दिलेले नव्हते ते हातगाडी घेउन कोपऱ्यावर वडापाव विक्री करत होते. हायकोर्टात मॅटर गेल्यावर प्रत्यक्षात ज्यांना भुईभाडे दिले त्यांनाच वाटप करायचे आहे. आणि महापालिकेने अटीशर्ती ठरवावे आणि त्याप्रमाणे ॲक्शन घ्यावे. एका केसमध्ये जरी निर्णय झाला तरी सर्व केस मध्ये आपल्याला तसेच वागावे लागते. एका एक आणि दुसऱ्याला एक असे नियम लावता येणार नाही. कुठलाही निर्णय झाला, प्रपोज एकच आहे की गाळे द्यायचे आणि गाळे देण्यासाठी एका केस मध्ये जरी निर्णय झाला तरी प्रत्येक केस मध्ये निर्णय लावून घेण्याची पद्धत नाही. नगरपालिका विरूद्ध हायकोर्टात मॅटर गेल्यानंतर हायकोर्टाचा निर्णय होतो. आम्ही हायकोर्टात सांगितलेले आहे की, अटीशर्ती ठरवतो आणि अटीशर्ती मान्य असतील आणि जे ॲप्लीकेबल असतील म्हणजे जे योग्य असतील भुईभाडयाने दिलेले त्यांना आम्ही अलॉटमेंट करतो असे आम्ही हायकोर्टात सांगितलेले आहे. हायकोर्टाची ऑर्डर झाली की, तुम्ही अटीशर्ती ठरवून त्याप्रमाणे काम करा. डिपोझिट आणि भाडे किती घ्यावे याबाबत मा. महासभेने ठराव केला. महासभेच्या ठरावाप्रमाणे जे जे भूईभाडे करू होते त्यांना सगळयांना नोटीसा काढून कळविले आणि कळविल्यानंतर ज्यांना मान्य नाही ते कोर्टात गेले. आणि मिलन म्हात्रे साहेबांनी सांगितले की, पानपट्टी टपरीला गाळे दिले तर आम्ही गाळे दिलेले नाही. ॲलाटमेंट झाल्यानंतर कोर्ट मॅटर झाल्यानंतर व कोर्टाकडून स्टे आल्यानंतर गाळयाचा ताबा घेतला हे मला दोन दिवसापूर्वी माहिती झाले. हे डिपार्टमेंट माझ्याकडे नाही आहे. प्रत्यक्षात ज्या दिवशी टाळा तोडून आत गेला, स्टेटस्को म्हणजे याचा अर्थ टाळा लावलेले तसेच पाहिजे. आत कोणी शिरता कामा नये. म्हणजे ते शिरले आणि व्यवसाय चालू आहे म्हणून स्टेटस्को आणला हे म्हणणे चुकीचे आहे. कारण ज्या दिवशी टाळे तोडून आत गेला त्या दिवशी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करायला पाहिजे होते. आम्ही त्याला अलॉटमेंट केलेले नाही. आणि हे स्टे आणल्यानंतर आत शिरला. ही वस्तुस्थिती पंचनामा करून कोर्टासमोर सादर करणे आवश्यक आहे.

**मिलन म्हात्रे :-**

साहेब, आपण आता वक्तव्य केले की, मला माहिती नाही हे मला दोन दिवसापूर्वी कळले. मा. महासभेत माझी चर्चा झाली त्या चर्चेत अटेडन्सची सही माझी पण आहे आणि तुमची सुद्धा अटेडन्सची सही आहे. ती जाहिर चर्चा झाली आहे. त्याची प्रोसिडिंगला नोंद आहे की, टाळा तोडून तो आतमध्ये घुसलेला आहे आणि ह्याच्यामध्ये आपले वक्तव्य सुद्धा आहे. आपण ती प्रोसिडींग काढा आणि वाचा. ज्यावेळेला त्याने एन्ट्री केली त्याच मिटींगमध्ये मी सभागृहात उठून बोललो होतो.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

मी तुम्हाला आता हेही सांगितले की, ज्यावेळी मी दुसऱ्या कामासाठी वकीलाकडे गेलो होतो तेव्हा हे निदर्शनास आल्याबरोबर दुसऱ्या दिवशी मी ॲक्शन सुरू केली.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, माझे असे म्हणणे आहे की, जे घुसलेले आहेत मी तर घुसलेले आहेत हाच शब्द वापरतो. बऱ्याचशा लोकांना आपण जी अग्रीमेंट बनविली होती. त्याच्यामध्ये आपण एक अट टाकली. त्या व्यक्तीचा दुसरे कुठेही उदरनिर्वाहाचे साधन नसावे. ती जर अटीशर्ती तुम्हाला बघायला गेलात तर त्याच्यामध्ये आठ पैकी सात गाळयांची होती. कारण त्याच्यामध्ये तुम्ही अशा एका व्यक्तीला दिले गेले आहे की, त्यांची बांग्लादेश झोपडपट्टीमध्ये तीन चार दारूचे अड्डे आहेत. स्वतः ची दुकाने आहेत. घरे आहेत. हे सगळे आहे आणि त्याला टॅक्सेशन नगरपालिकेचे झाले आहे. म्हणजे

कागदोपत्री पुरावा प्रायमा बेसेस मी तुम्हाला द्यायची गरज नाही. पण ते सुद्धा आम्ही तुम्हाला देउ. भुईभाडे अगोदर लागलेले नव्हते अशाना पझेशन द्यायला घाई चालली होती.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.) :-**

आम्ही ती रोकली. आणि जे भुईभाडयाने दिलेले आहे त्याच लोकांना आम्ही कळविले की, एक लाख रूपये डिपोझिट आणि एकवीस रूपये स्वेअर फिटप्रमाणे भाडे आकारा. आणि त्यांना परवडत नाही म्हणून ते ठाणे कोर्टात गेले.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांना तुम्ही भुईभाडयाचे कळविले त्याच्यात सुद्धा भुईभाडेवाले नाही आहेत. परत एकदा त्याचे अवलोकन करा. अवलोकन करण्यासाठी माझी तुम्हाला रिक्वेस्ट आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.) :-**

माझा उद्देश एवढाच होता की, एखाद्या केसमध्ये त्या गाळेधारकामध्ये हायकोर्टाची ऑर्डर झाली. आणि त्यात कमेटमेन्ट केले असेल, महासभेकडून अटीशर्ती ठरवून घेउन कार्यवाही करतो. तर ते सगळया केसेसला लागू होते.

**मिलन म्हात्रे :-**

जो कोर्टात पहिला गेला त्याला सगळयात शेवटेला पझेशन मिळाले. आणि हा जो दहा नंबरचा गाळा आहे तो तिथ पर्यंत खाली होता. भुईभाडेकरू होते नव्हते ते कोर्टात तुमचे इम्प्लीमेंटेशन जे आउटपुट करायचे होते ते तुम्ही करायचे होते. पण ते ऑर्डर घेउन आले.

**दिपक खांबीत :-**

कोर्टाच्या आदेशाप्रमाणे आम्ही त्यांना कळविले.

**मिलन म्हात्रे :-**

कळविले पण पझेशन कधी दिले. तुमचा गाळा गेला, त्याने कब्जा केला त्यांच्या नंतर तुम्ही दिले.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.) :-**

तुम्ही शब्द वापरताहेत त्यावेळेला प्रशासनातर्फे सगळे गाळे वाटप केले असेल तर तुम्हचा मुद्दा बरोबर आहे. तु सगळेच घुसलेले आहे असे प्रशासनावर आरोप करण्याची काही गरजच नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आपण उपआयुक्त होता त्यावेळेला दहा नंबरचा गाळा खाली होता. आणि ह्याला परवा दोन दिवस अगोदर पझेशन दिले गेले आहे.

**दिपक खांबीत :-**

दोन महिन्यापूर्वी दिले.

**मिलन म्हात्रे :-**

आणि अजेमा कुरेशीने ताबा कधी घेतला. केस कधी फाईल झाली.

**दिपक खांबीत :-**

वर्षभरापूर्वी.

**मिलन म्हात्रे :-**

ऐकले. तो डिफरन्स किती आहे. तिथपर्यंत तो गाळा खाली होता. आणि जाणूनबुजून त्याला पझेशन दिले गेले नव्हते.

**अशोक पाटील :-**

अध्यक्ष साहेब, ज्या ज्या वेळी हा विषय सभागृहासमोर आलेला आहे. त्या त्या वेळी उल्लेख झालेला आहे की, हे जे गाळे वाटप करण्यात आलेले आहे. नगराध्यक्षाच्या कारकीर्दीमध्ये शेवटच्या टप्प्यामध्ये मा. माजी नगराध्यक्ष प्रफुल्लजी पाटील ह्यांनी जे गाळे वाटप केले. ते त्यांनी त्यांच्या अधिकारात केले शेवटच्या क्षणाला, शेवटच्या दिवशी. ब-याच वेळेला हा विषय सभागृहासमोर आल्यानंतर त्याचा वारंवार उल्लेख होतो तो आजही येथे झालेला आहे. हे जे गाळे वाटप मा. माजी नगराध्यक्ष प्रफुल्ल पाटील ह्यांनी त्यांच्या अधिका-यात केले ते कायदेशीर का बेकायदेशीर. ते एकदा प्रशासनाने ठरवावे. मिलन म्हात्रे साहेब देखील वारंवार तोच उल्लेख करत आहेत की, त्यांनी घुसखोरी केली आहे. ते जबरदस्तीने टाळे तोडून घुसलेले आहे. आणि आता नाईक साहेबांनी सांगितले की, ते प्रशासनातर्फे वाटप करण्यात आलेले नाही. याचा अर्थ माजी नगराध्यक्ष प्रफुल्ल पाटील ह्यांनी त्यांना बेकायदेशीर ताबा दिला का?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्य श्री. अशोकजी पाटील मी आपल्याला सभापतींच्या परवानगीने सांगतोय, त्यावेळेस नगरपालिका अस्तित्वात होती. महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ चे कलम ९२ नुसार कोणत्याही इमारतीचे वॅल्युएशन करावे लागते. ते वॅल्युएशन केल्यानंतर गाळे वाटपासाठी शासनाने एक कमिटी तयार केली आहे. त्या कमिटीचे अध्यक्ष मा. जिल्हाधिकारी आहेत. सदस्य सचिव त्या समितीचे कोणी मुख्याधिकारी राहतात. सहाय्यक संचालक नगररचना हे त्या समितीचे सदस्य आहेत. अशी चार लोकांची ती समिती आहे, ती शासनाने स्थापित केली आहे. आणि त्या समितीला ते वाटपाचे अधिकार ९२ सेक्शनखाली शासनाने तयार केले आहे. आणि या प्रकरणांची मी मागे ही चौकशी केली तर त्या ९२ सेक्शननुसार ह्यांनी वॅल्युएशनसाठी शासनाकडे पाठविले होते. व जिल्हा अधिकारी यांच्याकडे प्रस्ताव पाठविला होता. परंतु जिल्हा समितीचा निर्णय होण्याच्या अगोदर ते गाळे वाटप झाल्याचे दिसून आले. आणि ह्याही उपर मी सांगतो की, रेन्ट कंट्रोल ॲक्टनुसार सेक्शन दोन नुसार नगरपालिकेच्या कोणत्याही मालमत्तेला रेन्ट कंट्रोल ॲक्ट लागू नाही. आणि असे कोणीही समजता कामा नये की, ही जागा आम्ही नगरपालिकेकडून भाड्याने घेतली. म्हणजे आम्ही या जागेचे मालक झालो.सेक्शन दोन मध्ये त्यांनी नगरपालिकेला एक्समशन केले आहे. नगरपालिका, महानगरपालिकेच्या जेवढया प्रॉपटी आहेत त्यांना रेन्ट कंट्रोल ॲक्टमधून एक्झम्ट केलेले आहे. धन्यवाद.

**अशोक पाटील :-**

मा. केळकर सो. आपण आता जो प्रशासनातर्फे खुलासा केला, कलेक्टर साहेबांकडून त्यांचे वॅल्युएशन निश्चित ठरलेले नव्हते तो पर्यंत तो वाटप करण्याचा अधिकार कुणालाही नव्हता. तुमच्या म्हणण्यानुसार ते बेकायदेशीर आहे. जर माजी नगराध्यक्षांनी त्यांच्या अधिकारामध्ये जेव्हा हे गाळयांचे वाटप केले आणि ते बेकायदेशीर होते तुमच्या म्हणण्यानुसार. मग आता पर्यंत प्रशासनाने कर्तव्य जबाबदारीप्रमाणे त्यांच्यावर काय ॲक्शन घेतली. त्या गाळेधारकांना नोटीसा दिल्या का, तुम्ही येथे जबरदस्तीन कब्जा घेतलेला आहे, त्यांच्या विरूद्ध क्रिमीनल गुन्हा दाखल केला आहे का? तुम्ही प्रशासनातर्फे काय कार्यवाही केली. आतापर्यंत विषय तुम्ही शिजत ठेवलेला आहे. आणि आता तुम्ही सांगता जे वाटप केले आहे ते बेकायदेशीर आहे ते कायद्यात बसत नाही. अशी तुमची प्रशासनाची भुमिका आहे. तुम्ही तुमच्या प्रशासनातर्फे आतापर्यंत कारवाई काय केली.

**दिपक खांबीत :-**

कलेक्टर ऑफीसने त्याचे भाडे न ठरवून दिल्यामुळे व महानगरपालिका झाल्यामुळे महानगरपालिकेला अधिकार असल्यामुळे मा. महासभेने भाडे ठरविल्यानंतर आपण त्यांना नोटीसा दिलेल्या आहेत.

**रिटा शाह :-**

तसे नाही आहे. माजी नगराध्यक्ष प्रफुल्ल पाटील साहेबांनी जे गाळे वाटप केले. ते कायदेशीर का बेकायदेशीर आहे. आता केळकर साहेबांनी जे उत्तर दिले त्या हिशोबाने ते बेकायदेशीर झाले. त्याचा अर्थ महानगरपालिकेने जे वाटप केले आहे ते सर्व रिकामे करून घ्यायला पाहिजे. त्या सर्वाना काढायला पाहिजे. आणि रितसर ज्यांना त्यांना वाटप करायला पाहिजे. असा मुद्दा आता उपस्थित झालेला आहे.

**दिपक खांबीत :-**

आपण त्यांना सर्वांना नोटीसा दिल्यानंतरच ते कोर्टात गेले आहेत.

**रिटा शाह :-**

भाड्याचा प्रश्न नंतर येतो. कायदेशीर की बेकायदेशीर. वाटपच बेकायदेशीर झाले आहे तर भाडे लावण्याचा प्रश्नच येत नाही. पहिले तुम्ही त्यांना वेकन्ट करा आणि मग भाड्याचा प्रश्न विचारात घ्या.

**मा. सभापती :-**

हा विषयाची चर्चा विषयाच्या बाहेर चालू झालेली आहे. हा विषय मोठा असल्याकारणाने हा विषय मा. महासभेत जाउ दे.

**रिटा शाह :-**

हा विषय मोठा कुठे आहे.

**मा. सभापती :-**

ह्या विषयावर माजी नगराध्यक्ष यांच्यावर आरोप लागत आहेत. त्यांनी ते आरोप सिद्ध करून दाखवावेत.

**रिटा शाह :-**

प्रशासनाने ते सिद्ध करून दाखविले आहेत. त्याच्यात अजून काय काढायचे आहे.

**नितीन ठाकूर :-**

साहेब, भाडे लागते कधी अतिक्रमण केल्यावर भाडे लागते का?

**मा. सभापती :-**

त्याच्यावर कायर्वाही करणार.

**अशोक पाटील :-**

जे बेकायदेशीर आहे, घुसखोरी आहे त्यांना तुम्ही भाडे आकारणी त्याच्यावर कशी काय करणार? आपण ती घुसकोरी मान्य केली आहे. याचा अर्थ असा होतो का?

**नितीन ठाकूर :-**

साहेब, मला विचारायचे आहे आपण जे नगरपालिकेच्या जागेमध्ये शॉपिंग सेंटर बांधलेले आहे. ते बेकायदेशीर आहे का, कायदेशीर आहे. ह्याचा नगरपालिकेने प्लान मंजूर केलेला आहे का? असेच बांधले आहे. याचा खुलासा करण्यात यावा.

**मा. सभापती :-**

आता तो कोर्टात गेला आहे आपण त्याच्यावर काहीच करू शकत नाही. हा विषय येथेच राहू द्या.

**नितीन ठाकूर :-**

साहेब, कोर्टामध्ये विषय गेलेला असताना तो मनुष्य घुसतो आणि आपण गप्प बसतो. हे असे कसे चालेल. तुम्ही त्याला बाहेर काढू शकता.

**मा. सभापती :-**

ही नगरपालिकेची गोष्ट आहे. महानगरपालिका झाल्यावरचे नाही आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, ह्यांच्यात जे टॅक्सेशन झालेले आहे. आणि आपण भुईभाडेधारकांना नोटीस दिलेली आहे. आणि आपण हे जे पहिले लावले आहे ते आपण कॅन्सल केले का, ते सर्व चुकीचे लावले आहे. कुठल्या सेक्शनने केले आहे. ४८५ ने काय काय कॅन्सल केले आहे. तसे त्यांना पत्र दिले आहे का? आपल्या वकिलांना कळवले आहे का?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

४८५ प्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ठिक आहे. ४८५ प्रमाणे कार्यवाही झालेली आहे. म्हणजे हे चुकीचे आहे हे पुर्णपणे सिद्ध झालेले आहे. आता ह्याच्यामध्ये ज्यांनी ज्यांनी सह्या केलेल्या आहेत त्या सगळयांवर तुम्हाला नोटीसा काढायला लागतील. न्यायप्रविष्ट मॅटर आहे त्याच्यात तुम्ही आणि मी क्षमापन करून चालणार नाही.

**मा. सभापती :-**

भुईभाडे कमी करायचे त्याच्यावर आपण चर्चा करावी.

**नितीन ठाकून :-**

साहेब, हे मंजूर प्लान प्रमाणे केलेले आहे का, असेच केले आहे. त्याची आपण आम्हाला माहिती द्या.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

सभापती साहेब, मा. महासभेच्या ठरावाप्रमाणे आपण ज्या नोटीसा पाठविल्या. बिल आणि डिपोझिट भरण्याविषयी ते जे त्यामध्ये बसतात ते समजा वाटप केलेले आहे. परंतू नॉर्समध्ये बसतात. त्यांना आम्ही कळविले आहे. आणि समजा वाटप केले असेल आणि नॉर्समध्ये कोणकोण बसतात हे मा. महासभेने ठरविले आहे. म्हणजे आपण आता त्यांना परत बाहेर काढायचे आणि तुम्ही बसता म्हणून आत जायचे. यापेक्षा नॉर्समध्ये कोण बसतात त्यांना बिल आणि नोटीसा द्या. आणि जे नॉर्समध्ये बसत नाही. त्यांना काढण्याची कार्यवाही करणार. जरी वाटप केलेले असले तरी.

**रिटा शाह :-**

मा. महासभेने काय ठरविले आहे तो प्रश्न नाही. वाटपच जेव्हा बेकायदेशीर झाले.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

मा. महासभेने जेव्हा अटीशर्ती ठरवल्या त्याच्या पूर्वीच वाटप झालेले आहेत. वाटप झाल्यामध्ये मा. महासभेने ठरविल्याप्रमाणे जर कोण बसत असेल तर त्यांना परत काढायचे आणि मा. महासभेने

ठराव म्हणून आत जा म्हणायचे नाही. म्हणजे जे बसतात त्यांना ॲप्लीकेबल करायचे आणि जे बसत नाही त्यांच्यावर कार्यवाही करायची.

**रिटा शाह :-**

याचा अर्थ असा झाला की, कोणताही नगरसेवक, सभापती, नगराध्यक्ष कुठलाही माणूस जो निवडून आलेला आहे. त्याला शासनाचा जो अधिकार आहे, तो आपल्या ताब्यात घेउन कसे ही काही ही वाटप करू शकतो आणि नंतर मा. महासभेत घेउन त्याला पास करून तो बसतो असा अर्थ लागेल. म्हणजे मी पण काही करू शकते त्याचा असा अर्थ झाला. आणि पुढे मा. महासभेत घेणार भाडे लावून घेणार आणि पास करून घेणार आणि बसते म्हणून त्याला लिगली करून घेणार त्याचा अर्थ असा झाला. म्हणजे मी पण काही करू शकते. त्याचा अर्थ असा होतो. पुढे मा. महासभेत घेणार आणि पास करून घेणार आणि भाडे लावून घेणार आणि बसते म्हणून त्याला लिगली करून घेणार. त्याचा अर्थ असा झाला.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

मा. महासभेने ज्या अटीशर्ती ठरवल्या आहेत लिगली आहेत ते.

**रिटा शाह :-**

साहेब, मा. महासभेने काय ठरविले आहे तर महासभेत मी पण होती आणि ते मला ही माहिती आहे. मी काय विचारते ते बघा की, कुठलीही वास्तु महानगरपालिकेने, नगरपालिकेने, नगरपरिषदने उभारली त्या वास्तुचे उद्‌घाटन किंवा कुणाला ताब्यात देण्याचा अधिकार शासनाचा आहे. तो मुद्दा मा. महासभेत किंवा स्थायी समितीत आणून ते पास करून नंतर आणि वाटप करण्याचा अधिकार प्रशासनाला आणि राजकीय माणसाला एकत्र घेउन बरोबर करायचे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

मा. महासभेने ठरविले आहे त्यामध्ये अटीशर्तीमध्ये कोण बसतात त्यांना द्यायचे आहे.

**रिटा शाह :-**

पण कुठलाही राजकीय माणूस आपल्या अधिकाराचा गैर वापर करून ते वाटप करतो किंवा त्या वास्तूचे उद्‌घाटन करतो अधिकारी आणि ते प्रशासनाला कळवत नाही. आता ते सिद्ध झाले आहे ते वाटप कायदेशीर झालेच नाही. मग असा अधिकार मला ही आहे का? मग मी पण असे उद्‌घाटन आणि वाटप करू शकते आणि ते मी महासभेत आणणार आणि पास करून घेणार आणि बसतो म्हणून मी कायदेशीर करून घेणार.

**दिपक खांबीत :-**

तत्कालिन नगरपालिका असताना आपण त्यांना पुर्नवसनाचे आपण त्यांना.

**रिटा शाह :-**

खांबित साहेब, नगरपालिका आणि महानगरपालिका तर तुम्ही पण शिकलेले इंजिनिअर आहात. तुम्हीपण बरोबर समजता की, मी काय विचारते. उद्या आमच्या वार्डातील कुठलीही वास्तु आम्ही नगरसेवक म्हणून कोणाला भाड्याने देउन टाकली. आम्ही त्याचे उद्‌घाटन करून टाकले आणि उद्या ते कायद्यात बसत नाही. ते कायदेशीर झाले नाही म्हणून मा. महासभेत आणेल आणि मा. महासभेत ते पास करून घेणार हे भाडे एवढे आहे. नंतर तो कायद्यात बसतो म्हणून ते कायदेशीर करून घेणार हे आता चालणार आहे का? आता तुम्ही आम्हाला जसे उत्तर देत आहात ते तसे चालून घ्यायचे आहे म्हणून तुम्ही आम्हाला तसे उत्तर देत आहात.

**दिपक खांबीत :-**

नगरपालिका असताना रूंदीकरणाच्यावेळी चौदा लोकांना नोटीसा दिल्या होत्या. तुम्ही जागा खाली करून द्या तुम्हाला पर्यायी जागा देण्यात येईल. आणि तेच ते चौदा लोक आहेत.

**रिटा शाह :-**

ते कोण चौदा आहे किंवा पंधरा आहे. तर तुम्ही चौदाशे लोकांना द्या. पण माझा प्रश्न आहे की, जी काय कार्यवाही महानगरपालिका, नगरपालिका किंवा नगरपारिषद आपल्याकडे कार्य असे आपल्याकडे कायदेशीर व्हायला पाहिजे. सन्मा. सदस्यांनी अशोक पाटील यांनी विचारले की नगराध्यक्ष यांनी केलेले वाटप कायदेशीर किंवा बेकायदेशीर. तेव्हा केळकर साहेबांनी उत्तर दिले की, त्याच्यावर एक कमिटी आहे व जिल्हाधिकारी हे अध्यक्ष आहेत. त्यांच्याकडून भाडे वगैरे ठरवून येते आणि तेच आपल्याला वाटप कसे करायचे याबाबत गाइडन्स देतात. त्याचा अर्थ प्रफुल्ल पाटील साहेबांनी जे वाटप केले ते बेकायदेशीर झाले. आणि ते आपण महासभेत पास करून कायदेशी बसते म्हणून आपण

कायदेशीर करून घेतले आणि राजकीय माणूस व अधिकारी वर्ग या सर्वांनी केलेल्या चुकांवर आपल्याला झाकण घालायचे असेल तर असा मुद्दा तुम्ही आणा आम्ही पास करून देउ.

**दिपक खांबीत :-**

मॅडम, निर्णयानुसार तो विषय मा. महासभेत आणला गेला.

**रिटा शाह :-**

हायकोर्टाचा निर्णय नंतर झाला आहे व वाटप पहिले झाले आहे. वाटप झाले तेव्हा ही आपण होते व माजी आयुक्त साहेब होते.

**मा. सभापती :-**

पुढचा विषय घेण्यात यावा.

**मिलन म्हात्रे :-**

हायकोर्टाचा विषय आला आहे तर मॅटर रितसर कोर्टात चालू होते. तर आता नगरपालिकेच्यावतीने केळकर साहेबांनी जे स्पष्ट केले ते तुम्ही कोर्टामध्ये ॲफीडेव्हीट करून घ्यायला पाहिजे होते. मुळात हे पझेशन चुकीचे आहे. ह्या ह्या लु फोल्समुळे हे पझेशन अनवॅलीड आहे. हे चुकीचे आहे ह्यांनी अशी अशी परवानगी घेतलेली नव्हती.

**दिपक खांबीत :-**

दिलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मग ते तुमच्या वकीलांनी प्लीड केलेले नाही. या विषयामध्ये मला चांगले माहिती आहे कारण या विषयाच्या हेअरींगला मी हजर होतो. आपल्या वकीलानी ॲफीडेव्हीट कोर्टाने मागितले त्या कोर्टाच्या ॲफीडेव्हीटमध्ये सुद्धा काही गोष्टी दिलेल्या नाहीत.

**मा. सभापती :-**

म्हात्रे साहेब, तुम्ही येथे भांडता जोशीमुळे. जोशीची हातगाडी होती.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, तुम्ही चुकीचे एलिगेशन करता. कुठल्याही नगरसेवकांनी चांगला मुद्दा आणला आणि उपस्थित केला आणि ते जोशीसाठी भांडता असे एलिगेशन करता.

**मा. सभापती :-**

मी तसे सांगत नाही. त्यांची हातगाडी होती आणि आपण त्यांना दिलेले आहे. ज्यांचे दुकान होते त्यांना आपण पुर्नवसन केलेले आहे. आणि या पुर्नवसनाचे मी सुद्धा मा. महासभेत मांडलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ह्याच्यामध्ये जे कोर्टाचे ॲफीडेव्हीट आहे जे सरकारतर्फे आले आहेत. ते तुम्ही मागवा आणि नसेल तर मी तुम्हाला देतो. त्या मॅटरमध्ये आपल्या वकीलाने काय काय ॲफीडेव्हीट दिली आहेत. ती आपण नीट स्टडी करा आणि नीट वाचून घ्या. काहीही उत्तर देउ नका. कोर्टाचे मॅटर असते ते अगदी व्यवस्थितपणे समजून घ्या आणि त्याच्यामध्ये नंतर निर्णय द्या. हे जे आता केळकर साहेबांनी सांगितले ते जर अनव्हॅलीड तुम्ही म्हणणार आहात तर ती केस टिकलीच नसते.

**दिपक खांबित :-**

हा विषय पुढच्या वेळी घेऊ.

**रिटा शाह :-**

खांबीत साहेब, आपण इथे अधिकारी म्हणून आहात. आपण स्थायी समितीचा सदस्य म्हणून हा विषय पुढच्या वेळी घेऊ असा बोलण्याचा आपला अधिकार नाही. साहेब, आपण आता मिलन म्हात्रे यांच्यावर एलिगेशन लावले की जोशी जो काणी आहे. त्याची बाजू घेउन तो मुद्दा येथे आणला आहे. एक नगरसेवक व स्थायी समितीचे सदस्य म्हणून मिलन म्हात्रे साहेब मी आपल्याला सांगू इच्छिते की, असे भलतेच कोणाच्या चांगल्यासाठी आपण असे विषय आणून कमिटीचा तुम्ही टाईम बरबाद करता. हे बरे करत नाही. अध्यक्ष साहेब असे बोलतात. आपण कोणी एका माणसाच्या भल्यासाठी असे विषय आणता आणि समितीचा एवढा एक तास तुम्ही खराब केला हे चांगले दिसत नाही.

**मा. सभापती :-**

चांगले दिसते मला. मी त्यांना बोलायला देतो जेवढे तुम्हाला बोलायचे आहे तेवढे तुम्ही बोला. त्यांना मी प्रतिसाद देतो. अधिकारी म्हणून जेवढे बोलायचे आहे तेवढे बोला मला त्याची हरकत नाही. कानूनी आहे तर कानूनी आहे आणि गैरकानुनी आहे तर गैरकानुनी आहे.

**मिलन म्हात्रे :-**

प्रशासनाकडून कशा चुका होतात ते आपण बघा. परत परत आम्हाला सांगत राहावे लागते, आता आपल्याकडे उपआयुक्त दर्जाचे अधिकारी आहेत. जो जुना ठराव आहे भाईंदर पश्चिम त्या ठरावात चुका झाल्या आहेत. पण आपण नविन जर आजच्या तारखेला सभागृहासमोर जे डॉक्युमेंट आम्हाला सादर करता त्याच्यामध्ये ही जुनी लिस्ट आणि मॉडिफाय लिस्ट त्याच्या पाठीमागे लागली पाहिजे. म्हणजे सुधारित लिस्ट. आपल्या नगरपालिकेने, महानगरपालिकेने मिरा रोडला एवढे मोठे मार्केट बांधले आहे. भरपूर मोठे मार्केट बांधले आहे त्याच्यावर लाखो रुपये खर्च केले आहे.

**दिपक खांबीत :-**

आपण ते बांधले नाही. ते खाजगी बांधण्यात आले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्याच्यावर मिरा भाईंदरचे असे लिहिले आहे. आपण जाउन जरा बघून या. आपण नीट एकदा व्यवस्थित सांगा ते आपले मार्केट नाही आहे. त्याचा मालक कोण? त्या मालकाचे नाव द्या. कोणी बांधले आहे. त्याला आपण परमिशन दिले होते का? सातबारा कोणाच्या नावावर आहे. सरकारी जागा असेल तर दुसरा कसा बांधतो.

**दिपक खांबीत :-**

ते आपल्या मालकीचे नाही तेवढे नक्की.

**मिलन म्हात्रे :-**

मग, मी विचारतो त्याचे आपण मला उत्तर द्या. आपण जी मार्केटची लिस्ट टाकली आहे त्याच्यात खर्च तुम्ही केला आहे का?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

नाही.

**मिलन म्हात्रे :-**

जागा कोणाची आहे. मी विचारलेल्या प्रश्नांची मला उत्तरे द्या. सातबारा उताऱ्यावर मालकाचे नांव काय आहे. त्या मार्केटला तुमची परमीशन आहे का? बांधकाम करताना परमीशन घ्यावी लागते.

**नितीन ठाकूर :-**

साहेब, मी मघाशी विचारले होते, आपण जे शॉपिंग सेंटर बांधले आहे, गाळे बांधले आहे. त्याला नगरपालिकेची मंजूरी घेतली आहे का?

**दिपक खांबीत :-**

अंदाजपत्रकाला मंजूरी आहे.

**नितीन ठाकूर :-**

बांधकामाला मंजुरी आहे का?

**दिपक खांबीत :-**

नगरपालिकेची मंजुरी आहे. अंदाजपत्रकाला मंजुरी आहे.

**नितीन ठाकूर :-**

अंदाजपत्रकामध्ये त्यांना कोणत्या सुविधा आहेत ते आपण आम्हांला सांगाल का? फक्त गाळेच आहेत की अजून काही आहे.

**दिपक खांबीत :-**

एस्टीमेटला मंजुरी आहे. प्लॅनला मंजुरी नाही.

**मिलन म्हात्रे :-**

मार्केटचे त्यांनी जे सांगितले पण आपला ठेकेदार तिथे जाउन वसुली करतो. त्यांनी काय सांगितले ते खाजगी मार्केट आहे. तिकडे स्लॉटर हाऊस आहे. बकरे कापले जातात. त्यासाठी परवानगी लागते. पैसे घेतो. टाउन प्लॅनिंगने रितसर सांगावे या प्रायव्हेट मालकाने प्लॅन पास केला होता. तिथे आमचे कमर्शिअल झोन होते आणि त्याच्यामध्ये आम्ही त्यांना परमिशन दिली. नंतर त्यांनी ते स्ट्रक्चर बांधले. आणि त्यानुसार आम्ही ह्या ह्या तारखेला परमिशन दिली, सी.सी., आय.ओ.डी. वगैरे सगळी. आमची काही हरकत नाही. जर ते त्यांनी बांधले असेल तर आपली माणसे जाउन बाजार फीची पावती कशी फाडतात? आपले कलाकार जाउन पैसे घेतात. मी हवे असल्यांस आपल्याला पुढच्या मिटींगला पावत्या देतो. या लिस्टमध्ये काही विक्रेत्यांची संख्या कमी आहे. ती मॉडीफाय करुन घ्या. अशी माझी सुचना आहे.

**अनंत पाटील :-**

मासळीसाठी आपण जवळ जवळ ६०० रुपये भाडे ठेवले आहे. मटणासाठी ८०० रुपये भाडे ठेवले आहे. राई गावात मासळी विकणारे बरेच कमी आहेत. जे ग्रामीण भागातील लोक आहेत. बाहेरुन येणारे लोक येथे येउन विकतात ते टेंपररी असतात. आणि ही भाडेवाढ करतांना ग्रामपंचायतीच्या वेळेचे जे लोक आहेत, ते कटलरी सामानांचे असे दुकान आहेत त्यांनासुद्धा त्याच रेटमध्ये तुम्ही देता. आणि त्यांनी स्वतः इलेक्ट्रीसिटी घेतलेली आहे. स्वतः तेथे बांधकाम केलेले आहे. आणि अशा लोकांना तुम्ही मार्केटमध्ये असते तर आम्ही मान्य केले असते. मार्केटमध्ये एकही गाळा नाही. ओपन आहे. मग त्यांना तुम्ही भाडेवाढ कशी केली.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य आपण ठरवावे की, भाडेवाढ किती करायची आहे?

**अनंत पाटील :-**

ग्रामपंचायतीने कटलरी सामांनांसाठी जवळ जवळ वार्षिक भाडे २५० रुपये होते. ते तुम्ही डायरेक्ट ६०० रुपये महिना केलेले आहे. हे कितीतरी पटीने जास्त आहे.

**दिपक खांबीत :-**

रस्त्यावर बसणाऱ्यांकडून आपण १० रुपये घेतो. ३०० रुपये महिना घेतो.

**अनंत पाटील :-**

हे कटलरी सामान विक्रेते ग्रामपंचायत पासूनचे आहेत. त्यांनी स्वतंत्र बांधकाम केलेली आहेत. लाईटची व पाण्याची व्यवस्था स्वतंत्र आहे. विशेष म्हणजे या ठरावात राई गावाचे नांवच नाही.

**दिपक खांबीत :-**

दुरुस्ती करुन घेण्यांत येईल.

**नितीन ठाकूर :-**

साहेब तुम्ही सभागृहात जे विषय आणता त्याची माहिती देत नाहीत.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, इतर विक्रेत्यांना ६०० रुपये आहेत आणि मटन विक्रेत्यांना ८०० रुपये आहे. आज आपण जो काही डिसीजन घेणार आहोत तो पुढच्या काही वर्षा करिता लँडमार्क डिसीजन राहणार आहे. हे जे रेट दिलेले आहे त्याची अपेक्षित रक्कम आपण बजेटमध्ये पकडलेली आहे. त्यामुळे सर्व सदस्यांनी कृपा करुन हे लाईटली घेउ नये. जर आपण त्यांना जास्त डिफरन्स दिला तर बजेटवर इफेक्टेड होणार. त्या अमाउंटनुसार आपण मच्छीमार्केटच्या डेव्हलपमेंटची रक्कमसुद्धा म्हणजे आपण त्या इमारती बांधायच्या आहेत. भविष्यात काही बाजारपेठ डेव्हलप करायची आहे. त्याच्यावरती आपण या काही रक्कमा अंदाजित केलेल्या आहेत. त्या सिटींगला मी होतो. ही चर्चा झाली त्यावेळेला धनराजजी गारोडीया पण त्या मिटींगला हजर होते. आता त्यावेळेचे आम्ही दोघेजण आहोत. आणि अशोक पाटील एखादे वेळेस त्या मिटींगला होते. माझी सभागृहाला आणि आपल्याला अशी विनंती आहे, दरवेळेला हा वाद राहतो की, आपण ज्यांच्याकडून जे भूईभाडे घेतो त्यांच्याकडे आपण जर स्पेसिफीक दाखला किंवा एखाद कार्ड जर बनवले की मी भोगवटादार आहे किंवा हे भोगवटादार असून ह्यांची एवढी रक्कम स्विकारलेली आहे. आणि ते त्यांना जर लॅमिनेट करुन दिले तर त्यांच्याकडून भुईभाडे प्लस बाजाराची वसुली ही जी डबल रक्कम आता जाते किंवा भविष्यात जाणार आहे तर दररोजच्या मारामाऱ्या होणार नाहीत. ह्याच्यामध्ये आपण सहाशे रूपये जी अमाउंट दिलेली आहे. ॲक्चुअल त्यांचा प्रति महिन्याला वीस रूपयाच्या हिशोबाने सहाशे सहाशे रूपये म्हणजे बाराशे बाराशे रूपये खर्च येतो. त्याकरिता आपण जर ती काय पद्धती दिली फोटो लावून त्यांच्यावर सील मारून वगैरे दिले तर त्याच्यामध्ये सहाशे रूपये त्यांचे तसे ही कमी होतील. म्हणजे ज्याच्याकडे ती आयडेन्टी कार्ड सारखे असले तर वाद तिथे मिटेल, पैसे देता येणार नाही. म्हणजे त्याला तो एक फायदा होणार आहे त्या विक्रेत्याला आणि आपले जे सहाशे आहेत त्याच्या ऐवजी पाचशे करा. शंभर रूपयाची आपण त्यांना रिलिफ देउ कारण लाईट बिल वाढलेले आहे आणि जी जंतूनाशके मारतो ती पण भरपूर वाढलेली आहे. साफसफाईला आपण एका मजूराला ८५ रूपये देतो. ह्या सगळयाचा विचार जर आपण केला तर ठिक आहे प्रशासनाने त्यावेळेला म्हणले जवळ जवळ ३/५/२००३ सभा झाली होती. आपण सहाशे दिले आहे त्याच्यात माझे असे मत आहे की, पाचशे रूपये करावे आणि या येथे सात-आठशे रूपये करावे. पण हे करत असताना त्याच्यात तुम्हाला कुठले स्लॉटर हाउस उघडावे लागणार आहे आणि त्यांचे जे बीफ व जे काय असेल बकऱ्याचे मटण ते तुम्हाला तुमच्या स्लॉटर हाउसमध्ये आणून द्यावे लागणार आहे.

**अनंत पाटील :-**

मार्केटच्या आतमध्ये जे बसले आहेत त्या संदर्भामध्ये आहे. पण मार्केटच्या जर कोण बाहेर बसले आहेत त्यांना हा रेट कसा काय लावणार. बाहेर जे आहेत त्यांना तुम्ही नोटीसा देउ नका. अंतर्गत गाळ्यांना जे रेट लावले आहे त्याला मी सहमत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपण एकूण किती नोटीसा काढल्या आहेत त्याची माहिती द्यावी.

**अशोक पाटील :-**

सभापती साहेब, आता जो विषय आपण आणलेला आहे ते आपल्या महानगरपालिकेच्या मालकीचे मार्केट आहेत त्यांच्या भाड्यासंदर्भातच आहे. तशी सुधारणा करा की, महानगरपालिकेच्या मालकीचे मार्केटर्स आहेत त्याच्यासाठी हा भाडे प्रस्ताव आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपण हे जे मासिक भाडे घेणार आहात त्यांना तुम्ही काय देणार आहात. मटणवाल्यांकडून तुम्ही साडे आठ हजार रूपये घेणार आणि मासळीवाल्यांकडून सहा हजार रूपये प्रतिवर्षी घेणार. तर आपण त्याच्यांकडून एवढे सहा हजार घेतल्यानंतर पातळ पावती देणार काय जी लगेच फाटेल. त्याला चांगली अशी एखाद्या सहाशे रूपयासारखी त्याला किंमतदेखील असावी. कमीत कमी सहा रूपये कॉस्ट असेल असे मजबूत डॉक्युमेंट द्या.

**दिपक खांबित :-**

आपण त्यांच्याशी ॲग्रीमेंट करणार.

**अशोक पाटील :-**

ॲग्रीमेंटचा कालावधी काय आहे. वर्षाचा रेन्यु करणार की तीन वर्षानी करणार.

**दिपक खांबीत :-**

कायद्याची बाब बघून प्रशासन निर्णय घेईल.

**मिलन म्हात्रे :-**

फेरीवाला तुमचे ॲग्रीमेंट घेउन बसणार नाही. ती पावती घेउन तो बसणार आहे. उद्या अतिक्रमणवाले गेले तर ते पण उचलून त्यांना घेउन येतील. आपण त्यांना व्यवस्थित ते डॉक्युमेंट लॅमीनेट वगैरे करून दिले ते महिनाभर तरी राहिल. केळकर साहेब आपण आज या ठरावाला मंजूरी देणार आहोत तर ज्यांच्याकडे लायसन्स नसेल त्यालापण मिळेल. म्हणून पहिले लायसन्स दिले आहेत का, त्याची खात्री करा आणि त्यांना लगेच लायसन्स नोंदणीसह देउन टाका. स्ट्रक्चरची परवानगी मागवली आहे का त्या लायसन्समध्ये. ठरावाची ही जी वसुली करण्याच्या अगोदर पहिले त्यांना तुमच्या विभागातर्फे विधीवत ठेवा अधिकृत. लायसन्सचे करून घ्या आणि ठरलेल्या भाड्याने आकारून घ्या.

**मा. सभापती :-**

सदरचा विषय पाचशे आणि आठशे रूपयांनी मंजूर करण्यात आला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, आपण जो भुईभाडेचा विषय घेतला आहे. त्याच्यात आपल्या नेहरू नगरमध्ये जी लोक मार्केटमध्ये बसत नाही. अशा लोकांच्या घराना ह्याच रेटने भुईभाडे लावले आहे. हे भुईभाडे ग्रामपंचायतीपासून आहे. या ठरावाचा अंमल त्या भुईभाडयाला देउन ही अमाउंट त्याच्याकडून वसुल केली आहे आणि ही कमर्शियल अमाउंट आहे. त्याचे जर सहाशे रूपये लागत असेल, ती लोक तिथे राहतात फार जुनी लोक आहेत चिंचेच्या झाडाखालची नेहरूनगरची वस्ती. त्यांना तुम्ही भुईभाडे ह्या रेटने लावलेले आहे. कमर्शियलचा रेट आकारून लावले आहे. त्याचे तुम्ही भुईभाडे किती होते, काय होते ते आपण आधी फिक्स करा.

**मा. सभापती :-**

हे कमर्शियलला एवढ्याशा जागेसाठी आणि त्यांचे राहण्याचे घर एवढे मोठे झाले, त्याप्रमाणे लागले असेल.

**मिलन म्हात्रे :-**

आपण टॅक्सवाल्यांना विचारा की, रेट काय लावले आहे. त्याच्यात काय झाले आहे ते देखील विचारा. हे जे भुईभाडे आकारले गेले ते काय रेटने आकारले गेले त्याच्यात त्यांना माफी दिली का?

**विजय पाटील :-**

नेहरू नगरमध्ये जे राहतात त्यांना जुन्या रेटने बिले आकारून दिली आहेत.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

नेहरू नगरमध्ये गेल्या अनेक वर्षापासून ग्रामपंचायतीच्या काळापर्यंत भुईभाड्याने राहण्याकरिता जागा दिल्या होत्या. त्यांना जी भुईभाड्याची आकारणी करण्यात आलेली आहे.

**विजय पाटील :-**

नेहरू नगरमध्ये जे भुईभाडेधारक आहेत. त्यांना आमच्याकडून कमर्शियल रेटने जे बिल गेले होते ते आम्ही मागे घेतलेले आहे आणि त्यांना जे पुर्वीचे भाडे आहे त्याप्रमाणे त्यांना रहिवासदाऱ्यांचे बिल पाठवणार आहे.

**अनंत पाटील :-**

ते भाडे कधीपासून आकारणार आहात.

**विजय पाटील :-**

ह्या वर्षापासून आकारणार आहे.

**प्रकरण क्र. १६६ :-**

भुईभाडे आकारणीबाबत विचार विनिमय करणे.

**ठराव क्र. १४६ :-**

imara¹Baa[-Mdr mahanagarpailaka h_It mahanagarpailakocyaa maalakIcyaa maasaLI va maTna maako-T maQyao basat Asalaolyaa ivaËo%yaaMkDUna BaaDo AakarNyaasa maa.sqaayaI saimatI saBaa id.03.05.03 zrava Ë.18 Anvayao inaNa-ya Jaalaolaa Aaho. prMtU sadr zravaanaUsaar BaaDo AakarNaI krtanaa maasaLI ivaËo%yaaMkDUna tËarI Aalyaava$na maasaLI maako-T maQyao basaNaa¹yaa maasaLI ivaËo%yaaMkDUna $.600À¹ p`it maihnaa BaaDo AakarNaIt badla k$na $.500À¹ p`it maihnaa BaaDo AakarNyaasa va maTna ivaËo%yaaMkDUna $.800À¹ p`it maihnaa yaa dranao BaaDo AakarNyaasa maMjaUrI doNyaat yaot Aaho. sadr ivaËo%yaaMnaa %varIt laayasansa doNyaat yaavaot.

**सुचक :- श्री. मिलन म्हात्रे.** **अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १६७ चे वाचन केले.)

**जोजफ घोन्सालविस :-**

डोंगरीच्या व्यायाम शाळेचे त्याचे संचालन कोण करणार आहे.

**दिपक खांबीत :-**

महानगरपालिका करणार आहे.

**जोजफ घोन्सालविस :-**

त्याला शिक्षक वगैरे कोण?

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सभापती साहेब, सदस्यानी जो प्रश्न विचारला आहे त्याला अनुसरून आपल्या परवानगीने बोलतोय, सद्य स्थितीमध्ये डोंगरी गावामध्ये एक रजिस्टर संस्था आहे. अजून पर्यंत व्यायाम शाळेचे पुर्णः काम सुरू आहे. बांधकाम पुर्ण झाले आहे आणि व्यायामाचे जे साहित्य होते ते अर्धवट अवस्थेमध्ये असल्यामुळे सध्यस्थितीमध्ये डोंगरी गाव मंडळ त्यांनी मला तसे पत्र दिले आहे. आणि संपूर्ण काम झाल्यानंतर महानगरपालिकेला तसे पत्र देउन परवानगी घेणार आहे.

**नितीन ठाकूर :-**

सभापती साहेब, जर का एका मंडळाने मागणी केली असेल व्यायाम शाळा चालविण्याकरता तर ती देण्यात यावी. कारण मंडळ व्यवस्थित चालवू शकेल.

**दिपक खांबीत :-**

मागणी केलेली नाही.

**धनराज अग्रवाल :-**

मागणी केलेली नाही. आपण तीन लाख रूपये त्याच्यात लावणार आहे. तर त्याच्यावर देखरेख कोणाची, कोण आले तर त्याचे पैसे घेणार काय?

**हॅरल बोर्जीस :-**

प्राथमिक स्वरूपामध्ये मी त्यांच्याशी बोललो असताना त्यांनी पुर्ण कल्पना दिली की, जवळ जवळ दिडशे ते दोनशे युवक जे व्यायाम शाळेचे उपयोग करणार आहे. ते मासिक स्वरूपामध्ये त्यांची जी वर्गणी आहे ती काढण्यासाठी तयार आहेत. आणि जो देखभालीचा खर्च जसे लाईटची व्यवस्था व बाकी इतर ज्या गोष्टी आहेत त्या गोष्टीची सर्वस्वी जबाबदारी त्यांची राहणार आहे.

**धनराज अग्रवाल :-**

सर्व पैसे तेच घेणार व ते देखभाल करणार. मग आपण त्याला पैसे लावणार तर त्याच्यात काय.

**हॅरल बोर्जीस :-**

ही जी व्यायाम शाळा आहे ती सर्व सदस्यांना माहिती असेल खासदार फंडातून ही व्यायाम शाळा बांधली गेली आहे. आणि मी मागच्या स्थायी समितीमध्ये नसताना त्यावेळेला जे वाढीव काम झाले होते त्यावाढीव कामाला सभेने मंजूरी दिली होती. आणि आता व्यायाम शाळेचे जे साहित्य आहे तर मी मागे आयुक्त साहेबांशी बोललो साहेब जर आपण पाच साडेपाच लाख रूपये खर्च करतो आणि त्या व्यायाम शाळेला आपण जर साहित्य उपलब्ध करून दिले नाही. तर आपण केलेला खर्च हा व्यर्थ आहे. त्या अनुषंगाने सन्मा. सभापती साहेबांबरोबर मी बोललो आणि सभेवर त्यांनी तो विषय घेतला.

**दिनेश नलावडे :-**

सभापती साहेब, आपल्याकडे हा विषय आलेला आहे. आता बोर्जीस साहेब बोलले तिथे ते मंडळ चालवायला घेणार आहे. तर माझे असे मत होते की, महानगरपालिका आपली आहे आणि आपण ती शाळा खासदार फंडातून बांधली आहे.आज साहित्य पुरवठा करण्यासाठी महानगरपालिकेकडे आपल्याकडे हा विषय आलेला आहे. सन्मा. सदस्यांना विनंती करतो की, जर ते मंडळच साहित्य वगैरे घेत असेल आणि ते चालवत असेल तर आपला तेवढा महानगरपालिकेचा देखील फायदा होईल. आणि जो इतर खर्च आहे ते मंडळ त्या पद्धतीने तो खर्च घेउ शकतो. असे जर त्या मंडळाने स्विकार केला तर चांगली गोष्ट आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सभापती साहेब, आपल्या माहितीसाठी सांगू इच्छितो आमच्या बाजूला राई म्हणून गाव आहे. व तिथे देखील एक व्यायाम शाळा आहे. त्या व्यायाम शाळेला संपुर्ण साहित्यसह संपुर्ण प्रिमायसेससह खर्च आपल्या तत्कालिन नगरपालिकेने केलेला आहे. असा विषय नाही की, आपण फक्त डोंगरी व्यायाम शाळेसाठी खर्च करतोय.

**दिनेश नलावडे :-**

जर ते मंडळ या खर्चाला तयार होत असेल तर.

**अनंत पाटील :-**

राईला जी व्यायाम शाळा बांधलेली आहे. परंतु त्या व्यायाम शाळेला नगरपालिकेने काय खर्च केलेला आहे का? की तुम्ही कुठल्या संस्थेला भाड्याने दिलेले आहे. व्यायाम शाळा तिथे आहे दुसरा माणूस येउन तिथे साहित्य जमा करतो. पण त्याला नगरपालिकेने रितसर परवानगी दिली आहे का?

**याकुब कुरेशी :-**

खासदार फंडातुन एखादी वस्तु उभारण्यात आली. तर त्या इमारतीवर कोणाचा हक्क असतो, नगरपालिकेचा का एखाद्या प्रायव्हेट संस्थेचा. पाटील साहेबांच्या म्हणण्याप्रमाणे ती व्यायामशाळा नगरपालिकेच्यावेळी खासदार फंडातून बांधण्यात आली होती. आणि त्याच्यावर एक प्रायव्हेट व्यक्ती पैशाची वसुली करते.

**दिपक खांबीत :-**

साहेब, याबाबत चौकशी करतो.

**धनराज अग्रवाल :-**

एक चालू आहे व दुसरी आपण बांधली आहे. त्याला आपण सामान पुरविणार आहे. कोणतरी खाजगी संस्था त्याला परत तसेच वसुली करून चालविणार आहे. त्याच्यावर आपले काही नियंत्रण आहे का? आपण त्याचे भाडे ठरवून देणार आहे का? त्याची फी कोण ठरवून देणार आहे. एवढा पूर्ण खर्च आपण करतो त्याची फी कोण ठरवणार.

**दिपक खांबीत :-**

स्थायी समिती ठरवणार.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सभापती साहेब, हा जो विषय धनराजजी अग्रवाल साहेब बोलतात त्याचे व्यवस्थापन कोणी हाताळायचे हा भाग नंतरचा आहे. जर महानगरपालिका सक्षम असेल तर मी पहिले प्राधान्य महानगरपालिकेला देईल. मी एक स्थानिक नगरसेवक या नात्याने या विषयाला एवढ्याच पुरताच मर्यादित ठेवलेले आहे कारण सध्या व्यायाम शाळा पुर्ण नाही. आणि जर महानगरपालिकेच्या संराउडिंगने बऱ्याचशा व्यायामशाळा झाल्या होत्या त्या किती चालल्या, किती चांगल्याप्रकारे त्याचे देखभाल केले गेले. ते आपल्या सर्वांना ज्ञात आहे आणि जर महानगरपालिका त्याची देखभाल करू शकत नसेल तर त्या संस्थेला तुम्ही विचारा.

**धनराल अग्रवाल :-**

महानगरपालिकेने व्यायामशाळा चालविली पाहिजे. त्या मताशी आम्ही आहोत. आणि जर कोणी संस्थेने चालवायला घेतले तर आमचा काही विरोध नाही आहे. पण आता जे खर्च करताना आमदार फंड, खासदार फंड खर्च देखील केले आहे. आता पर्यंत आपण तीन लाख रूपये खर्च करतोय. मग त्याच्यासाठी आपली व्यवस्थादेखील पाहिजे. व नंतर विषय येणार आहे कोणी संस्था मागते कुठल्या हिशोबाने मांगते. व किती भाड्याने मागते व आपण कसे वसुल करणार ते नंतर विषय येणार आहेत. पण हे पैसे लावून तिथे सोडले तर तिथे कुलूप तर लावले पाहिजे. त्याला कुलूप कोण लावणार ?

**दिपक खांबीत :-**

साहेब, व्यायामशाळा साहित्यसह अद्यावत झाली की, आपल्याला त्यादरम्यान अर्ज आले तर स्थायी समितीपुढे ठेऊ

**धनराज अग्रवाल :-**

अर्ज आले नाही तर काय?

**दिपक खांबीत :-**

अन्यथा आपणच चालवणार.

**धनराज अग्रवाल :-**

आपल्या माणसाचे पहिले तिथे प्रोव्हीजन पाहिजे. टाळा लागला पाहिजे. आणि जो पर्यंत आपण संस्थेला देत नाही तोपर्यंत भाडे ठरवून आपण चालू केले पाहिजे. पैसे लावले आणि ते तसेच पडले. तर त्याचा काय फायदा आहे.

**मा. सभापती :-**

आपण त्याला भाड्याने द्यायचे ठरूया.

**याकुब कुरेशी :-**

तो तर पुढचा भाग आहे. आता व्यायाम शाळेला जे साहित्य घ्यायचे आहे ते साहित्य घेण्याकरिता मंजूरी द्यावी.

**नितीन ठाकूर :-**

सर्वप्रथम साहित्याला मंजूरी द्यावी व रखवाल्याकडून रखवाल केंद्र काढावे. एक रखवालदार मागवावा.

**चंद्रकांत वैती :-**

मा. सभापती साहेब, हा विषय आपण आज व्यायाम शाळेला साहित्य पुरवठा करण्याचे आणि ते खरेदी करण्याचा एक अतिशय सुक्त असा उपक्रम हे शहर खरोखर सुदृढ बनवायचे असेल, तर व्यायाम शाळांची निर्मिती झाली पाहिजे. आणि आज ही योजना यशस्वी झाल्यानंतर मला वाटते प्रत्येक नगरसेवकाला वाटेल की, माझ्या प्रभागामध्ये एक व्यायाम शाळा पाहिजे. म्हणजे नक्कीच उद्या मागणी पुढे येणार आहे. आणि ही मागणी पुढे ज्या ज्या वेळेला येईल त्या त्या वेळेला आपल्याला ह्या तरतुदी कराव्या लागतील. यासाठी निदान आज आपल्याकडे असे एक पॉलिसी आखायला पाहिजे की, आपल्याला कशाप्रकारे आणि कितपर्यंत सहाय्य देता येईल. कारण आधुनिक साहित्य खरेदी करण्याचा

तर आज एक इलेक्ट्रानिक वॉकर दिड लाखाला एक वॉकर मिळतो, तसा तीस हजाराला ही मिळतो. मग आपल्याला संपुर्ण शहरामध्ये नगरसेवक मागण्या करतील व कुठे जागा आहे हा शोध आजपासून सुरू होईल. सरकारी जागा कुठे आहे आणि आम्हाला चार भिंती कुठे उभारता येईल कारण साहित्य येथूनच मिळणार आहे. आमदार व खासदार फंडातून सगळीकडे व्यायामशाळा बांधणे हे होणार नाही. उद्या नगरसेवक स्वतःचा फंड देखील व्यायाम शाळेसाठी वापरावा म्हणून सांगतिल. मग त्या ठिकाणी आपल्याला कशा प्रकारे देखरेख ठेवता येईल. व त्या सामानाची विल्हेवाट लागणार नाही. कारण बरेच लोक सामाजिक क्षेत्रात काम केलेले आहे. आपण वर्गण्या काढून स्वतःच्या खिशातला खर्च करून व्यायाम शाळा बांधलेल्या आहेत. थोडस आपले दुर्लक्ष झाले आहे की, त्यातले डंबेल्स, वेट कोणाकोणाच्या व्यायामपट्टूच्या घरी सापडतात. तर तशी परिस्थिती होउ नये. तर त्याबाबत आपल्याकडे निश्चित धोरण पाहिजे. अशा खरेदीला मंजूरी देण्यात यावी. परंतु त्याच्यासाठी काय उपाययोजना करणार आहात, या उपाययोजना आपल्याकडे तयार पाहिजेत.

**याकुब कुरेशी :-**

या उपाययोजना आपल्यासमोर सभेत येतीलच. व त्याच्याप्रमाणेच आपण ठरूया.

**चंद्रकांत वैती :-**

त्या अधिका-याने त्या योजना आपल्यापुढे तयार ठेवाव्यात. व व्यायाम शाळेच्या साहित्यासाठी मंजूरी द्यावी त्याबद्दल कुठलेही दुमत नाही. व कोणी विरोध करावा असा विषय देखील नाही आहे.

**धनराज अग्रवाल :-**

ही योजना आली पाहिजे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सभापती आपल्या मान्यतेने सांगतो की, आमच्या वसईमध्ये आपणा सर्वांना माहिती असेल की मामासाहेब मोहोळ क्रिडाभवन महापालिकेने उभारले आहे. त्याचप्रमाणे उरण येथे एक सातवी व्यायाम शाळा नगरपालिकेने बांधली आणि या शाळेचे मेनटेन्स सर्व त-हेचे मेनटेन्स एका खाजगी संस्थेमार्फत म्हणजे नगरपालिकेने एकही पैसा केला नाही. सर्व साहित्य त्या संस्थेने आणले. उरणला तर विजू पेणकरला ओळखत असाल ते स्वतः व्यायाम शाळा चालवतात. आणि ती व्यायाम शाळा उत्कृष्टरित्या चालत आहे. नगरपालिकेने दर निश्चित करून दिले. त्या दराने तो फी घेतो आणि तसे दर जर आपण पुढील सभेमध्ये आपण जर मान्य केले तर सर्व खर्च जीम चालवणा-याने करावा. त्याचे मेनटेन्स त्यांनी करावे व त्याचे इलेक्ट्रीकचे बिल त्यांनी भरावे. असा प्रस्ताव असेल तर आपले आर्थिक बरडन आपल्यावरील कमी होईल. आणि व्यवस्थितपणे व्यायाम शाळा चालू शकते.

**दिनेश नलावडे :-**

आता मान्यता फक्त मशिनरीसाठी आहे आणि केळकर साहेबांनी जी माहिती दिली. ती चांगली माहिती आहे. परंतु आपण जेव्हा हे चालवायला देउ त्यावेळी नो लॉस नो प्रॉफीट या बेसवर नागरिकांना सुविधा मिळायला पाहिजे. परंतु हा विषय नंतरचा आहे. आता ह्याविषयाला वैती साहेबांना मान्यता दिलेली आहे आणि मी ह्याला अनुमोदन देतो.

**प्रकरण क्र. १६७ :-**

डोंगरी येथील व्यायाम शाळेसाठी व्यायामाचे साहित्य खरेदी करणेंस मंजुरी देणे.

**ठराव क्र. १४७ :-**

imara¹Baa[-Mdr mahanagarpailaka h_It DaoMgarI yaoqao vyaayaama SaaLa [maart baaMQaNaot AalaI Aaho. vyaayaamaSaaLocao caT[- xao~ 101.85 caaO.maITr evaZo Aahot.

sadr vyaayaama SaaLocaa vaapr krNaocyaa dRYTInao vyaayaama SaaLot vyaayaamaacao saaih%ya KrodI k$na basaivaNao AavaSyak Aaho. sadr kamaI saaobat jaaoDlaolyaa maahItIp`maaNao saaih%ya KrodI kravayaacao Aaho. hyaa kamaI $.2.75 laaK evaZa Kca- Apoixat Aaho.

sadr kamaasaazI “iËDa saMkUla va maOdana ivakasa” yaa laoKa iSaYaa-KalaI puroSaI trtUd ]plaQba Aaho.

trI sadr kamaI haoNaa¹yaa Kcaa-sa inaivada maagavaUna maanyata p`aPt AiQakRt ]%padkaMkDUna saaih%ya KrodI krNaoMsa hI saBaa maMjaurI dot Aaho.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १६८ चे वाचन केले.)

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय, १/११/२००३ पासून आपण स्वतंत्र पथक निर्माण केले आहे. असे गोषवाऱ्यामध्ये आहे. १/११/२००३ च्या पूर्वी पहिले मोकाट जनावरांचा १०० रूपये व नंतर ५०० रूपये केले. ५०० रूपये केल्यानंतर आपल्याकडे किती जनावरे आली आणि किती जनावरे सोडून नेले. त्याचा रेकॉर्ड आपल्याकडे आहे का?

**एस. एस. पाणपट्टे (मा. उपआयुक्त सो.) :-**

सदरची माहिती आपल्याला आरोग्या विभागाकडून मिळेल. मी १/११/२००३ ला चार्ज घेतला.

**धनराल अग्रवाल :-**

पहिले पण असे झाले आहे. मी चार्ज घेतला मला माहित नाही असे बोलून चालत नाही. त्या अधिकाऱ्याला तुम्ही बोलवा.

**एस. एस. पाणपट्टे (मा. उपआयुक्त सो.) :-**

१/११/२००३ पासून जेवढे जनावरे पकडले त्याची माहिती आरोग्य खात्याकडून मिळेल.

**धनराज अग्रवाल :-**

१/११/२००३ पासून नाही, मी मागचे विचारतो. पाचशे रूपये लागू झालेले आहे. तेव्हा पासून आपण किती जनावरे पकडली आहेत.

**मा. सभापती :-**

धनराज अग्रवालजी कार्यवाही होत नाही म्हणून त्यासाठी कडक कार्यवाही करायचे ठरवले आहे.

**धनराज अग्रवाल :-**

दोन हजार रूपये झाले तर कार्यवाही होईल का? मला असे विचारायचे आहे की, किती मोकाट जनावरे पकडली आणि आपण किती दंड वसूल केला. आपण आता जसे पकडतो तसे परत सोडतो. तसे परत सोडणार नाही का? साहेब, असे होत असते पाचशे आहेत तर दोनशे रुपये घेउन सोडतात. दोन हजार झाले तर किती पैसे मागणार. परटीक्यूलर कोणी लिहिलेले नसते पैसे देउन ते सोडून नेतात.

**एस. एस. पाणपट्टे (मा. उपआयुक्त सो.) :-**

आम्ही रजिस्टर करणार आहोत.

**धनराज अग्रवाल :-**

साहेब, रजिस्टरमध्ये काय लिहून घेणार आहात का?

**एस. एस. पाणपट्टे (मा. उपआयुक्त सो.) :-**

रोजचा रोज अहवाल त्यात लिहिला जाईल.

**रिटा शाह :-**

साहेब, त्यांचा बोलण्याचा अर्थ असा आहे आपण दोन हजार रूपये ठरवले आहे, जर आपण त्यांना पकडले तर दोन हजार रूपये भरायचे आणि नंतर जनावरे सोडायचे. पण ह्यांचा बोलण्याचा अर्थ असा आहे की, दोन हजार रूपये न घेताना पावती फाडत नाही. नुसते हजार रूपये घेतात आणि खिशात टाकतात आणि जनावरांना सोडून टाकतात असा विषय आहे.

**एस. एस. पाणपट्टे (मा. उपआयुक्त सो.) :-**

असे होणार नाही.

**धनराज अग्रवाल :-**

पाचशे रूपये घेउन किती जनावरे सोडली आहेत ते आपण आम्हाला सांगा.

**एस. एस. पाणपट्टे (मा. उपआयुक्त साो.) :-**

आम्ही आतापर्यंत १९ जनावरे सोडली आहेत व ९७००/- रूपये जमा केले आहे.

**धनराज अग्रवाल :-**

किती दिवसापासून पाचशे रूपये लागले आहेत. साहेब, आपण दिले आहे की, मुंबई जिवदया मंडळ घेउन जाणार आहे. तर त्याच्यासाठी आपण कोणीतरी अधिकारी तिथे दिला होता का? त्याने तिथे जाउन चौकशी करून आला आहे का?

**मा. सभापती :-**

चौकशी करून आला आहे.

**धनराज अग्रवाल :-**

त्याने तिथे काय चौकशी केली.

**मा. सभापती :-**

ते त्यांना तिथे घेउन जाणार आहे.

**नितीन ठाकूर :-**

सभापती साहेब, आपण हे ओळखणार कसे? नगरपालिकेने पकडलेले हे जनावर आहे. आपण जे आदेशात दिलेले आहेत. ते भाईंदरमध्ये येऊन विकले तर ओळखणार कसे काय? काय शिक्का मारणार का? नगरपालिकेने पकडले काय मार्किंग तुम्ही त्यावर करणार का?

**एस. एस. पानपट्टे (मा. उपआयुक्त साो.) :-**

जर आपण ते जनावर गोशाळेला दिले नाही तर ते जनावर मरेपर्यंत आपल्याला पोसायला लागेल.

**नितीन ठाकूर :-**

मग तुम्ही जो प्रोव्हीजन आणलेली आहे. आपण ती पकडणार आणि त्या लोकांना देणार सांभाळण्याकरिता किंवा विकणार. त्यांनी पण इथे आणून सोडले पाहिजे. त्यांनी पकडल आणि इथे भाईंदरमध्ये आणून सोडल तर आपल्याला कसे माहिती पडेल हे जनावर म्हणून. तुम्ही कसे ओळखणार कसे हे जनावर आपण सोडल आहे.

**चंद्रकांत वैती :-**

मा. स्थायी समिती सदस्य आपला प्रमुख उद्देश असा आहे की, या शहरामध्ये मोकाट जनावरे फिरतात त्याचा बंदोबस्त करणे आपण इथे त्याच्यासाठी दंडाच्या रक्कमादेखील ठरवल्या आहेत. विशिष्ट वेळेमध्ये विशिष्ट कार्यकाळात जर ती मालक स्वतःची मालकी सिद्ध करु शकला नाही किंवा त्याने दंड भरला नाही तरच आपल्याला ती जनावरे त्या जिवदया संस्थेला दयायची आहेत आणि हे दिल्यानंतर आपली जबाबदारी संपते. तर आपण कोंडवाऱ्यामध्ये ही जनावरे ठेवल्यानंतर त्यांचा रोजचा पालनपोषणाचा खर्च करायचा आहे. आपला प्रमुख उद्देश आहे यामध्ये सर्व प्रकारची जी मोकाट जनावरे असू शकतील त्या सर्वांचीच नावे आहेत आणि तेवढा दंड आहे तर त्यामध्ये नंतर काय होईल? त्याची हत्या होईल का वगैरे अनेक प्रश्न आपल्या समोर उभे राहतील. परंतु आपल्याला या शहरात मोकाट जनावरे फिरणार त्याचा बंदोबस्त करायचा आहे. आणि जर मालकाने आपली जनावरे स्वतः सांभाळण्याची जबाबदारी घेतली तर रस्त्यावर मोकाट फिरायचा प्रश्न येत नाही. तर आपल्याला मोकाट जनावरांचा बंदोबस्त करणे हे आपले प्रमुख उद्दिष्ट आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

बरोबर आहे. पण अपण त्यांच्याकडे देऊ ते किती वेळ तिथे ठेवतील याची आपल्याला काय खात्री देतील जनावरे खरोखरच आपल्या उद्देशाप्रमाणे असतील, हे एक झाले आपण त्यांच्याकडे देऊ ते दुसरा धंदा करणार नाही हे कशावरुन? ते कत्तलखान्याला देणार नाही कशावरुन.

**एस. एस. पानपट्टे (मा. उपआयुक्त साो.) :-**

करारनामा त्यांच्याकडुन लिहुन घेणार कत्तलखान्यात पाठविणार नाही. किंवा फक्त आदिवासी लोकांना जनावरे देईल, असे लिहून घेणार.

**मिलन म्हात्रे :-**

ठराव क्र. १६१ मध्ये तिसऱ्या लाईनमध्ये सहा पथकात एकुण दहा कर्मचारी आहेत असे दिले आहे. ग्रॅमॅटिकल मिस्टेक अशी की या पथकात असे असले पाहिजे. इथे ठरावात सुधार करुन घ्या.

दुसरे आपण जे कॉलम दिले एक दोन तीन चार त्यामध्ये पाचवा कॉलम टाकुन घ्या. कारण आपण वर म्हणता की, आम्ही एक वाहन आणणार आहोत. त्याची वाहनाची म्हणजे तुम्ही सोय करणार आहेत. त्याच्यात वाहनाला ड्रायव्हर वगैरे असेल त्याचा खर्च हा आस्थापनेवर येणार किंवा उदया तुम्हाला ती सुविधा चालवायलाच लागणार त्याकरीता हे जे जनावर आहे त्यांना आणण्याचा वाहतुक खर्च आहे या शीर्षकाखाली एक अमाऊन्ट टाका. ती वाटल्यास इकडची डिलिट करुन तिकडे घ्या. आणि वाहतुक खर्च म्हणुन त्या वाहनाचा म्हणजे जनावरांचा ॲड करा आणि ते कापण्याचे आपण म्हणतो उद्या तुमच्या महानगरपालिकेला ही खाण्याएवढी जेवढी जनावरे आहेत ही सगळी कापण्याची तुम्हाला कत्तलखाने चालू करावेच लागणार. त्याकरिता मेहेरबानी करुन बाऊ कोणी करु नये. बी.एम.सी.मध्ये जोशी साहेब सर्वोदय मंडळाचे होते त्यांचे आयुष्य गेले. ते वारलेसुद्धा. त्यांनी गोहत्या बंदीसाठी आयुष्यभर आमरण धरणच चालू होते. ते जे नियमात आहे. कायदयात आहे. मोठा मासा छोट्या माशाला खातो. जसे आपण मच्छी खातो तसे सगळयाचा धर्म असतो. कोणामध्ये खात नाहीत. कोणामध्ये खातात. काही खात नाही. आम्ही खातो आमचा धर्म आहे. तर हे जे काही आपल्याला कत्तलखाने काढायचे आहेत. ते काढावेच लागणार आहेत. आणि सगळ्यात वाईट अवस्था अशी आहे की, हे जे दुधविक्रेते आहे. ते एवढे बदमाश आहेत. हे दुभत्या गाई पहिल्या सोडून घेऊन जातात आणि म्हातारे बैल आहेत त्यांना न्यायला कोणी येत नाही. मग तिकडे गोमाता पण नसते आणि गोपिता पण नसतो. ते बेवारशी माता पिता असते जसे आपल्या घरात म्हातारे आई वडिल आपण निकाली काढतो. तशी ती जनावरे निकाली काढलेली तिथे बसून बसून आजारी होऊन मरतात. मग आपल्याला कधी पाहिजे तेव्हा डॉक्टर आणावा लागतो. आणि त्याची आपल्याला औषधपाणी पण करावी लागते जर एखादे जनावर दुर्देवाने मेले तर त्याच्यावर निराळे राजकारण होते. की देखो एक गाय मर गया, एक बैल मर गया हे सगळे टाळण्याकरिता हा जो ठराव आहे हा काही चुकीचा नाही आहे. आणखी एक आपली घोडबंदरला एक त्या गायमुखच्या चढणीवरती एक त्यांची गोशाळा आहे. तिकडेसुद्धा तुम्ही प्रयत्न करा. जर या संस्थेला जर त्रासदायक ठरत असेल तर तुम्ही ही सर्व जनावरे याच्यतील काही तिकडे देता येतात का बघा. तिकडे पण त्यांच्याकडे जागा भरपूर आहे. आपल्या हद्दीमध्येच ते आहे. आणि या ठरावात माझी अशी एक सुचना आहे की, मागे शिवमुर्ती नाईक साहेबांनी ही योजना काढली होती की जनावर पकडले की लगेच घोड्याची रेसकोर्सला पासिंग करुन तर त्याच्या तालेवरती शिक्का बिंबवला जातो.

**एस. एस. पानपट्टे (मा. उपआयुक्त साो.) :-**

तसे करता येणार नाही. त्याच्यावर बंदी आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मी खुरावर सांगतो, बघा दोन प्रकार आहेत. अंगावर म्हणजे मांसावरती डागणी देतात ते ही मला माहिती आहे. बी.एम.सी. पहिला शिक्का मारायचे त्यावर बंदी आहे. टाचेवर नाही, खुरावर नाही. खुरावर तुम्ही सिल बनवून तुम्ही हा ऑप्शन त्या जनावरांची ऑप्शनडेथ आणि आपले सिल. ते जर जनावर परत हद्दीत आले तर आपल्याला ते कळेल. ते करता येते का बघा. कारण त्याचा उल्लेख कुठेही या ठरावामध्ये नाही. कारण शिवमुर्ती नाईक साहेबांनी मागे ते आणले होते. मला चांगले आठवते आहे. त्यावर या विषयावर चर्चा झाली होती. आणि हा जो वाहतुकीचा खर्च आहे तो घ्या. औषधपाण्याचा खर्च पण कारण आपण तिकडे वैद्यकीय सेवा देतो.

**एस. एस. पानपट्टे (मा. उपआयुक्त साो.) :-**

इतर खर्चामध्ये करु.

**मिलन म्हात्रे :-**

ते स्पेसिफिक मेन्शन करा नाहीतर ते पुढे त्रासदायक होईल. तुम्हाला माहित नाही पाणपट्टे साहेब, याच्यामध्ये तुम्ही जोर मुद्दामून टाका. कारण मागे काही जनावरे आजारी पडली. तरी मुर्धावरुन जनावरे डॉक्टरांनी आमच्या खर्चाने आणली आणि औषध वगैरे सगळे केले.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, मिरा भाईंदर शहराचा मला १५ वर्ष मला झाली. हा प्रश्न माझ्याकडे आहे. जे कुत्रे फिरतात ते मोकाट जनावरे कुत्रे, डुक्कर, गाई आहेत. किंवा आणखी आहे. आपण गाई पकडून ठिक आहे. गोशाळेला देणार की कुठल्या बाहेरच्या संस्थेला देणार कारण आपण माता-पिता काय मानतो. ते सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे बोलले ते सर्व बरोबर आहे. पण कुत्रा, कुत्र्याबद्दल आता माझ्या वॉर्डात मोदी पटेलला दोन सडलेले कुत्रे आहेत. ते फिरतात, कुठे पण जाऊन बसतात. लोक त्याला घाबरतात. मी आरोग्य विभागाला फोन केला. पवारांनी सांगितले मुकादमाला सांगा. मुकादमाने मला विचारले मॅडम कसे पकडायचे? मग ते नगरसेवकांनी पकडायचे असे झाले एक ही गोष्ट झाली.

कुत्रा पकडला की डुक्कर किंवा काही जनावर पकडले मग ते तुम्ही कुठे पाठवणार गोशाळेत पाठवणार कि संस्थेला देणार.

**एस. एस. पानपट्टे (मा. उपआयुक्त सो.) :-**

कुत्रा सोडुन बाकी सगळे जनावरे गोशाळेला पाठवणार कुत्र्यासाठी सविस्तर स्कीम मी आणणार आहे. कुत्र्याला पकडून त्याला ऑपरेशन करुन त्याला इंजेक्शन देऊन रॅबिज इंजेक्शन देऊन ज्या ठिकाणी कुत्रा पकडणार त्या ठिकाणी सोडायचे आहे.

**रिटा शाह :-**

त्याला मारुन टाकणार का? माझा मुद्दा असा की, कुत्र्यांना मारायचे असे नाही. कारण आपण कुठल्याही सभेत बसतो शहराचा विचार करतो तेव्हा मारायचे नाही मारायचे पापाचा पुण्याचा मी विचार करित नाही. मी काय सांगते की आता जी दोन कुत्री आमच्याकडे आहे. सन्मा सदस्य धनराज अग्रवाल यांनापण माहित आहे रोडवर फिरतात. माझे त्यावर दहा फोन झाले आणि ते बिलकुल सडलेली आणि पिसाळलेली कुत्री आहेत. मग त्याला मारायला पाहिजे नाहीतर घेऊन जायला पाहिजे. ते एकदमच मरायला आलेले आहेत.

**एस. एस. पानपट्टे (मा. उपआयुक्त सो.) :-**

मॅडम ते डॉक्टरने सर्टिफाय केल्या शिवाय मारता येत नाही.

**रिटा शाह :-**

मग त्यांना घेऊन तरी जायला पाहिजे.

**एस. एस. पानपट्टे (मा. उपआयुक्त सो.) :-**

त्यांना आम्ही पकडुन आणू.

**रिटा शाह :-**

काय त्यांच्यावर पडलेले आहेत. त्याला दुर्गंध येतो.

**एस. एस. पानपट्टे (मा. उपआयुक्त सो.) :-**

याबाबत वेगळा विषय महासभेत आणणार आहे.

**रिटा शाह :-**

तुम्ही आणणार ती गोष्ट वेगळी पण आता प्रॅक्टिकल वर्तमानमध्ये आहे त्याचे काय? आमच्या मोदी पटेलवर दोन कुत्री तशी आहेत.

**एस. एस. पानपट्टे (मा. उपआयुक्त सो.) :-**

सोडता येणार नाही तसा कायदा केला आहे. बाहेरपण सोडता येणार नाही.

**रिटा शाह :-**

साहेब, त्यांच्यावर जंतु पडलेले आहेत ती पिसाळलेली आहेत. ती कोणालाही चावू शकतात.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय हे घोडे, गाढव, डुक्कर यांना आपण कुठे पाठवणार.

**एस. एस. पानपट्टे (मा. उपआयुक्त सो.) :-**

तेसुद्धा गोशाळेत पाठवणार. म्हणून तर ठराव केलेला आहे. फक्त कुत्रे सोडुन सगळी जनावरे घेणार.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय आता सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे आता बोलले की हे सगळे बरोबर आहे. मी सांगतो मोकाट जनावरे फिरायला नाही पाहिजे. माझी सुद्धा ही इच्छा आहे. पण मागच्या सभेला साहेब बोलले होते. बाजाराचा विषय आला होता. फेरिवाले हटविले तर तुम्हाला दूध, भाजी काही मिळणार नाही. आता हे बदमाश आहे असे कळले आणि ते जाणून बुजुन हे करतात. एकदा ते चांगले म्हणतात. आपल्याला त्याचे काही मिळणार नाही. ते गेले तर. एकदा ते बदमाश म्हणतात ते बरोबर आहे का?

**मिलन म्हात्रे :-**

व्यवसाय करणे निराळे आणि रस्त्यावर जनावर सोडणे निराळे.

**धनराज अग्रवाल :-**

तुम्ही एका टाईमाला एका माणसाला फार चांगले म्हणतात. आणि एका टाईमाला बदमाश म्हणतात. ते बरोबर आहे का?

**मिलन म्हात्रे :-**

व्यवसाय करणे निराळे मी दुध काढून विकायचे आणि गाईंना मोकाट सोडायचे ही बदमाशी म्हणतो. ही बदमाशीच आहे. माझ्या शब्दावर ठाम आहे. दूध काढा तुमचे तबेले बनवा. त्याच्यात सांभाळुन ठेवा.

**धनराज अग्रवाल :-**

हे आपल्याला पटत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

हे तुम्हाला पटत नाही. आम्हाला पटत नाही. आणि एखाद्या फेरिवाल्याला काढले. त्याबद्दल मी बोललो.

**दिनेश नलावडे :-**

सभापती साहेब, आज आर.एम.पी. पार्कची माझ्याकडे लोक आलेली. ते तबेलेवाले मला वाटते. आर.एम.पी. पार्कला काही गाई पकडलेल्या आहेत. ३६ गाई पकडलेल्या आहेत. माझ्याकडे लोक आलेली आम्ही त्यासंबंधित तबेलेवाल्यांना हा त्यांना विषय दाखविला. हा विषय स्थायी समितीमध्ये मंजुर झालेला आहे आणि मी त्या गाई सोडू शकत नाही. कदाचित तुमच्याकडे ती लोक येतील. जे काही नगरपालिकेच्या नियमानुसार तुम्हाला काही दंड असेल भरावा लागेल आणि तुम्हाला गाई सोडाव्या लागतील. अतिशय आनंदाची गोष्ट आहे. कारण आमच्या साईडला भरपूर गाई आहेत. आणि तो जो कचरा आपण बाहेर ठेवतो. त्या गाई डबे उलटे करतात. या ठिकाणी जो काही विषय सन्मा. सदस्यांनी विचारले की, या अगोदर पाचशे रुपये आकारणी परंतु शंभर रुपये घेऊन आपलेच कर्मचारी त्या गाई सोडतात. ह्यापुढे तसा विषय घडायला नको आणि त्याच्यामध्ये तुम्ही स्वतः लक्ष दया. एक वेगळे पथक याच्यामध्ये तयार करा. निश्चितपणे आमच्या शहरामध्ये गाई फिरलेल्या दिसणार नाही असे लोकांनी आम्हाला सांगितले पाहिजे. आमचीपण इच्छा आहे. आणि हा जो विषय आलेला आहे याच्यावर कायदेशीर व्यवस्थित अंमलबजावणी करा. एवढेच आमचे सर्व सदस्यांचे मत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपण ठराव मंजुर करताना सुचविलेल्या दुरुस्त्यांसहित याच्यात काय काय ॲड करायचे ते ते रेकॉर्ड होऊ दया. आणि मग मंजुर करा. मग दुसरा विषय घ्या. वर बघा सहा पथकात दहा म्हणजे एका पथकात किती?

**चंद्रकांत वैती :-**

ती ग्रॅमॅटिकल मिस्टेक आहे ती सुधारुन घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

आणि पथक वाटल्यास ती तुम्ही वाढवा. तुम्हाला आता पथक तुमचे पायी ठेऊन चालणार नाही जी गाडी फिरेल तेच पथक. गाडी बरोबर आहे त्या गाडीचा नंबर काय आहे तो टाकून घ्या. त्यातुन वाद उठला होता. आरोग्यवाले तुमच्याकडुन ती गाडी खेचणार. गाडीचा नंबर टाका. या पत्त्याला ही गाडी आजपासून देण्यांत येत आहे. त्या गाडीचा नंबर काय? वाहन कुठे आहेत. त्या गाडीचा नंबर मेन्शन करुन घ्या. आपल्या नगरपालिकेची गाडी आहे.

**अशोक पाटील :-**

उपआयुक्त साहेब, आता सभागृहाने या मोकाट जनावरांच्या बंदोबस्तासाठी ठराव दिलेला आहे. याची अंमलबजावणी तुमच्या अधिकारात तुम्हाला करायची आहे. यांना जेव्हा ती जनावरे पकडली जातील तर त्यांचे एक रजिस्टर रितसर मेन्टेन केले जावे. त्यांना रितसर पावत्या फाडल्या जाव्यात. नाहीतर आपले खालचे कर्मचारी याचा दुरुपयोग करतात. आपण रितसर ठराव नगरपालिकेच्या उत्पन्नासाठी करुन देतो. त्याचा नंतर दुरुपयोग केला जातो. म्हणून त्यांचे रितसर रजिस्टर मेन्टेन होते की नाही त्याची काळजी घ्या.

**प्रकरण :- १६८**

मोकाट व बेवारस जनावरांचा बंदोबस्त करण्या बाबत.

**ठराव क्र. १४८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मोकाट व बेवारस जनावरे उदा. गाय, म्हैस, गाढव, घोडे, डूकरे, ह्यांच्या बंदोबस्त करण्यासाठी महानगरपालिकेने दिनांक ०१/११/२००३ पासून एक स्वतंत्र पथक निर्माण केलेले आहे. एक पथकात एकुण १० कर्मचारी आहेत सदरचे पथक रस्त्यावरील मोकाटपणे फिरणारी जवळची जनावरे पकडून दोरीने पायी चालत आणून भाईंदर (प) येथील कोंडवाड्यात बंद केले जातात व लांबची जनावरे गाडी क्र. एम.एच ०४/एजी/३७४५ नादुरूस्त असुन

दुरूस्त करून सदरचा वाहना मार्फत पकडण्याचे प्रस्तावित आहे. नगरपालिकेच्या काळात सदर मालकाकडून रू. ५०० /- दंड व चारा प्रतिदिनी रू. २५ /- वसूल करून जनावरे सोडली जात होती. दंडाची रक्कम अल्प असल्यामुळे मोकाट जनावरे सोडण्याची लोकांची प्रवृत्ती वाढलेली आहे. तेव्हा पथकाद्वारे पकडलेल्या जनावरे सोडण्यासाठी खालील प्रमाणे दंडाची शिफारस करण्यात येत आहे.

| अ. | जनावराचे प्रकार | दंडाची रक्कम | प्रतिदिन खाणावळ खर्च | वाहतूक व वैद्यकीय खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | गाय / म्हैस | रू. २००० /- | रु. ५० /- | १०० |
| २ | गाय, म्हैस यांचे वासरू | रु. १००० /- | रु. २५ /- | |
| ३ | घोडे / गाढव | रु. १००० /- | रु. ५० /- | |
| ४ | घोडे / गाढव यांची पिल्ले | रू. ५०० /- | रु. २५ /- | |
| ५ | डुकरे | रु. ५०० /- | रु. ५० /- | |
| ६ | डुकरांची पिल्ले | रु. २५० /- | रु. २५ /- | |
| ७ | शेळ्या व मेंढ्या | रु. ५०० /- | रु. २५ /- | |
| ८ | शेळ्या व मेंढ्या पिल्ले | रु. २५० /- | रु. १५ /- | |

वरील प्रमाणे दरास स्थायी समितीकडून मान्यता मिळण्याची शिफारस आहे.

जी जनावरे महानगरपालिकेकडून सात दिवसाच्या आत न सोडविल्यागेल्यास सदरचे जनावर हे बेवारस आहे, असे ठरविण्यात येईल. अशी बेवारस जनावरे लिलावाद्वारे विक्री केल्यास खरेदी केलली जनावरे कत्तलखान्यात जाण्याची शक्यता आहे. तसेच बेवारस जनावर नैसर्गीक मृत्यूपर्यंत जोपासणे यासाठी महापालिकेस मोठा खर्च करावा लागतो.

त्यासाठी बेवारस जनावरे स्वखर्चाने नेणे संबंधी महापालिकेतर्फे श्री मुंबई जीवदया मंडळ ह्यांना पत्राद्वारे केलेली होती. श्री. मुंबई जीवदया मंडळ ह्यांची एक गोशाळा वसई येथे आहे त्यांनी सदरचे बेवारस जनावरे स्वखर्चाने नेण्यासंबंधी लेखी पत्र महानगरपालिकेला दिले आहे. तसेच त्यासंबंधी करारनामा करून देण्यास तयार आहेत तसे पत्र सोबत जोडले आहे. तेव्हा बेवारस मोकाट जनावरे श्री. मुंबई जीवदया मंडळ ह्यांनी विनामुल्य स्वर्चाने नेण्यासाठी हि सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. मिलन म्हात्रे.** **अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण १६९ चे वाचन केले.)

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभापती महोदय, हा जो ठराव कुठल्या नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत झाला होता की, स्थायी समितीमध्ये की महानगरपालिकेच्या महासभेमध्ये की स्थायी समितीमध्ये हा पास झाला होता. ही टिपणी कोणी सादर केली होती.

**अजित पाटील :-**

महापालिकेचा ठराव क्र. १७०, ५/८/०२ प्रशासकीय काळामध्ये, राजवटीमध्ये ठराव आलेला आहे. महापालिकेचे उत्पन्न वाढविणेकरिता महापालिकेने निर्णय घेतला होता. पे ॲन्ड पार्क या विषयवरती कॉन्ट्रॅक्ट दिले होते.

**जोजफ घोन्सालवीस :-**

ही टिपणी त्यावेळी कोणी सादर केली होती.

**धनराज अग्रवाल :-**

५/८/०३ रोजी महापालिका नव्हती.

**अशोक पाटील :-**

प्रशासकीय राजवटीमध्ये जे जे ठराव झालेले आहेत. त्याची कृपया स्थायी समितीच्या सदस्यांना त्याची प्रत मिळावी असे बरेच प्रस्ताव येतात की, प्रशासकीय ठराव झालेले आहेत. पण सदस्यांना त्याची माहिती नसते. कुठला ठराव झालेला आहे. स्थायी समितीच्या सदस्यांना त्याची माहिती मिळावी.

**जोजफ घोन्सालवीस :-**

याची टिपणी कुठल्या अधिकाऱ्याने दिली होती? मग त्यावेळी यांना माहिती नव्हते का? की या लोकांचा विरोध आहे ही आपली जागा नाही किंवा त्याची परवानगी आहे किंवा नाही हे माहिती नव्हते का?

**अजित पाटील :-**

टेंडर निघाल्यावर त्यांना ऑर्डर दिली होती आणि विरोध झाल्यानंतर त्याची निगोशीन केल्यानंतर त्यामध्ये गडबड झालेली आहे. त्यामध्ये चार रस्त्यावर एक ते चार मध्ये हे रस्ते आहेत. काशीमिरा रोड आणि मिरा रोड भागातील रस्ते आहेत आणि पाचवा जो विभाग आहे तो भाईंदर रेल्वेस्टेशन, रेल्वेची जागा या पाच ठिकाणी कॉन्ट्रॅक्ट दिलेले होते. काशीमिरा रोड आणि मिरा रोड तीन विभाग याच्यामध्ये टोटल अडतीस लाखाचे, अडतीस हजाराचे कॉन्ट्रॅक्ट दिलेले होते.

**जोजफ घोन्सालवीस :-**

हे तुम्ही काय समजून कॉन्ट्रॅक्ट दिले होते कि तिथे उभच राहायला परवानगी मिळणार नाही. मग जिथे तुम्ही त्यांना कॉन्ट्रॅक्ट कसे दिले. याला जबाबदार कोण?

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.) :-**

परवानगीचा संबंधच नाही. नगरपालिकेच्या रस्त्यावर उभ्या राहिलेल्या गाड्यांचा दंड वसुल करायचा आहे. ते उभे राहुच देणार नाही. हा प्रश्नच येणार नाही. नगरपालिकेच्या रस्त्यावर पे ॲन्ड पार्क सुरु केले आहे. तेवढे वेळ उभे राहिले तेवढा वेळ दंड म्हणून नगरपालिकेला दयायचा आहे ते ठेका पद्धतीने सुरु केले.

**अजित पाटील :-**

ते रस्ते सगळे नगरपालिकेच्या मालकीचे आहेत. आणि काही कारणामुळे शांतीनगरवाल्यांनी विरोध निवळला. आयुक्त साहेबांनी चर्चा केल्यानंतर तो मागे घेतला आणि नंतर परमिशन दिली आहे आणि ते अडतीस लाख अडतीस हजाराचे कॉन्ट्रॅक्ट महासभेने दिले होते. नगरपालिकेला एक वर्षाला सात लाख एवढे उत्पन्न मिळणार आहे. शांतीनगर आणि काशीमिरा रोड टेंडर देताना रस्ता क्लिअर होता. ज्यावेळी रस्त्याचे काम चालू आहे. त्यामुळे तिथे पे ॲन्ड पार्कचा उपभोग घेता आला नाही. शांतीस्टारचे जे तीन रस्ते आहेत. त्यामध्ये १७/८ ला ऑफर दिली होती. १७/८ ते १४/१/०३ पर्यंत त्याला काही अडथळे आल्यामुळे पे ॲन्ड पार्क आयुक्त साहेबांनी शांती नगरच्या मालकाशी चर्चा केल्या. नंतर त्यांचा विरोध निवळला १७/८ ते १४/०१ ते ०३ या पिरियडमध्ये तो पे ॲन्ड पार्क वसुल करु शकला नाही. त्यामुळे तो पिरियड दिला आहे. तो जो पिरियड आहे ते फक्त मुदतवाढीची मागणी केली आहे आणि ती मुदतवाढ मागितली आहे आणि त्या कालावधी रस्ते उपलब्ध करु शकत नाही हा प्रस्ताव आहे. योग्य वाटते पुन्हा प्रस्ताव ठेवलेला आहे. फक्त पैसे कमी करण्याची मागणी नाही. ज्या काळात अडचण झाली त्या पिरियडमध्ये सुद्धा मुदतवाढ मागितली आहे. त्याच्यामुळे नगरपालिकेला सात लाख उत्पन्न मिळणार आहे. तर मुदतवाढीचा प्रस्ताव ठेवलेला ज्या पिरियडमध्ये रस्ते उपलब्ध होऊ शकले नाहीत. एवढ्या एवढ्या पिरियडची मुदतवाढ मागितली आहे. बाकीची मागणी केली नाही. हा त्यांचा प्रस्ताव आहे. दुसरा असा आहे, भाईंदर पश्चिमेला रेल्वे विभाग आहे. त्याच्यामध्ये पाच लाख पन्नास हजारचे टेंडर दिलेले होते. मग रेल्वेने त्या ठिकाणी पे ॲन्ड पार्किंगला विरोध केल्यामुळे ते पे ॲन्ड पार्क अंमलात येऊ शकले नाही. याच्यामुळे अपेक्षित उत्पन्ना मिळणार नाही आणि कॉन्ट्रॅक्टप्रमाणे पाच लाख रुपयाची डिमान्ड रजिस्टरला नोंद झालेली आहे. रेल्वे परवानगी देत नसल्या कारणाने ठेक्याचे पैसे वसुल होणार नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

जी जागा आपली नाही. तिथे तुम्ही कसे धाडस करता?

**अजित पाटील :-**

टेंडर काढले होते. रेल्वेने विरोध केल्यामुळे

**जोजफ घोन्सालवीस :-**

रेल्वेच्या जागेत ते परवानगी कसे देतील हे धाडस आपण कसे गेले.

**अजित पाटील :-**

रजिस्टरला नोंद झाली कारण ते राईट अप करावे लागणार आहे. त्यामुळे पैसे मिळणार नाहीत. आपल्याकडे प्रस्ताव आणलेला आहे.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय यांचे असे म्हणणे आहे की आपली जागाच नाही. शांतीपार्कवाल्यांनी विरोध केला शांतीपार्कचा प्रत्येक टाईमला विरोध असतो. शांतीनगर स्टारचा कुठल्याही वस्तूचा विरोध असतो आणि सगळे पैसे नगरपालिकेला लावायला पाहिजे.

**शिवमूर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.) :-**

शांतीपार्कचा विरोध कशासाठी होता की तुम्ही बाकीच्या गोष्टी ताब्यात घेत नाहीत आणि आमचे रस्ते ताब्यात घेऊन तुम्ही उत्पन्न मिळवायला लागला हे त्यांचे वक्तव्य होते. त्याच्याशी याचा काही संबंध नाही म्हणून सांगितले आणि पार्किंगचे पैसे वसुल करायला सुरु झाले. तुम्हाला जर उदाहरण दयायचे झाले तर पूणे महापालिकेच्या हद्दीमध्ये रेल्वे स्टेशनच्या आतच्या बाजुला पार्कींगची सुविधा आहे. ते ठाणे महापालिकेने केलेले आहे. पण त्यांना रेल्वे प्रशासनाकडुन अप्रुवल घेऊन पार्किंग सुरु केली. आमचा अप्रुवल घेण्याचा प्रयत्न चालू होता. पण त्यांनी निगेटिव्ह उत्तर दिले आहे. ए-वन गणपती विसर्जनाला देखील त्यांनी विरोध केला रस्ता करु दिला नाही. म्हणजे विरोध करतील असे समजुन काढायचे राहत नाही. उत्पन्न मिळणार म्हणून प्रयत्न केला. वसुल करु दिले नाही. त्यांची जागा होती. आपल काही नुकसान झाले नाही.

**अजित पाटील :-**

नगरपालिकेचे नुकसान काही झाले नाही. पाच लाख पन्नास हजार उत्पन्न मिळणार नाही. म्हणजे ती अमाऊन्ट राइट अप करावी लागेल. स्थायी समितीची मंजुरी पाहिजे. आणि याला पिरियड १७/८ ते १४/१/२००३ मध्ये आपण ज्याला अनुमोदन दिले. त्याची मुदत पण पाहिजे. नगरपालिकेचे काही नुकसान होणार नाही. रेट फिक्स केलेले आहे. टोटल कॉन्ट्रॅक्ट दिलेले आहे. डेटप्रमाणे.

**रिटा शाह :-**

सांगायचा अर्थ केव्हा असतो जेव्हा आपण टिपणी देतो तेव्हा मेन्शन करायला पाहिजे आणि जोपर्यंत आम्हाला संपूर्ण माहिती मिळत नाही आणि त्याच्यावर स्टडी करत नाही. तोपर्यंत विषय कसा पास करुन घ्यायचा. तुम्ही चुकीचा विषय आणलेला आहे आणि माझा त्याबद्दल विरोध आहे. तुम्ही सर्व रेट वगैरे करुन तुमची टिपणी आम्हाला सादर करा पुढच्या सभेला

**नितीन ठाकूर :-**

हा जो ठराव आहे तो प्रशासनाच्या काळातला ठराव आहे. त्याची आम्हाला काहीच माहिती नाही. किती पैसे घेतले काय घेतले? तुम्ही यामध्ये काही दिले पण नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

जेवढे प्रशासकीय याच्यामध्ये ठराव झाले त्याची आम्हाला प्रत मिळावी.

**रिटा शाह :-**

कारण पे ॲन्ड पार्कचे माझ्याकडे जेवढे नॉलेज आहे त्याचा अर्थ असा आहे की कुठलीही नगरपालिकेची जागा, तिथे कोणी सायकल ठेवली, स्कुटर ठेवली, एक-दोन तासासाठी असे काहीतरी पैसे घेतात अशी मध्ये बोंबाबोंब झालेली होती की, दहा रुपयापेक्षा शंभर-दोनशे घेतात. त्याला काही मर्यादा नाही अशी पण तक्रार माझ्याकडे होती. ती मी त्याला बोलली होती. मला याबाबतीत नॉलेज नाही. नॉलेज घेऊन तुम्हाला सांगणार हा विषय अचानक आला आहे. त्यामध्ये तुम्ही किती तासाचे किती पैसे? किती मिनिटाचे किती पैसे आणि आतापर्यंत किती गोळा केले? आणि पुढे कसे गोळा करणार? त्याचे काही टिपणीमध्ये सादर केलेले नाही. संपूर्ण तुम्ही टिपणी दया आणि पुढच्या सभेत ठेवा.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती महोदय, याच्यामध्ये आपण काही जागा नेमून दिलेल्या आहेत. पे ॲन्ड पार्कवाल्यांना भाईंदर वेस्टला तिकडे रेल्वेचे स्टेशन आहे. तिकडे आपल्याकडे जागाच नाही. म्हणजे आता मेनरोडला तुम्ही गेलात तर तिकडे बघा बोर्ड लावला आहे. कोणीतरी गुप्ता म्हणून आहे. मला माहिती नाही. त्याने आपल्याकडुन वाहनतळाचा ठेका घेतला आहे. पैसे भरले सगळे आहे. विलेपार्लेची की कुठची तरी पार्टी आहे. माझ्याकडे एकदा येऊन तो भेटून गेला आपण त्याच्याकडुन पैसे घेतले पण आजच्या तारखेला पार्किंगची सोय म्हणून जागाच आपल्याकडे नाही. म्हणजे जी जागा आपल्याकडे उपलब्ध नाही त्याचे पैसे नगरपालिकेने आपल्या ॲग्रीमेन्टमध्ये ठरल्यानुसार पैसे घेतले. त्यांनी पैसे भरले. जाऊन बघतो तर तिथे जागाच नाही. ज्या ठिकाणी जागा नाही असे आपण पार्किंग बोर्ड तयार कसे करतो?

या आपल्या इकडच्या लोकांनी म्हणजे सिटी इंजिनिअर आपण त्याच्यातून थोडे ज्ञान घ्या. आपले जे फुटपाथ आहेत त्याला पार्किंग झोन करुन देऊन टाकले. फुटपाथवर पार्किंग करायचे आणि त्याचे पैसे आपण घ्यायचे. लाल बोर्ड वडाच्या झाडाखाली मारला आहे. तो येऊन बघा. तिथे स्कूटर लावायला जागा नाही आणि पार्किंग झोनमधुन त्यांनी बोर्ड काढून टाकले आहे. भाईंदर वेस्टला सॉल्ट डिपार्टमेंटच्या बंगल्याच्या बाजुला म्हणजे सांगायचा दृष्टीकोन असा आहे की, आता जो विरोध केला म्हणजे काय आहे. तुम्हाला सांगतो पहिले तुमची जागा ताब्यात घेतली होती का नाही. त्याला लाईन मार्क केले का? नाही. तुम्ही कुठची ताब्यात दिली? चुकीची जागा दिली ती दयायला नको ती दिली हे बरोबर आहे. तिकडे फुटपाथ आहे ना. रोड वायडिंग झाली ना रस्त्याच्या सेंटरपासून नऊ मीटर त्याच्यात फुटपाथ होतो. साहेब, तिकडे जागाच नाही. मग आपण तो पार्किंगची जागा कशी काय देतो. आणि पैसे मात्र त्या माणसाकडुन घेतले. पैसे घेतले ना? तो पावत्या घेऊन माझ्याकडे आला होता. आप इस वॉर्ड के नगरसेवक है? त्याला माहिती नाही तो ५ नंबर वॉर्डचा आहे आणि मी ४ नंबर वॉर्डचा आहे. तो पावत्या घेऊन आला ये देखो पैसा लिया है। ये जगह ही नही है। ये बोर्ड मारा तो आर.टी.ओ. वाला ट्रॅफिकवाला मेरे को हकालता है। म्हणजे ते टेक्निकली दृष्टीकोनातुन बरोबर नाही. आता मिरा रोडला जसे स्टेशनच्या बाहेर तिकडे पार्किंगचे आपल्याकडे रिझर्वेशन दाखविले आहे. ते आपण अजून ताब्यात घेतले नाही. ती जागा तुमच्या रिझर्वेशनमध्ये आहे. ती जागा घेतली गेली नाही आणि जी जागा तुम्ही ऑलरेडी रोडसाठी दिली आहे तिकडे पार्किंग म्हणून आपण ती विकतो. तसेच सेम होर्डिंगमध्ये आहे. तुमची जी त्यावेळेला ॲग्रीमेन्ट झाली त्यावेळेला त्या त्या वर्षाला प्रशासकीय कालावधीला ज्या ज्या वेळेला त्यानंतर रोड वायडिंग झाले. माझ्या माहितीनुसार भाईंदर वेस्टला असे कित्येक बोर्ड रोड वायडिंगमध्ये तोडले गेले. ज्यावेळी रोड वायडिंगच्यावेळी बोर्ड तुटले त्याचवेळेला तुम्ही त्या ॲग्रीमेन्टधारकांना बाकीचे पैसे रिफन्ड करुन टाकायला पाहिजे होते. कारण ती वस्तुच राहिली नव्हती. ज्याचे तुम्ही पुढच्या वर्षात भाडे घेणार आहात. म्हणजे पुढच्या काही महिन्यामध्ये तुमचे भाडे तुम्ही ॲडव्हान्समध्ये घेतले. नंतर रोड वाढला. वीसाचा साठ फुट झाला. नंतर सगळ साफ झाले बाकी होर्डिंग राहिले त्याचे रिफंड देऊन टाकायचे. इथेच वाद मिटतो असे किती वाद आहेत. आपण ज्यांना दिले तिथे बिल्डरच्या हट्टापायी होर्डिंग त्यांनी लावुन दिले नाही. माझे फ्रन्टींग भरते, माझे मार्केट फुटते, माझे शॉपिंग झाकते म्हणुन ती होर्डिंग त्यांनी लावुन दिले नाही. ही सत्य परिस्थिती आहे. तुम्ही तर ती जागा त्यांना व्यवस्थित ताब्यात दिली तर कुठल्या बिल्डरची हिम्मत होते तिथे होर्डिंग लावायचे नाही. रस्ता तुमचा, फुटपाथ तुमचे, जागा तुमची आणि आदेश बिल्डरचा होर्डिंग लगाने का नही याच्यावर तुम्ही हा ठराव घेता त्यामध्ये या ठरावाला जो विरोध करेल तो नागरिक नगरसेवक करेल. मग आमचे सुद्धा टाका. त्याच्यामध्ये ह्याच्यावर तुम्ही काय प्रिव्हेन्टिंग ॲक्शन घेणार आहेत. याच्यात या ॲडव्हरटाईजचे पैसे आपल्या बजेटमध्ये फार मोठी रक्कम आहे जी तुम्ही पकडलेली आहे. बजेटमध्ये याचा सेट बॅक तुम्हाला बजेटला बसणार आहे. बजेटमध्ये याची रक्कम पकडली होती. अपेक्षित रक्कम पकडली आहे. या दृष्टीकोनातून चुकीच्या पद्धतीने होर्डिंग दिल्या आहेत. की त्यावेळी पंतप्रधान आले दोन तास अगोदर अख्खे होर्डिंग वाऱ्याने रस्त्यामध्ये पडले. ज्यावेळी हा विषय आला त्यावेळी मी तुम्हांला सांगितले होते. माझी प्रोसिडींगमध्ये नोंद आहे की, आमच्या स्टेशनला एस.टी. डेपोच्या इथे मोठेमोठे होर्डिंग्ज दिले आहेत. बी.एम.सी.ला पण मोठे मोठे होर्डिंग्ज आपण बॅन्ड्राला बॉम्बेला बघतो. त्याचे फाऊन्डेशन तसे असते हे फक्त आयबिंगवर आहे. चार इंचाच्या आयबिंगवर पंचवीस तीस फुट उंच आणि पंधरा बाय वीस पंधरा बाय दहा असे मोठे मोठे होर्डिंग्ज आहेत. हवेच्या लोडने एखादे होर्डिंग्ज कोसळले तर काही लोक मरण्याची शक्ता आहे. तिकडे एस.टी. स्टँड आहे, रिक्षा स्टँड आहे. रेल्वेची सगळी गर्दी असते. ह्या सगळ्यांचा विचार करुन त्याची ज्या ठिकाणी आपण सुलभ शौचालयाची जागा नक्की केले. बांधकामाला सुरुवात केली तिकडे दोन होर्डिंग्ज त्याच्यासमोर आणून बसवले. आता समजा एखादे भविष्यात काम उद्या चालू झाले. परत ते होर्डिंग्ज काढून बाजूला न्या. कारण तुमची होर्डिंग्ज सुलभ शौचालय झाकून टाकणार. सुलभ शौचालयवाल्यांकडून तुम्ही पैसे घेतलेले आहेत आणि तुम्ही पब्लिककडून रुपया घ्यायचे आणि दोन रुपये, रुपये जे काही ठरेल ते याच्याकरिता तो त्यांचा धंदा आहे. ते सुलभ शौचालयसुद्धा तुमच्या होर्डिंग्जने झाकले गेले नाही पाहिजे. ह्याचे प्रिकॉशन तुमच्या अधिकाऱ्यांनी घेतल्या पाहिजेत. त्या घेतल्या गेलेल्या नाहीत. त्या ठिकाणी होर्डिंग्ज लागलेली आहेत. होर्डिंग्जवाल्याला हे माहिती आहे की, चुकीचे निर्णय आहेत आणि ते होर्डिंग्ज लावण्याच्या पद्धती आहेत. याच्यावर कोण लक्ष देईल का? या सर्वांचा ठरावामध्ये उल्लेख करा. मघाशी काही लोक बोलले की, परत हा विषय घ्या. तो घेत असतांना जर काही ठरावामध्ये चुका झाल्या आणि जर परत त्या पुढे प्रशासन करु इच्छिते. त्या परत झाल्या नाही पाहिजेत. या ज्या

मी काही सुचना केलेल्या आहेत याचा जर आपण या ठरावात विचार केला तर बरं होईल. कारण मागच्या वेळी देखील असेच हो हो केले पण हा आहे तसा ठराव आमच्याकडे या सभेला सुद्धा परत आला आहे. कारण मागच्या वेळेला तो ठराव आणला तो आणि या काही बदल नाही आहे. या ज्या मी महत्वाच्या सुचना केल्या त्याचा कुठेही उल्लेख नाही. ज्याचे आपण पैसे घेऊ त्यांना त्यांचा मोबदलाच मिळाला नाही. त्या माणसाने आपल्याकडे का फेऱ्या माराव्यात की, माझे पैसे परत करा? त्याचा उल्लेख करा की, सदर व्यवस्था आम्ही उपलब्ध करु शकलो नाही तर त्याची जी भरलेली रक्कम आहे, एवढ्या दिवसांत परत देऊ. मग आपले क्लार्क काय कल आओ, परसो आओ. वर्ष वर्ष लोकांना पैसे मिळालेले नाहीत याचा विचार करावा.

**चंद्रकांत वैती :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी या पे ॲन्ड पार्क आणि जे होर्डिंग्ज लावले त्याबाबत अतिशय जी ठेकेदारांची परिस्थिती आहे. त्याबाबत व्यवस्थित सुचना पुर्वीही या विषयावर केल्या होत्या. त्या वेळेला आमची काही मते मांडली होती. पण खरतर त्याची अंमलबजावणी झाली नाही. प्रशासकीय कारकीर्दीमध्ये हे ठराव झाले. मिरा रोडला जवळ जवळ रोज एक वाहन चोरीची तक्रार असायची आणि अशा परिस्थितीत तिथे पे ॲन्ड पार्कसाठी रिझर्वेशन होते आणि याबाबत ज्या वेळेला मुख्याधिकारी कल्याण केळकर साहेब होते त्या वेळेपासून प्रयत्न केले होते. परंतु, आर.एन.ए. बिल्डरने जागाच आपल्याला हॅन्डओव्हर केली नाही आणि हो हो करताना प्रशासकीय कारकीर्दीमध्ये सर्व विरोधांना जुगारुन तातडीने पे ॲन्ड पार्क संपूर्ण मिरा भाईंदर शहरात अस्तित्वात आणली. परंतु हे करतांना आपण ज्यावेळी आपण पूर्णपणे त्या रस्त्याचे मालक आहेत की, नाहीत आणि याची चाचणी केली गेली नाही आणि आज ज्यांनी त्यांनी ठेके घेतले ते भुर्दंड सहन करता माझे असे प्रामाणिक मत आहे की, सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी सांगितले या ठेक्याचे पैसे घेतले. ते आपण परत द्यावे. आपण मानतो की, महानगरपालिकेचे उत्पन्न वाढण्यासाठी हा धाडसी निर्णय घेतला. उत्पन्न वाढले परंतु ज्यांच्याकडून आपण ही वसुली केली त्यांना आपण काहीच देऊ शकलो. अगदी त्यांची सुनावणीदेखील होत नाही. शांतीनगरमध्ये पण जिथे रस्त्यावर गाड्या पार्क केल्या जातात ते सांगातात की, आमचे ऑफीस आहे. तर आम्ही तुम्हांला पार्किंगचे पैसे कसे देऊ. तर त्याच्यासाठी आपण निश्चितपणे त्यांना एक रिंग आखुन द्यायला पाहिजे होती. त्यांना डिमार्केशन द्यायला पाहिजे होते. ज्या ठिकाणी त्यांना पोल मारता येतील. गेट लावता येईल असे काहीतरी असे काहीतरी करता यायला पाहिजे. तसे आपण काहीच केले नाही. तर आतापर्यंत आपण त्या पे ॲन्ड पार्कवाल्यांना कुठल्याही प्रकारची त्या बाबत सुनावणी करु शकलो नाही. त्यांना न्याय देऊ शकलो नाही. असे असेल तर त्यांचा जोपर्यंत पिरियड वाया गेला त्या काळातील त्यांचे पैसे आपण त्यांना परत द्यावेत किंवा एकतर त्यांची तेवढ्या महिन्यासाठी मुदत वाढवून द्यावी. असे दोन पर्याय याच्यामध्ये राहू शकतात आणि आता आपल्याला निश्चितपणे त्या जागेवर ती जागा नसेल तर तो स्पॉट आपण बदलला पाहिजे. म्हणजे ज्यायोगे आपण त्यांना तो ठेका दिला आहे त्यायोगे त्यांना त्यांच्या त्या ठेक्यावर अंमलबजावणी करता आली पाहिजे. कारवाई करता आली पाहिजे. आपण रस्त्यात होर्डिंग्ज लावले त्यांनादेखील कशा प्रकारे विरोध बिल्डर, दुकानदार, आणि स्थानिक जनतेने केला. परंतु, विरोध केला निश्चित आहे. त्यामुळे सगळीकडे होर्डिंग्ज लागले नाहीत. जेवढ्या होर्डिंग्जची संख्या त्यांना मंजुर करुन दिली होती तेवढे जर होर्डिंग्ज लागले नसतील तर त्याचा आपण अहवाल सादर करुन तेवढ्या लोकांना दुसरीकडे होर्डिंग्ज लावण्यासाठी किंवा तिथेच होर्डिंग्ज लावण्यासाठी आपण परत सांगावे. मात्र त्या दरम्यान ते होर्डिंग्ज लागले नव्हते तेव्हापर्यंतचे आपण त्यांच्याकडून दर वसुल करु नयेत. इलेक्ट्रिक पोलना जाहिराती लावण्यासाठी आपण ठेका दिला होता. मिरा भाईंदर शहरामध्ये पाचशे की सहाशे किंवा अकराशे अशी काहीतरी फिगर निश्चित आहे की, त्यामध्ये त्या पोलना जाहिराती फलक लावायला परवानगी दिली होती. परंतु बी.एस.ई.एस.ने त्याला पूर्णपणे अमान्य केले आणि म्हणून त्या लोकांनी बी.एस.ई.एस.च्या पोलना जे जाहिरात लावायचा विरोध केला तर त्यांनादेखील अजिबात कुठल्याही प्रकारचा फायदा घेता आला नाही. मात्र त्यांनी महानगरपालिकेचे पैसे भरलेले आहेत. तर याबाबत एक तर आपण त्यांचे पैसे परत करावेत. बी.एस.ई.एस.शी आपण भांडून घ्यावे. नाहीतर बी.एस.ई.एस.शी भांडल्यानंतर जेव्हा ते होर्डिंग्ज आणि जाहिरात फलक लावायला देतील त्यापासून त्यांना तो ठेका चालू करावा. मुदतवाढ द्यावी.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती महोदय, आता जो बी.एस.ई.एस.चा विषय निघाला. आपण बी.एस.ई.एस.ला स्पष्ट आणि कडक शब्दात पत्र लिहा. बी.एस.ई.एस. तुमच्यावर काही मेहेरबानी करणार नाही. त्यांचे जर

असे म्हणणे असेल आमच्या पोलवर आम्ही काही कमर्शिअल काम करु देणार नाही तर त्यांचेच एक उदाहरण तुम्ही त्यांना द्यायचे. बी.एम.सी.मध्ये धीरुभाई अंबानींच्या रिलायन्स कंपनीच्या इंटरनेटचे संपूर्ण केबल जे तुमच्या इलेक्ट्रीसीटी केबलमध्ये म्हणजे ॲक्टमध्ये त्यांची प्रोव्हीजन नाही, असे केबल संपूर्ण मुंबईमध्ये त्या बत्यांवर फिरवलेली आहेत. जे धोरण तुम्ही ते केबल फिरवायला लावले ते धोरण तुम्ही आम्हांला लावा आणि त्या धोरणानुसार आम्हांला फक्त आमची जाहिरात आणि लाईट लावायची सोय द्या आणि तुम्ही त्यांना उदाहरण द्या की, वसई, कल्याण-डोंबिवली, ठाणे महानगरपालिका इथले एम.एस.ई.बी. ही तुमच्यापेक्षा सुपेरिअर पॉवर आहेत. या लोकांनी म्हणजे महाराष्ट्र राज्य शासनाची जी संस्था आहे त्यांनीही आम्हांला त्यांना त्या शहरामध्ये विद्युतीकरण आणि ॲडव्हरटाईज करण्याचे अलाऊड केलेले आहे. ज्यानुसार तुम्ही आम्हांला दिले पाहिजे. कारण त्या पोलचा तुम्ही वाणिज्य कामासाठी उपयोग करता. त्यांचे इंटरनेट आणि नेटवर्कचे सर्व ते केबल्स त्यांनी वरुन नेले आहेत. या सगळ्या बत्त्यांना अंडरग्राऊंन्ड केबल टाकले आहेत आणि त्यांच्या केबल्स त्यांनी वरुन फिरवलेले आहेत. याच्यामध्ये काही अपघात पण झाले. हे त्यांनी स्वतः चुकीचे केले आणि आपल्याला नियम दाखवतात. हे जरा तुम्ही दाखवून द्यायचे. माझी मघाशी दुसरी एक सुचना राहिली. आपण जे पे ॲन्ड पार्क साठी जे प्लॉट देतो ते आपल्या नगरपालिकेने रितसर त्यांना ठराविक एरिया, बाऊन्ड्री टाकून द्यावी आणि त्याला ॲडव्हरटाईज द्या. त्या ज्या बांधकाम, कुंपणाचा खर्च तिकडच्या तिकडे वसुल होईल. बी.एम.सी. जसे ठराविकएरिया टाकून त्यांना देते त्यांना रितसर त्यांच्या पावत्या देतात. प्रिन्ट करुन ते देतात. जसा हायकोर्टच्या बाजूला वगैरे आपण गाडी लावली की, पंचवीस रुपये घेतात आणि ते पावती देतात. तशा पावत्या आपण त्यांना प्रिन्ट करुन दिल्या पाहिजेत. कारण त्यामध्ये बाजार लिलावासाठी पण पंचवीसची पन्नास घडण्याची शक्यता आहे. तर त्या हिशोबाने तेसुद्धा ठरावामध्ये तुम्ही ॲड करा. म्हणजे पार्किंग करिता म्हणजे मी १६९ वर बोलतो आहे. ही जी सुचना आहे ती त्यांना पावत्या आपल्या महानगरपालिकेने प्रिन्ट दिल्या पाहिजेत आणि ते जे तुम्ही पे ॲन्ड पार्कचे प्लॉटिंग केलेले आहे ते आर.टी.ओ. अप्रुव्हल नाही आहे कारण मी मघाशी उदाहरण दिले की, जिकडे आपल्याला फुटपाथ आहे तिकडे पार्किंग दिले आहे. म्हणजे हे अगदी ११० टक्के आर.टी.ओ. अप्रुव्हल नसणार. पे ॲन्ड पार्कचे तुम्ही आर.टी.ओ. अप्रुव्हल करुन घ्या. तो मिरा रोडचा प्लॉटसुद्धा आर.टी.ओ. अप्रुव्हल तुम्ही केलात की, तुम्हांला मग बिल्डरकडून ती जागा ताब्यात घ्यायला त्रास होणार नाही.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय, आता हा विषय आणलेला आहे. प्रशासनाने ज्यावेळी टेंडर दिले त्यावेळी याची शहानिशा करायला पाहिजे होती. पण ती काही केलेली नाही. आता होर्डिग्जमध्ये पण शांती स्टार बिल्डर लावून देत नाही. परत तोच विषय आलेला आहे. पी.डब्ल्यू.डी. ठानावाला हे पण लावून देत नाहीत आणि बी.एस.ई.एस.वाले लावून देत नाही. तिघांचे टेन्डर आपण काढलेले आहे. राष्ट्रीय महामार्गाची आपण परवानगी घेतलेली नाही. प्रशासनाची त्याच्यामुळे चुक झालेली आहे. हा पूर्ण विषय परत आणला पाहिजे. पण हा एकदम क्लिअर कट विषय आणला पाहिजे. आता समजा परत तुम्ही तीन महिने वाढविले तर परत त्यांच्यावर अडचणी येणार नाही काय?

**अजित पाटील :-**

ज्या ठिकाणी ठेका दिला होता. तिथे ठेकेदाराचे काय म्हणणे आहे की, १७/८/२००० ला परवानगी दिली होती. १७/८/२००० ला तो चाल करु शकला नाही. खरं म्हणजे, ठेका १३/१/२००३ ला चालू झाला तर त्याचे काय म्हणणे आहे. सगळे पैसे त्याने ऑलरेडी भरले १७/८ ते १३/१/२००३ हा जो पिरीयड मला उपलब्ध्र झाला नाही तेवढया पिरीयडची मला मुदत वाढ दया अशीच मागणी आहे.

**धनराज अग्रवाल:-**

उपलब्ध का झाला नाही

**अजित पाटील :-**

जागा उपलब्ध आपण करून देऊ शकलो नाही. तो पैसे मागत नाही. पिरीयड वाढवायला सांगता. चार ठिकाणी जागा उपलब्ध झाल्या नव्हत्या १७/८ ते १३/१/०३ या पिरीयडमध्ये जागा उपलब्ध झाल्या की नाही तो पे ॲन्ड पार्कचे उत्पन्न मिळवू शकला नाही हा जो पिरियड झाला तो तेवढयापुरता मर्यादित होऊ दया.

**धनराज अग्रवाल:-**

ते झाले हेर्डिंग आणि युनिपोल इत्यादी याचे काय

**अजित पाटील :-**

रेल्वेला कॉन्ट्रॅक्ट दिले होते रेल्वेने परवानगी न दिल्यामुळे ते पैसे आपल्याला येणार नाही. परंतु रजिस्टरला पाच लाख पन्नास हजार इन्ट्री केलेली आहे. म्हणून हे येणार नसल्या कारणाने ते राईट अप करण्याकरिता मा. स्थायी समितीचा ठराव आवश्यक आहे. जर ते येणार नसल्या कारणाने राईट अप करावे लागतील म्हणून प्रस्ताव मंजुरी करिता सादर केलेला आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.) :-**

त्याला नाही झाले तर राईटअप करा असे म्हणा.

**अजित पाटील** :-

आपण त्यांना पैसे परत दयायचे नाही. पैशाची त्यांनी मागणी केलेली नाही पण हे मुदतवाढ मागण्याची विनंती आहे.

**धनराज अग्रवाल :-**

एका होर्डिंगला किती पैसे येतात वर्षाचे , महिन्याचे वगैरे.

**अजित पाटील** :-

भाईंदर शहरामध्ये शंभर ठिकाणी होर्डिंग लावण्याचे कॉन्ट्रॅक्ट दिलेले आहे. त्यामध्ये काशीमीरा रोड आणि मीरा रोड भागातील तीन रस्ते आहेत, हायवे आहे आणि काशिमिरा रोड आहे. त्यामध्ये आपल्याला पाच वर्षाकरिता अठ्ठावन्न लाख नव्व्याण्णव हजाराचे कॉन्ट्रॅक्ट आहे. वर्षाच्या अकरा लाख पंचेचाळीस हजाराच्या आसपास उत्पन्न होते. याच्यामध्ये शंभर ठिकाणापैकी साठ ठिकाणी त्यांनी होर्डिंग लावलेली आहे आणि चाळीस ठिकाणी जागा उपलब्ध न झाल्या कारणाने लावू शकला नाही. त्यामध्ये काशिमिरा रोड येतो तर त्याचे काय म्हणणे आहे की आम्हाला या चाळीस जागा लावल्या त्याला सरसकट सहा महिन्यांची मुदतवाढ दया आम्हाला काय परत पैसे रिफन्ड घेण्याची आवश्यकता नाही असे त्याचे म्हणणे आहे.सहा महिन्याची मुदतवाढ मागितली आहे. ती चाळीस जागा उपलब्ध न झाल्याने त्याने सरसकट सहा महिन्याची मुदतवाढ मागितली आहे. मुदतवाढीची मागणी पुढे आहे. जागा रिफन्ड मिळावी म्हणून मागणी केलेली नाही.

**धनराज अग्रवाल** :-

आता इथे पण तुम्ही टिपणी दिलेली आहे शांतीसागर बिल्डरने विरोध केलेला आहे. रस्त्याचे काम चालू आहे. पी. डब्ल्यू.डी. ने रस्त्याचे काम चालू आहे. पी. डब्ल्यू.डी. ने त्याला विरोध केला आहे.

**नितीन ठाकूर** :-

सभापती साहेब जे आता उपलब्ध झाले मी लिहीले की नाही तूम्ही म्हणता विषय विषयपत्रिकेवर आणलेला आहे. आणि मी स्पष्ट लिहीलेले आहे की शांती स्टार बिल्डरने विरोध केलेला आहे. तुम्ही म्हणता आता विरोध नाही. होकार पण दिलेला आहे.

**अजित पाटील**:-

चाळीस जागा उपलब्ध आहेत. आणि त्यांनी सहा महिन्यांची मुदतवाढ मागितली. साठ जागा उपलब्ध झालेल्या आहेत. त्याला सहा महिन्याची मुदतवाढ पाहिजे. तो पैसे भरायला तयार आहे.

**मा. सभापती** :-

मुदतवाढ आपण देऊ या.

**याकुब कुरेशी**:-

त्याने सहा महिने मागितले तर सहा महिने दयायचे. अशातला भाग नाही. आपण ठरवू शकतो की तीन महिन्याची आपण दयावी. त्याने सहा महिने मागितले म्हणून आपण सहा महिने का दयावी.

**नितीन ठाकूर**:-

त्याला तीन महिन्याची दयावी. तीन महिन्यामध्ये व्यवस्थित आहे का बघा

**धनराज अग्रवाल**:-

काशीमीरा ठाण्याला जाताना एक मोठा होर्डिंग आहे. आमच्याच मेंबरने त्यावर पाच सहा पत्र दिली आहेत. सात अपघात झाल्याची पोलिसचौकीवर नोंद आहे ते होर्डिंग लावून थोडा बाजूला करा असे त्यांचे पत्र आहे. पण त्यांच्या पत्राचे आपले प्रशासन काही उत्तर देत नाही आणि दुस-या कोणी बिल्डरने सांगितले ते लावायचे नाही. असे काही आहे का, तिकडे अपघात होतात त्याची जबाबदारी कोणाची आहे तिकडे सात अपघात झाले पोलिस चौकीत रिपोर्ट आहे अजून ते होर्डिंग काढून बाजूला लावत नाही. आम्ही पूर्णपणे काढायला पण सागितले नाही . बाजूला लावायचे सांगितले आहे.

**अजित पाटील** :-

अडथळा होत असेल तर ते मागे घ्यायला सांगू. एक आठवडयात त्याचा निर्णय घेऊ

**रिटा शाह** :-

सभापती महोदय आता अजित पाटील साहेबांनी सांगितलें साठ जागेवर लावले आहे आणि चाळीस जागेवर लावले नाही. मग साठ जागेवर लावले ते कुठल्या कुठल्या जागेवर लावलेले आहे आणि चाळीस जागेवर नाही लावले ते कुठल्या जागेवर लावले नाही त्याचा तुम्ही गोषवारा कुठे दिला नेमका होर्डिंग मिरा-भाईंदर कॉन्ट्रॅक्टर चे कुठले कारण अख्खे मिरा भाईंदर शहराला होर्डिंगच दिसते जेवढे राजकारणी लोकांनी होर्डिंग लावले तेवढे व्यापारी लोकांनी लावलेच नाही. मग हे कॉन्ट्रॅक्ट राजकारणी लोकांसाठी आणले आहे की कशासाठी आणले ते डिटेल दया. मी स्वतः राजकारणी आहे.

**नितीन ठाकूर :-**

दुसरी गोष्ट ते पे अँन्ड पार्क चे किती रेट घेता ते पण तुम्ही अजून सांगितले नाही.

**धनराज अग्रवाल** :-

साहेब पार्टीचे होर्डिंग केंव्हा काढणार

**रिटा शाह** :-

पहिल्या साठ जागावर कुठे लावले त्याचे डिटेल दया आणि चाळीस जागावर लावले नाही त्याचे देखील डिटेल दया. आपण वाचून दाखवा असे नसते जेंव्हा जेंव्हा मिटिंग असते सभेवर विषय आणल्यावर तूम्ही सर्व मेंबरला दयायलाच पाहिजे.

**अशोक पाटील :-**

साहेब, राजकीय नेत्यांच्या होर्डिंगची आपण आकारणी करता काय? मी आपल्या पालिकेच्या उत्पन्नाच्या संदर्भात बोलतो की जास्तीत जास्त होर्डिंग राजकीय पुढा-यांचे आहेत तर आपण आकारणी करतो.

**रिटा शाह** :-

करायला पाहिजे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

गेल्या पाच सहा वर्षामध्ये दरवर्षी नगर पालिकेला एकोणतीस हजार रुपये मिळायचे आपले ते उपविधी आहेत. उपविधी प्रमाणे ते ते रेटस् स्केअर फुटावर आहेत ते फक्त एकोणतीस हजार दर वर्षाला मिळायचे म्हणून आपण टेन्डर काढले आणि टेन्डरमध्ये आपल्याला दरवर्षी अकरा लाखाप्रमाणे अठ्ठावन्न लाखाचे टेन्डर आणि पार्किग आणि नो पार्किंग यापूर्वी चालू नव्हते. तर प्रत्येक ठिकाणाचे आपल्याला पाच पाच लाख रुपये मिळायचे. म्हणजे ती जागा ताब्यात मिळणार आहे की नाही समजा मिळाली नाही नगरपालिकेचे काय नुकसान झाले परवानगी मिळेल या उददेशाने उत्पन्न वाढावे म्हणून केले. एखादी जागा मिळाली नाही तर डिलीट करायची आणि कॉन्टॅक्टरला सांगायचे हे मिळणार नाही. तीन जागेवरचे मिळतील. तीन जागेप्रमाणे पैसे भरायचे. उत्पन्न वाढविण्याची ही चुक केली का

**याकुब कुरेशी :-**

मेन पार्किंगला जागा मिळाली नाही म्हणून त्याचे पैसे आपण परत देणार?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

फक्त चार महिन्यांनी मुदतवाढ दयायची आणि ती रक्कम भरलेली परत कशाला दयायची

**याकुब कुरेशी :-**

होर्डिंगवाल्याला का पार्किंगवाल्याला

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

होर्डिंगवाल्याला पण परत करायची नाही आणि पार्किंगवाल्याला पण परत करायची नाही. पैसे सगळे भरून घेतले.

**मिलन म्हात्रे :-**

मी काय सांगतो ते ऐका. एक रुपयाचा मोबदला त्याला आपण देऊ शकलो नाही. तुम्ही जे म्हणता मुदतवाढ कसली देणार, तुमच्याकडेच जागा नाही.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

मी वेस्टचे म्हणालो नाही.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही जे म्हणता ते ठरावाला मग त्याच्यावर त्याचा इफेक्ट होतो. आपण जे बोललात त्यामध्ये हे ही मेन्शन करा की जिकडे अक्च्यूअली प्रॅक्टीकल जागा नाही. आपण चुकीने त्या जागेचा ठेका काढला. त्या जागेचा की, ज्या जागेचा ठेका काढायला नको होता अशा लोकांचे पैसे आम्ही परत करणार. त्यांना तुम्ही मुदतवाढ देऊन काय करणार?

**चंद्रकांत वैती :-**

आतापर्यंत ज्या सुचना इथे करण्यांत आल्या. रेल्वेचा जो पाच लाखाचा आहे त्यासाठी राईट अप करण्यापेक्षा मला वाटते तो विषय एकदा पुन्हा उपआयुक्त साहेबांचे असे मत आहे की, पुन्हा आपण त्यासाठी प्रयत्न करावे. रेल्वेला विचारावे आणि रेल्वेला विचारुन जर पुन्हा परवानगी मिळत नसेल तर पुढच्या ह्याच्यामध्ये राईट अप करुन टाकावा. कारण पाच लाखाची ती एक तजवीज आपण केली होती. बजेटमध्ये प्रोव्हीजन केले होते. तर आपल्याला इतके वाढेल परंतु रेल्वेमुळे ते पाच लाख रुपये वाढणार नाहीत. मग बजेट डेफिसिट दिलेली मग त्यासाठी राईट अप करायचे आहे. पुन्हा एकदा प्रयत्न केल्यास जर आपल्याला रेल्वेने परवानगी दिली तर तसे प्रयत्न करावेत आणि आतापर्यंत ज्या सुचना करण्यांत आल्या की, आता मिरा भाईंदरच्या मुख्य रस्त्याचे काम चालू आहे. त्या रस्त्यावर कुठेही होर्डिंग्ज लावता आले नाही. कारण बाजूला कॉंक्रीटचे गटाराचे काम चालू होते. आणि इतर ठिकाणी ते होर्डींग्ज लागले आणि एकदा ती सुरुवात केल्यानंतर त्याच्यामध्ये भांडणे होत, वाद होत तशा प्रकारे. परंतु साधारण अठ्ठावन्न लाखाचे वार्षिक उत्पन्न वाढीमध्ये आपण निश्चित भूमिका बजावू शकलो. मात्र हे करतांना ठेका काढल्यानंतर पहिल्या चार महिन्यामध्ये त्या ठेकेदारांना कुठल्याही प्रकारची अंमलबजावणी त्या ठेक्यावर करता आली नाही. तर हा जो चार महिन्यांचा कालावधी आहे तो त्यांना वाढवून देण्यांत यावा असा मी ठराव मांडत आहे.

**रिटा शाह :-**

ठराव अनुमोदन करण्याच्या अगोदर, प्रशाकीय राज्य होते तेव्हा माझ्याकडे ती माने मॅडम आल्या होत्या की, होर्डिंग्ज लावायचा ठेका त्यांनादेखील दिला गेला होता. तेव्हा मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या निवडणुका लागल्या होत्या आणि त्या म्हणाल्या की, तुम्ही महापालिकेची जाहिरात लावा. तुमच्या ह्यामध्ये आम्ही वाढ करुन देऊ. त्यानंतर हरेश पाटील यांच्याकडे गेले. हरेश पाटलांनी व्हर्बली काहीतरी कमिटमेंट केले होते. त्यांना काय झाले माहिती नाही. त्यानंतर जो तुम्ही ठेका दिला होता. तर तिने आपली जाहिरात बिनपैशाने केली. काहीच कर न आकारता त्यांनी केली आणि रद्द करुन नवीन कोणाला देऊन टाकले आहे. मग ह्याबद्दल काय आहे?

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो) :-**

पुर्वी अशी पद्धत होती. अर्ज करायची आणि स्क्वेअर फुटच्या दराप्रमाणे करायचे. त्यामुळे वर्षाला फक्त जाहिरातीचे एकोणतीस हजार रुपये मिळायचे. त्यामुळे आपण झोन पाडून टेंन्डर काढल्यानंतर आपल्याला अठ्ठावन्न लाख रुपये मिळायला लागले. त्यामध्ये तुम्हांला जर एखादा झोन पाहिजे असेल तर त्यांना टेंन्डर भरा म्हणून सांगितले होते. मग त्यांनी एखादा भाग मिळाला की, नाही हे मला माहिती नाही.

**रिटा शाह :-**

नाही मिळाला. मी कोणावर आरोप लावत नाही. त्यांनी ज्याप्रमाणे प्रशासकीय काळामध्ये या पद्धतीने चालत होते. त्यापद्धतीने त्यांनी ते घेतले होते. त्याच्यामध्ये टाईम लिमिट नाही. मी तुम्हांला पत्र दाखवेन. खरोखर त्या बाईला डावलले आहे आणि ती येथील स्थानिक आहे आणि एक महिलेवर अन्याय झालेला आहे. माझा काही स्वार्थ नाही आणि खरोखर ती बाई नगरपालिकेचे इलेक्शन लागले तेव्हा बिनपैशांनी तिने जाहिरात केलेली आहे तेव्हा हरिश पाटील साहेबांनी तीला व्हर्बली सांगितले होते. तुमचे आहे तेवढे मान्य करणार त्यांना फक्त तोंडी कमिटमेन्ट फक्त पाचच केलेले आहे आणि पत्रामध्ये वेगळाच उल्लेख आहे. त्यांना अजून पाच वाढवून द्या अशी आमची मागणी आहे.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त सो.) :-**

आपण जे टेन्डर अठ्ठावन्न लाखाचे मंजुर केले त्या जर जागेवर त्यांना दिले तर त्या ठेकेदाराचे नुकसान होणार म्हणून इतर खाजगी ठिकाणी त्यांचे जे अर्ज येतील. मागच्या वेळेला खाजगी ठिकाणावर त्यांना जिथे पाहिजे तिथे पाच होर्डिंग्ज दिले. पण टेन्डर मंजुर केले त्या ठिकाणी त्यांना पाहिजे तर ते मिळणार नाही.

**रिटा शाह :-**

टेंन्डर मंजुर केलेले आहे त्या जागी आम्ही मागणार नाही. कारण एक महिला, एक महिला लोक प्रतिनिधीच्या हिशोबाने माझ्याकडे आलेली आहे. त्या बाईला जसे पत्रात नमुद केलेले आहे. तुम्ही जे टेन्डर केलेले आहे ते नका देऊ. पण टेन्डर मध्ये जेवढे नमुद केले आहे तेवढी जागा त्यांना द्या.

**अशोक पाटील :-**

सभापती साहेब, आता हा पे ॲन्ड पार्किंग आणि होर्डिंग्जचा जो विषय चर्चेला जात आहे याच्या संदर्भात पुर्वीचा काशिमिरा रोड आणि आताचा डॉ. हेडगेवार मार्ग याचा जो वारंवार उल्लेख होतो आहे. त्याच्यामुळे होर्डिंग्ज आणि पे ॲन्ड पार्किंग यांना जो विलंब झाला ठेकेदारांनी त्यांचे वसुली करता आली नाही. तर हा जो रस्ता त्याच्याकरिता आपण सत्तावीस कोटी रुपये खर्च करत आहोत तर त्या विषयी पेपरवर उलटसुलट बातम्या येत आहेत. काम थांबलेले आहे तर नक्की यांचा लुक आऊट काय आहे.

**मा. सभापती :-**

नक्की मला तरी काही माहिती नाही. पेपरमध्ये काहीही बातम्या देऊ शकतात. परंतु याच्यासाठी रस्ता आणि उड्डाणपुलासाठी देखरेख करण्याकरिता स्थायी समितीमधून प्रत्येक पक्षाचे एक-एक असे पाच सदस्य निवडणार आहे. त्याकरिता ही कमिटी लवकतात लवकर रोड आणि उड्डाणपूल पूर्ण करण्याकरिता नेमणार आहे. मला डिसेंबरपर्यंत पूर्ण करुन घ्यायचे आहे.

**नितीन ठाकूर :-**

राष्ट्रवादी पक्षातर्फे सन्मा. सदस्य श्री. याकुब कुरेशी यांचे नांव या समितीवर घ्यावे.

**मिलन म्हात्रे :-**

आजच्या सभेमध्ये ही जी कमिटी आपण नेमतो त्याची व्यवस्थित नावानिशी कमिटी तयार करा. त्यांना तुम्हांला एक वाहन द्यायला लागेल. एक किंवा दोन वाहने द्यावी लागतील.

**याकुब कुरेशी :-**

अध्यक्ष साहेब तुम्हांला एक विनंती करु इच्छितो की, आपल्याकडे सहा पक्ष आहेत आणि तुम्ही पाच लोकांची नेमणूक करता म्हणून माझे असे मत आहे की, सहा सदस्यांची करावी.

**मा. सभापती :-**

सहा सदस्यांची करु.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त साो.) :-**

राष्ट्रवादी चे सदस्य कोण?

**नितीन ठाकूर :-**

याकुब कुरेशी.

**मा. सभापती :-**

शिवसेनेनचे सदस्य?

**मिलन म्हात्रे :-**

अनंत पाटील. सभापती व्यतिरिक्त पक्षाचा प्रतिनिधी असेल. सभापती पदसिद्ध आहे.

**रिटा शाह :-**

स्थायी समितीचे घेतले की, स्थायी समितीच्या बाहेरचे घेतले.

**मा. सभापती :-**

ज्याला पाहिजे त्याने आपल्या पार्टीचे कोणीही घ्यावे.

**रिटा शाह :-**

मग असे सांगा ह्या लांकोना वाटले इथे जेवढे आहेत त्यांनाच करायचे.

**मिलन म्हात्रे :-**

स्थायी समितीच्या मेंबर्सला जेवढ्या पावर्स आहेत. मागच्या वेळी जशी नाले सफाईला कमिटी नेमली.

**चंद्रकांत वैती :-**

सर्व स्थायी समितीचे सदस्य घ्या.

**रिटा शाह :-**

जसे सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती यांनी सांगितलेले बरोबर आहे की, सर्व स्थायी समितीचे मेंबर घ्या. नाहीतर वादावाद निर्माण होणार. मी पहिले सांगणार त्या पक्षाचे कॉन्ट्रॅक्ट कोणाकडे आहे. चिठ्ठ्या टाका आणि स्थायी समितीमधूनच घ्या असे माझे म्हणणे आहे.

**याकुब कुरेशी :-**

ज्या पक्षाला असा अडथळा असेल त्यांनी चिठ्ठ्या टाकाव्यात. आमच्या पक्षामध्ये काही अडचण येत नाही. आम्ही एकमताने ठरविलेले आहे.

**रिटा शाह :-**

तुम्ही कॉंग्रेस पक्षाचे नांव डिक्लअर करा.

**मा. सभापती :-**

मी कसा डिक्लअर करणार.

**रिटा शाह :-**

आपण सभापती आहात. सर्व पक्षांनी केले तर तुम्ही पण करा. आपले नेते पण तुमच्या बाजूला आहेत.

**नितीन ठाकूर :-**

सभापती साहेब, इथे आमच्या पक्षाचे अध्यक्ष कोणी नाही. पण आम्ही डिक्लेअर केले ना.

**रिटा शाह :-**

आपले नेते आहेत ना. तुमच्या बाजूला सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती आहेत त्यांना पण डिक्लअर करायला सांगा.

**मा. सभापती :-**

बाहेरचे दुसरे नगरसेवक कशाला ठेवता? कुठल्याही बाहेरच्यांना काम घेऊ द्या. स्थायी समितीचे काम करत नाही म्हणून कमिटी नेमली.

**दिनेश नलावडे :-**

सभापती साहेब, काँग्रेस पक्षातर्फे सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती यांचे नांव लिहा.

**याकुब कुरेशी :-**

स्थायी समितीचे काम करत नाहीत असा तुम्ही आरोप केला आहे.

**नितीन ठाकूर :-**

सगळे काम करतात. उलट प्रशासन चांगले काम करीत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आता ही नांवे डिक्लअर झालेली आहेत. सभापती साहेब, हा विषय लाईटली घेऊ नका. आपल्या कमिटीने कुठल्या तारखेपासुन सुरुवात करायची आणि या कमिटीबरोबर आमचे सिटी इंजिनिअर, नगररचना विभागाचे अधिकारी त्यांना बंधनकारक असणार आहे. उद्या ते बोलले नाही पाहिजेत की, आम्हांला वेळ नाही म्हणून. कारण त्यांच्या व्यतिरिक्त जाणे आणि तो जो ठेकेदार आहे या इकडचा निराळा तिकडचा निराळा त्यांची कोणतरी माणसे घ्या. ते तिकडे हजर पाहिजेत. ज्या आम्ही सुचना करु ते कोण उतरवणार आणि आर्किटेक्टलासुद्धा याच्यामध्ये इन्व्हॉल्व्ह झाले पाहिजे. त्यांचा माणूस किंवा ते स्वतः आम्ही आपले फिरायचे त्यांनी हा हा करायचे आणि कामे जशीच्या तशी पडून राहतात ते पण हसे होऊन जाईल. हा सगळा स्टाफ आणि नगरपालिकेचे कोणी क्लार्क असतील. बांधकाम विभागाचे ते बरोबर लागतील हा रस्ता पूर्ण होईपर्यंत दोन रस्ते यामध्ये आहेत. एक उड्डाणपुल आहे आणि काशिमिरा रोड.

**दिपक खांबित :-**

आढावा घेण्यांत आला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

तुम्ही काही सुचना देणार. उद्या कोणीच नसणार. आढावा म्हणजे काय आहे? आम्ही सांगायचे आणि ह्याने ऐकायचे. काम शुन्य तसे नको. गेल्या आपण सर्व्हेमध्ये काय काम केले? त्यामध्ये काय प्रोग्रेस आहे. हा रिपोर्ट आपण त्याचे मिनिटस् बनले पाहिजे. हे दोन रस्ते आहेत. काशिमिरा रोड वेगळा आणि उड्डाणपुलाचा वेगळा आहे.

**रिटा शाह :-**

हे बनवायचा सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती यांनी जो ठराव मांडलेला आहे. त्याला माझे अनुमोदन आहे आणि तो विषय तिथेच संपवा.

**नितीन ठाकूर :-**

साहेब, हा जो विषय काशिमिरा रोडचा निघाला आहे याला आपण जे लोन एम.एम.आर.डी.ए. कडून घेतले आहे ते पास झाले आहे का? त्याचे पेमेन्ट कोण करते.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

आपण एम.एम.आर.डी.ए.कडे पैशाची मागणी आर्थिक सहाय्याची मागणी केली होती. एम.एम.आर.डी.ए.ने सांगितले की, आमची आर्थिक परिस्थिती समाधानकारक नसल्यामुळे आम्ही रक्कम उपलब्ध करुन देऊ शकत नाही. तुम्ही याचा विचार करावा तर आता आपल्याला आ.डी.बी.आय.

किंवा इतर संस्थेकडे नाबार्डकडे वगैरे मागणी करण्याचा प्रस्ताव त्यांच्याशी चर्चा करुन पुढच्या सभेत सादर करावयाचा आहे.

**नितीन ठाकूर :-**

एवढी मोठी रक्कम आहे तर आपल्या बजेटमध्ये तरतुद आहे का? समजा त्याने पण नामंजुरी केली.

**याकुब कुरेशी :-**

प्रकरण क्र. ६९ मध्ये काय रुलिंग दिली?

**मा. सभापती :-**

आपण तीन महिने वाढ दिली.

**रिटा शाह :-**

साहेब त्या बाईला आपण अजून पाच वाढवून देणार ना? मागे अर्ज केलेला आहे.

**प्रकरण क्र. १६९ :-**

महापालिकेने दिलेल्या पे ॲन्ड पार्क व होर्डीग्ज युनिपोल, ॲडपोल किओस च्या ठेक्याबाबत

**ठराव क्र. १४९ :-**

**महापालिकेने दिलेल्या पे ॲन्ड पार्क या योजनेच्या ठेक्याबाबत.**

मा. उपायुक्त (मुख्यालय) यांनी दिलेल्या विषय संदर्भातील गोषवाऱ्याचे वाचन करण्यात आले. महापालिका क्षेत्रात महापालिकेचे उत्पन्न वाढवण्याच्या दृष्टीने पे ॲन्ड पार्क या धर्तीवर शहरातील एकुण पाच ठिकाणी खालील नमुद केल्याप्रमाणे पे ॲन्ड पार्कचा पाच वर्ष कालावधीचा ठेका मा. प्रशासकिय ठराव क्र. १७० दिनांक ५/८/०२ नुसार मंजूर करण्यात आला होतो. त्याप्रमाणे संबंधित ठेकेदारास वर्क ऑर्डर देण्यात आली.

| ठेकेदाराचे नाव व ग्रुप नंबर | स्थळ | कालावधी | ठेका पाच वर्षाची रक्कम | वर्क ऑर्डर दिनांक | पाच वर्षाची मुदत तारीख | प्रत्यक्षपण चालू झालेली दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| मे.एस.एस इंटरप्रायजेस ग्रु. नं १ | मिरारोड रेल्वे स्टेशन जवळ | ५ वर्ष | २५.९८.९३० | १७/८/०२ | १७/०८/०७ | १४/१/०३ |
| मे. सुशीला ट्रेडींग ग्रु. नं २ | गोल्डन नेस्ट मिरा भाईंदर - रोड गणेश सो. टेम्पो स्टॅन्ड जवळ काशीमिरा रोड | ५ वर्ष | १०.००.००० | १७/८/०२ | १७/८/०७ | १४/१/०३ |
| मे. सुशीला ट्रेडींग ग्रु. नं. ३ | अस्मिता प्लाझा ते लाईफ लाईन हॉस्पिटल मिरा रोड | ५ वर्ष | ९०.००० | १७/८/०२ | १७/८/०७ | १४/१/०३ |
| मे. सुशीला ट्रेडींग ग्रु. नं. ४ | रेल्वे स्टेशन रोड ते पोलीस चौकी देना बॅक मिरा रोड | ५ वर्ष | १.५०.००० | १७/८/०२ | १७/८/०७ | १४/१/०३ |
| मे. सुशीला ट्रेडींग ग्रु. नं. ५ | रेल्वे स्टेशन भाईंदर (प) (पश्चिम रेल्वेच्या मालकिची) | ५ वर्ष | ५.५०.००० | १७/८/०२ | | |

वर नमुद केल्याप्रमाणे ग्रुप नं १ ते ४ चा ठेका मंजूर करण्यात आला होता महापालिकेने दि. १७/०८/०२ पासून प्रत्यक्ष वर्क ऑर्डर दिली होती परंतु ग्रुप नं १,३,४ मधील दर्शविलेली जागा मिरा रोड भागातील शांतीनगर येथिल आहे. संबंधित विकास कर्त्याने जागे बाबत हरकत व हक्क दाखवल्याने वाद निर्माण झाल्याने ठेकेदार त्या ठिकाणी वर्क ऑर्डर दिल्यापासून पे ॲन्ड पार्कची योजना चालु करू शकला नाही त्यानंतर महापालिकेने संबंधित विकास कर्त्यास समज देऊन महापालिकेची जागा असल्याबाबत खात्री करून दिली त्यानंतर दि. १४/०१/०३ पासून पे ॲन्ड पार्क योजना ठेकेदाराने प्रत्यक्षपणे सुरू केली

ग्रुप नं. २ मध्ये दर्शवलेली जागा महापालिकेच्या डॉ. हेगडेवार मार्ग (रेल्वे फाटक ते अहमदाबाद हायवे) ही असून रस्त्याचे रुंदी करण्याचे काम सुरू असल्याने लगेचच पे ॲन्ड पार्क योजना सुरु करता

आली नाही. परंतु काही भागात दि. १४/०१/०३ पासून पे ॲन्ड पार्क योजना सुरू केली आहे. त्यामुळे ग्रुप नं. १,२,३,४ यांना दि. १७/०८/०२ ते दि. १३/०१/०३ या कालावधीत (६ महिने) मध्ये पे ॲन्ड पार्क योजना वरील नमुद केलेल्या कारणामुळे सुरू करता आली नाही. ठेकेदारास आलेल्या अडचणीचा विचार करता ठेकेदाराच्या ठेक्याची (पाच वर्षाची) दि. १७/०८/२००७ पर्यंतची मुदत पुढील ६ महिन्याने म्हणजे दि. १७/०२/२००८ पर्यंत वाढवण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

ग्रुप नं. ५ मध्ये दर्शविलेली जागा ही पश्चिम रेल्वेच्या मालेकीची असून महापालिकेने पश्चिम रेल्वे कडे परवानगीबाबत पत्रव्यव्हार केला असून पश्चिम रेल्वेकडून परवानगी मिळेल असे दिसून येत नाही तसेच पश्चिम रेल्वे या ठिकाणी पे ॲन्ड पार्क सुरू करणेस मज्जाव करीत आहे. ही जागा रेल्वे प्रशासनाच्या मालकीची असल्याने महापालिकेस पे ॲन्ड पार्क वापरासाठी असलेला विरोध लक्षात घेता ५,५०,०००/- पाच वर्षाची रक्कम ठेकेदार जमा व उपलब्ध न केल्याने देऊ शकत नाही. तरी सदरहू रक्कम निर्लिखीत करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती.** **अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. १६९ (अ) :-**

महापालिकेने दिलेल्या पे ॲन्ड पार्क व होर्डीग्ज युनिपोल, ॲडपोल किओस च्या ठेक्याबाबत

**ठराव क्र. १५० :-**

**होर्डीग्ज, युनिपोल, ॲडपोल किओसच्या ठेक्या बाबत.**

मा. उपायुक्त (मुख्यालय) यांच्या या विषयाचा गोषवारा वाचन करण्यात आला. महापालिकेच्या दृष्टीने शहरातील मुख्य रस्त्यांवर १०० ठिकाणी खालील नमुद केल्याप्रमाणे एजन्सीना होर्डीग्ज लावण्याचा ठेका देण्यात आला आहे.

| ग्रुप | प्रकार | एजन्सीचे नाव | ५ वर्षाचा महसूल | करारनाम्यानूसार ठेक्याला सुरूवात दि. | ठेका मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ए | होर्डीग्ज | मे ॲक्टयू ट्रायो | ६,५२,००० | २६/८/०३ | २६/८/०८ |
| बि | होर्डीग्ज | मे. सोल्युशन ॲड. | ६,५०,००० | २३/१/०३ | २३/१/०८ |
| सी | होर्डीग्ज | मे ॲक्टयू ट्रायो | ५,१५,६७० | २६/८/०३ | २६/८/०८ |
| डी | होर्डीग्ज | मे. सरस्वती ॲड. | ६,५०,००० | २३/१/०३ | २३/१/०८ |
| ई | होर्डीग्ज | मे ॲक्टयू ट्रायो | ५,२६,६४५ | २६/८/०३ | २६/८/०८ |
| एफ | होर्डीग्ज | मे. ए.व्ही.एम ग्राफिक्स | ५,४३,१५० | २६/८/०३ | २६/८/०८ |
| जी | होर्डीग्ज | मे. मुद्रा आर्ट | ६,४९,७८२ | ११/२/०३ | ११/२/०८ |
| एच | होर्डीग्ज | मे. ए.व्ही.एम ग्राफिक्स | ४,११,००९ | २६/८/०३ | २६/८/०८ |
| आय | होर्डीग्ज | मे. मुद्रा आर्ट | ६,२३,३२३ | २/२/०३ | २/२/०८ |
| जे | होर्डीग्ज | मे. मुद्रा आर्ट | ६,७८,१६६ | १६/३/०३ | १६/३/०८ |

वर नमुद केलेल्या ठिकाणा पैकी मिरा रोड मध्ये शांतिनगर मधील रस्ते, डॉ हेगडेवार मार्ग (रेल्वे फाटक ते अहमदाबाद हायवे) मुंबई अहमदाबाद हायवे महामार्ग क्रमांक ३ सार्वजनिक बांधकाम विभाग ठाणे या रस्त्यांचा समावेश होत आहे. या ठिकाणी होर्डीग्ज उभारण्यात शांति स्टार बिल्डर्सने रस्त्याचा वाद तयार करून विरोध केला होता त्याच प्रमाणे डॉ. हेडगेवार मार्गावरील रस्ता रंध्दीकरणाच्या कामामुळे होर्डीग्ज उभारण्यास आलेल्या अडचणी, अहमदाबाद हायवेवर होर्डीग्ज उभारण्यास, पी.डब्ल्यु.डी काकाण भवन यांचा विरोध मिरा भाईंदर उत्तन रोड पी.डब्ल्यु.डी ठाणे यामुळे मंजूर केलेल्या ठिकाणाच्या १०० ठिकाणपैकी ३९ ठिकाणी होर्डीग्ज उभारता आले नाहीत या अडचणी विचारात घेता वर नमुद केलेल्या पाच वर्ष कालावधीची मुदत (रकाना क्र. ६ तील) पुढे ३ महिन्यानी वाढवण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

युनिपोल व स्ट्रिट लाईट पोलवर जाहिरात लावण्याचा ठेका खालील प्रमाणे देण्यात आला आहे.

| अ | प्रकार | एजन्सीचे नाव | ५ वर्षाचा महसूल | करारनाम्यानूसार ठेक्याला सुरूवात दि. |
|---|---|---|---|---|
| | युनिपोल | मे. सोल्युशन ॲड. | ३५,००० | १३/२/०३ |
| | ॲडपोल किओस (स्ट्रिट लाईट) | मे. ए.व्ही.एम ग्राफिक्स | २५,११,००० | |

वर नमुद केलेल्या युनिपोल राष्ट्रीय महामार्ग क्र. ३ अहमदाबाद हायवेवर उभारण्यास परवानगीची मागणी केली आहे. परंतू आज पर्यंत परवानगी प्राप्त झालेली नाही. तसेच महापालिका क्षेत्रात एकुण १००० स्ट्रिट लाईटवर जाहिराती लावण्याचा ठेका देण्यात आला आहे. परंतू स्ट्रिट लाईटवर जाहिराती लावण्यासाठी अनेक वेळा पत्रव्यव्हार करून परवानगीची मागणी केली आहे परंतू आज पर्यंत परवानगी मिळालेली नाही. त्यामुळे युनिपोल व स्ट्रिट लाईट (ॲडपोल किओस) वरील जाहिराती लावण्याकरीता परवानगी मिळाल्यानंतरच ठेक्याच्या कालवधीचा प्रारंभ समजण्यात यावा यास ही सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. हरेश गावंड.** **अनुमोदन :- श्री. चंद्रकांत वैती.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण १७० चे वाचन केले)

**हॅरज बोर्जीस :-**

सन्मा. सभापती साहेब, सर्वप्रथम या विषयावर चर्चा होण्या अगोदर मी आपणांस सभेच्या वतीने धन्यवाद देतो. आपणाला मी जे पत्र दिले त्या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन आपण अतिशय महत्वाचा विषय सभेपुढे आणला त्याबद्दल मी आपणांस धन्यवाद देतो. सदर सुभाषचंद्र बोस मैदान विकसित करण्यासाठी आपल्या सर्वांना माहिती असेल आपले अधिकारी अजित पाटील यांचे अतिशय मोलाचे सहकार्य या सुभाषचंद्र बोस मैदानासाठी आहे. याच्या आधी जी कामे झाली त्या कामासाठी खांबितनी सुध्दा विशेष सहकार्य केलेले आहे. इतरही अधिकारी आहेत त्या सर्वांचे पण मी मनःपूर्वक अभिनंदन करतो. त्यांना धन्यवाद देतो. परंतु आजच्या सभेचा जो विषय आहे त्यामध्ये लाल मातीचा थर, खेळपट्टी बनविणे आणि पाईप लाईन तिन्ही अत्यावश्यक कामे आहेत. मागे ब-याच कालावधीपासून मी कामाच्या पूर्ततेच्या मागे आहे. आपण या संबंधित अधिका-यांना सदर काम किती कालावधीमध्ये पूर्ण होईल याची जरा त्यांच्याकडून माहिती घ्या आणि याच मैदानावर गेल्या आठवड्या अगोदर आपले कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा दशोरे यांच्या सोबत त्या अधिका-यांना घेऊन मी त्या ठिकाणी गेलो होतो. आपल्या माहितीसाठी सभेला सांगू इच्छितो की, याच मैदानावार दोन ठिकाणी संप आणि पंप हाऊसचे काम सुरु होणार आहे आणि मुर्ध्याला जाताना आपला जो गेट आहे, टूवर्ड मुर्धा, त्याच्या डाव्या बाजूचा संपूर्ण भाग या दोन्ही संप आणि पंप हाऊसने संपूर्ण आच्छादित होणार आहे. सदर मैदान विकसित करण्यासाठी गेल्या किती वर्षापासून, किती लोकांनी, किती प्रयत्न केले, किती मेहनत घेतली हे आपल्या सर्वांना माहिती आहे. या मैदानावर संप आणि पंप हाऊसचे काम होऊ नये अशा मताचा मी अजिबात नाही. तिथे ते काम झाले पाहिजे. परंतु दशोरेंना मी त्या ठिकाणाचा स्पॉट दाखविलेले आहे. त्या स्पॉटवरच ते काम व्हावे अशा मताचा मी आहे. अन्यथा या गोष्टीला माझा ठाम विरोध असेल. कारण जवळ जवळ पंधरा ते वीस टक्के भाग हा दोन्ही संप आणि पंप हाऊसमुळे आपल्या मैदानाचा भाग संपूर्ण खराब होणार आहे. तर कृपया स्थायीचे सभापती या नात्याने या गोष्टीकडे आपण विशेष लक्ष द्या. १७ तारखेला मला वाटते आपले कमिशनर साहेब हजर होतील. कमिशनर साहेब आल्यानंतर आपल्या अध्यक्षतेखाली एखाद्या सभेचे आयोजन करा. कारण अतिशय महत्वाचा विषय आहे. पुढे भविष्याच्या दृष्टीने या कामाच्या संदर्भामध्ये आपल्याला आजच लक्ष घालणे महत्वाचे आहे. मी आपणाला विनंती करतो की, या कामामध्ये जातीन लक्ष द्या.

**अशोक पाटील :-**

सभापती साहेब, विषयाला सुरुवात झालेली आहे आणि सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस यांनी संबंधित अधिका-यांची पण तारीफ केलेली आहे. अजित पाटील आणि केळकर साहेबांचे नांव घ्यायला

ते विसरले. मैदान विकसित करण्यासाठी सुचना मांडल्या आहेत त्या योग्य आहेत. त्याच्याशी मुळ प्रश्न असा उद्भवतो की, हे जे मैदान आपल्या शहराची शान आहे हे विकसित झालेले आहे. या मैदानाचा मूळ मालकी हक्क या संदर्भात महानगरपालिकेने काय पूर्तता केलेली आहे. या जमिनीच्या हस्तांतरणा संदर्भात आता आपण लाखो रुपये इतक्या वर्षापासून खर्च करित आलो आहोत. केळकर साहेब याला साक्षी आहेत की, त्यांच्या कारकिर्दीत हे काम झालेले आहे आणि आजसुद्धा ते महानगरपालिकेच्या चार्जमध्ये आहेत. विषय मैदानासंबंधी आलेला आहे तर या मालकी हक्कासंदर्भात आपण काय कार्यवाही केली आहे. आतापर्यंत आपण लाखो रुपये नगरपालिकेच्या कामावर खर्च करीत आलो. सुविधा व्हायला पाहिजे. मैदान व्हायला पाहिजे. याबद्दल माझेही दुमत नाही. शहराची ती एक शान आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सभापती साहेब यांच्या संमतीने सांगतो की, आपण हा प्रस्ताव मी असतांनाच जिल्हाधिकारी यांच्याकडे ही जागा हस्तांतरीत करण्यासाठी आपण प्रस्ताव पाठविला होता. गेल्या काही दिवसांपूर्वी आर.डी.सी. साहेबांकडून जिल्हा निवासी अधिकारी यांच्याकडून एक पत्र आले की, या जागेची मोजणी करण्याकरिता अमुक रक्कम लवकरात लवकर भरावी. तर ती रक्कम तातडीने बांधकाम विभागाकडून भरणा करण्यात आली आणि या जागेची मोजणी झाल्यानंतर त्या जागेचा ताबा नगरपालिकेला देण्याची कारवाई जिल्हाधिकारी कार्यालयाकडून होणार आहे. परवाच मी त्यांच्याशी चर्चा केली. ते पैसे भरले का? आयुक्तांनी चार दिवसांपूर्वी याला मान्यता दिलेली आहे अगदी तात्काळ रक्कम सर्वेसाठी भरावी. तुमच्याकडे प्रस्ताव आला का?

**मिलन म्हात्रे :-**

किती रक्कम आहे ते बघा.

**अशोक पाटील :-**

केळकर साहेब, आपण टाऊन प्लॅनिंगसाठी थोडीशी सखोल चौकशी करा. आपण सांगा कलेक्टरांकडे पैसे भरण्यासाठी प्रस्ताव आलेला आहे. परंतु ही जागा मुळातच सॉल्ट डिपार्टमेन्टच्या अखत्यारीत येते. सर्वे नं. ७७८ त्यांचा उतारा बघा.

**कल्याण केळकर (मा. उपाआयुक्त सो.) :-**

शासनाचीच जागा आहे. त्यापैकी कलेक्टरची जागा आपण हॅन्ड ओव्हर करुन घेऊ. बाकीची जागा आहे. ती कलेक्टर सर्वे करायची आहे. त्याचा सर्व डिटेल सर्वे करायचा.

**अशोक पाटील :-**

म्हणजे अजून प्रक्रीया सर्वे करण्यापासून सुरुवात होते.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

यामध्ये ते पैसे भरायला सांगितले ते पंधरा दिवसांत सर्वे करुन देणार.

**अशोक पाटील :-**

त्या व्यतिरिक्त आता समजा ही सॉल्ट खात्याची आहे. काही कलेक्टरची लॅन्ड आहे. त्या व्यतिरिक्त आमच्या शिलोत्री बांधवांच्या जमिनी त्याच्यामध्ये आहेत आणि आपल्याकडे जे अप्रोच झाले होते. आपण त्यांना आश्वासन देखील तोंडी दिले होते. लेखी नाही पण तोंडी दिले होते. त्या संदर्भात ठोस विचार व्हावा.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती महोदय, मघाशी आपण जे बोललात सर्वे करण्याकरिता आपल्याला जे काही पैसे भरायचे आहेत यामध्ये सॉल्ट डिपार्टमेंन्टच्या नावावर जर सात-बारा उतारा असेल तर सिटी सर्वेच्या नियमानुसार त्या उतार्‍याच्या मालकाची संमती असावी लागते. तुम्हांला जे आर.डी.सी.चे पत्र आलेले आहे. त्याचा पत्रव्यवहार आपण सॉल्ट डिपार्टमेन्टच्या स्थानिक अधिकार्‍यांना पत्रव्यवहार तुम्ही करा. त्यांची संमती मिळवा. मोजणी करायला ते लोक मनाई करतील असे वाटत नाही. तोच न्याय हे जे बाकीचे कोण शिलोत्री आहेत ज्यांचा त्याच्यावर हक्क आहे. कारण लगतच्या सर्वेचे सातबारा उतारे द्यावे लागतील. कारण सर्वेला त्याच्या नोटीसच निघणार आहेत आणि त्या नोटीसेस निघाल्यानंतर जे कोण तिकडचे आहेत किंवा ज्यांचा कोणाचा अधिकार आहे त्यांचे त्यावेळेला स्टेटमेन्ट होणार आहेत. त्यांच्या सह्या घेणार आहेत. जर तिथे हरकत असेल त्या हरकती तिथे ते नोदवणार आहेत आणि त्यात डी.एल.आर.चा जो अधिकारी आहे तो त्या साक्षी वगैरे तिथे नोंदवून घेतो. तारीख निहाय साक्षी वगैरे तिथे नोंदविल्या जातात. त्याकरिता जेवढे लगतचे सर्वेवाले आहेत त्यांना त्याची माहिती तुम्ही

द्या. त्यांची संमती घ्या. वाटल्यास त्यांच्याकडून देखील फॉर्म भरून घ्या. ते सहकार्य जरुर करतील. हा विषय आपण या ठिकाणी आणला आहे. एकूण नऊ लाख खर्च आपण म्हणतोय. याच्यामध्ये फक्त लाल मातीचा पुरवठा करणे आणि खेळपट्टी तयार करुन पाण्याची पाईपलाईन टाकणे. माझ्या माहितीनुसार पाण्याची पाईप लाईन टाकणे हा विषय यामधून डिलीट करावा. कारण जी आपण पाण्याची पाईपलाईन टाकणार आहोत ते सर्व पाईप आपल्या गोडाऊनला उपलब्ध आहेत. मी गोडाऊन बघून आलेलो आहे. दोन पाईपलाईन जवळ जवळ दोन बंडल्स आपल्या गोडाऊनला आजच्या तारखेला उपलब्ध आहेत. आपल्याकडे एक इंचाची पाईपलाईन सुद्धा आहे. मी गोडाऊन बिघतलेला माणूस आहे. टेम्बावर पाईपलाईन टाकायची होती तेव्हा पण मला असेच उत्तर दिले.

**मा. सभापती :-**

ठिक आहे. आपण फक्त दोनच लाख पास करतो. इथे काहीच नाही. आपल्याला काय पाहिजे. किती गाडी माती पाहिजे. किती पाईप पाहिजे. काहीच नाही. पण तात्पुरते दोन लाख पास करतो.

**मिलन म्हात्रे :-**

याच्यात आपण चार लाख पण केले तरी माझे काही ऑब्जेक्शन नाही. आपण खर्च करावा पण जी वस्तू आपल्याकडे आहे जर आपल्याला पाण्याची पाईपलाईन असेल तर हा विषय यामधून डिलीट करावा. पाईप आपल्याकडे आहेत. आपण ते विकत आणलेले आहेत. ते त्यामध्ये बसविले पाहिजेत. तो विषय डिलीट करा. पाईपचे बाजूला ठेवू या. अगोदर तिकडे पाण्याचा, लाल मातीचा भराव झालेला आहे. पण सदर भराव किती घन मीटर आपण टाकलेला आहे. किती केव्ही फुट आत टाकलेला आहे. याचा अंदाज आपल्या बांधकाम विभागाला आहे का? त्याचा तक्रारदार मी आहे. मागच्या वेळेला चुकीच्या पद्धतीने मातीचा भराव झाला. कारण आपण डंम्पींग ग्राऊंड केले त्याच्यावरती माती टाकायची. जवळ जवळ दोन फुट माती आली पाहिजे. त्यापेक्षा कमी नसावी या नियमानुसार आपण ते त्यांना मंजरमेन्ट दिले. त्यानुसार माती पडायला लागली. माती पडतेवेळी मी स्वतः गेलो. त्या ठेकेदाराचे तक्रारीमध्ये नांव स्पेसिफीक मेन्शन केले पाहिजे की, ही माती नऊ सहा इंचाच्या थरा व्यतिरिक्त पडलेली नाही. त्यावेळेचे आपले पैसे फुकट गेलेले आहेत. हा विषय मुद्दाम आणतो की, जर त्या ठेकेदाराने त्या वेळी जर तुमच्याकडे क्वान्टीटी कमी दिलेली असेल तर त्याला तुम्ही परत बोलावून त्याला नोटीस मारुन ती क्वान्टीटी पूर्ण करायला लावा. मी त्यावेळी तुम्हाला जागरुक केले होते. आता कोणी अधिकारी उत्तर देईल. मी ऐकून घेणार नाही. जे आम्हांला माहिती नव्हते. कारण विशेषतः तक्रारीची तुमची ॲक्नॉलेजमेंन्टची कॉपी आहे की, दहा लाखाचे मातीच्या भरावाचे काम आपण एक्स, वाय, झेड व्यक्तीला दिले होते. त्याचे ट्रक नंबर सो ॲन्ड सो ते तिकडे माती टाकत होते. ही माती बरोबर पडली नाही. क्वान्टीटीनुसार ही माती पडलेली नाही हे त्यावेळी मी तुम्हांला दाखविले होते. परंतु त्याची कारवाई केली गेली नाही. यामध्ये जर क्वान्टीटी कमी आली असेल तर मग हा आपण फुकटचा खर्च कशाला करावा? दोन नुकसान झाले. एक म्हणजे तुम्हांला जे डंम्पिंग ग्राऊंडचे नियम आहेत त्याचे उल्लंघनसुद्धा ठेकेदाराकडून किंवा प्रशासनाकडून झाले आहे. कारण सदरचा पडलेला कचरा हा माती खाली जावा म्हणून आपण तो भराव केलेला आहे. आज आहे तसेच त्या ठिकाणी आहे. आपण आता जरी तीन फुट बाय तीन फुटचा खड्डा मारला कुठेही. मी जिथे सांगेन त्या ठिकाणी आता वाटल्यास सभा संपल्यानंतर जाऊ या. त्याचा किती फुटाचा लेअर काय इंचाचा लेअर आहे तुम्हांला आता कळेल. खाली प्लॅस्टीक वगैरे सर्व तुम्हांला मिळेल. वरती अवघे नऊ इंच आहे. म्हणजे आता आपण तिकडे एक स्क्वेअर मारला तर दुधाचे दुध आणि पाण्याचे पाणी होईल. म्हणजे त्या ठेकेदाराने सांगावे मी या एरियामध्ये माती टाकून लॅन्ड फिलिंग केले आहे. तिकडे आयात एक खड्डा मारायला लावू या. म्हणजे आपल्याला काही पुरावा देण्याची गरज नाही. ही जी माझी सुचना आहे यामध्ये एकतर पाण्याची पाईपलाईन यामधून डिलीट करावी. जो आपल्याकडे माल आहे तो आपण परत आणतो असे दाखवितो आणि जी माती टाकली आहे त्याची क्वालिटी काय आहे? तो मुरुम आहे का? की लाल माती आहे? कारण आता वन विभागामध्ये जी माती येते ती अक्षरशः मुरुम आहे. ज्याच्याने तुमची झाडाची रोपे मरतात. मुरुम ही गरम माती असते आणि लाल माती ही थंड माती असते. तुम्ही जी भविष्यामध्ये गवताची लागवड करणार आहात त्याच्यामध्ये गवत जगणार नाही. ही लाल माती नाही. काल परवा माझ्याकडे वन विभागाची माती आणली ती मातीचे सॅम्पल मी तुम्हांला आणून देतो. अक्षरशः मुरुम बारीक बारीक सगळे खडे आहेत. माती नाहीच. त्याची क्वालिटी मेन्टेन करण्याकरिता आपण चेकींग करतो की, हा ठेकेदार कुठची माती आणून टाकतो. तुमच्याकडून पंधराशे रुपये प्रति गाडी घेणार आणि चारशे रुपयांचा मुरुम आणून टाकणार. एका

फेरीमध्ये अकराशे रुपये बेनिफिट होणार आणि त्याने टाकलेली माती तुम्ही खपवून घेणार. आता वन विभाग खपवून घेतो याचे जरा डिटेल काय असेल ते डिपार्टमेन्टतर्फे कळावे. म्हणजे सांगावे की, ती लाल माती कसली पाहिजे. मुरुमाचा रेट निराळा तर मुरुमाची नाकारली जाईल हे याच्यामध्ये बंधन पाहिजे ते नाही आहे. हा जरा यामध्ये सुधार करुन घ्यावा.

**हेरल बोर्जीस :-**

सन्मा. सभापती साहेब सन्मा. मिलन म्हात्रे यांनी मातीच्या संदर्भात जो विषय येथे उपस्थित केला. दररोज सकाळी अगदी नित्य नियमाने आम्ही येताना त्या मैदानावर थांबून आम्ही स्वतः दररोज सकाळी सात वाजता माझ्यासोबत अजित पाटील साहेब असायचे. आपले सन्मा. सदस्य मिलन पाटील असायचे. ज्या ठेकेदाराला काम दिलेले होते अगदी त्या ठेकेदाराला आपल्याच महानगरपालिकेच्या खात्याचे जे पाण्याचे टँकर आहेत आम्ही स्वतः पाण्याचे टँकर फोन करुन पाण्याच्या टाकीवरुन बोलावून त्या मातीवर पाणी मारुन नंतर रोलिंग केलेले आहे तर मागे जो काही लाल मातीचा भराव नव्हता. तो मुरुम भराव होता आणि त्या मुरुम झालेल्या भरावावर आपण सत्संगच्या मार्गाकडे जातो. त्या बाजूला भराव झालेला त्या ठिकाणी हा लाल मातीचा भराव सध्या आवश्यक आहे. कारण तिथे गवत नाही. मागचा जो भराव झाला तो त्या बाजूला केला होता आणि राहिला संबंध पाण्याच्या संदर्भात वृक्ष जगविण्यासाठी आणि टिकविण्यासाठी आणि वाढविण्यासाठी आपण किती प्रयत्न करतो आणि लाखो रुपयाचे टेन्डर आपण दिलेले आहे ते आपणा सर्वांना माहिती आहे. मैदानावर जी काही झाडे लावली ती झाडे जगविण्यासाठी पाण्याची अत्यावश्यकता आहे. आजही आपले कर्मचारी जवळ जवळ अडीचशे तीनशे फुट पाण्याचा पाईप संपूर्ण मैदानाला पाणी मारत असतात. आता झाडे फार चांगली झालेली आहे. वर्ष दोन वर्ष त्या झांडांना सांभाळले. अगदी मैदान सुंदर दिसेल. जरी पाण्याची पाईपलाईन यामधेन वगळली तरी इतर सुविधा तिथे करणे अत्यावश्यक आहे. पाण्याची पाईपलाईन आपल्याकडे उपलब्ध आहे. त्यामधून तुम्ही करुन घ्या. आजही त्या मैदानाला कुठेही बसण्याची शेड नाही. हाच खर्च त्या शेडसाठी तुम्ही युज करा आणि सिन्टेक्सची टाकी अजूनही तिथे उपलब्ध नाही. फक्त पाण्याची पाईपलाईन जसे सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी सुचना केल्याप्रमाणे पाणी खात्याकडून करुन घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती महोदय, यामध्ये आपले उद्यान विकासाकरिता जी दहा लाखाची तरतुद आहे ती करते वेळी आम्ही होतो. आम्ही जी तरतुद स्थायी समितीचे सदस्य या नात्याने करायला लावली आहे. आता हे जे त्यांनी सन्मा. सदस्य मिलन पाटील यांचे नांव घेतले ते अगदी बरोबर आहे. कारण हा ठेकेदार आपलाच माणूस असल्याकारणाने ही चोरी होते. हे सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे हे तू लिहून पाठव हे बोलणारा.

**हेरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे आम्ही ती करुन दिली नाही. आम्ही स्वतः तिथे उभे राहिलो.

**मिलन म्हात्रे**:-

तुम्हाला त्याची कळ कशाला लागते

**हेरल बोर्जीस :-**

आमचा प्रश्न आहे . आम्ही जे केले ते सभागृहासमोर बोलतो आहे.

**मिलन म्हात्रे** :-

हा आमचा माणूस आहे. याच्या विरोधात जर मी ओरडलो तर मला घातक ठरेल. की तु तक्रार सांगितली म्हणून मी केली हे ही त्याच्या पुढे जाउन सांगतो आणि तुम्ही म्हणता ज्याप्रमाणे ११० टक्के तुमचे बरोबर आहे. मी सांगतो तेथे खड्डा मारा तिकडे चोरा निघाली नाही तर मी माझं नाव बदलून टाकेन. तुम्ही कशाला कोणाची बाजू घेता चौकशी होउन जाउ दे. मी म्हणतो आपण या वादाच्या विषयात जाउच नये. तूमचे जसे लक्ष असते तिकडे बेंचेस ची सोय नव्हती. पन्नास बेंच उभे राहून करून घेतले. प्रत्येकाचे गार्डर्न आहे. प्रत्येकाने लक्ष घातले पाहिजे. पण जिकडे चोरी होत असेल तिकडे तुम्ही निक्षून सांगा , माझा माणूस आहे त्याने चोरी केली त्याला मी अडवणार ती हिम्मत सन्मा. सदस्य मिलन पाटील यांच्यामध्ये नाही. एका मिलनने केले नाही दुस-या मिलनने करून दाखविले.तक्रार केली चौकशी काहीच केली नाही. कारण तो आपला माणूस आहे हे लक्षात ठेवा. आणि हे जरा अवघड बोलतो ती तक्रार खोटी असेल तर लिहून दया खोटी तक्रार तुम्ही करू नका. आणि जरा चेकिंग करून घ्या.त्यांनी मुरूम टाकले माती टाकली तो प्रश्न नाही गोष्ट आहे आणि मी जे लाल मातीचे बोललो ते वन विभागाच्या मातीचे बोललो. आता इकडे वर आपण लाल मातीचा उल्लेख केलेला आहे.

म्हणून मी बोललो.

**मा. उपआयुक्त (केळकर सो)** :-

पाण्याच्या पाईप लाईनचा खर्च वगळून टाकू.

**मिलन म्हात्रे** :-

तुम्ही डिलीट करताना त्याच्यामध्ये तुमच्या गोडावूनमध्ये किती पीस आहेत. त्याला किती लेंथचा पाईप लागेल त्याचे मोजमाप घ्या. हे खरे म्हणजे या ठिकाणी आले पाहिजे होते म्हणजे तुमच्याकडे जर शंभर दोनशे फुट पाईप आहे आणि तुम्हाला लागणारा पाचशे फुट याच्यामध्ये तीनशेचा तुटवडा असताना इथे सेट बॅक बसेल तसे नको. नुसता ठराव आणायचा म्हणून आणला असे नको

**धनराज अग्रवाल** :-

कमी किती होईल?

**मिलन म्हात्रे** :-

सभापती महोदय, माझे स्वतःचे असे मत आहे की त्या नउ लाखाच्या मैदानाकरिता ठराविक विषय ठेवा.

**दिपक खांबित** :-

मग त्यांनी सुचना मांडली की त्या खर्चामध्ये आणखी काम करून घ्या.

**हेरल बोर्जीस :-**

सभापती साहेब, मैदानावर आजही शेड नाही

**मिलन म्हात्रे** :-

शेड झाले का? इलेक्ट्रीसीटी हायपॉवर टेन्शनचे तूम्ही आणले का ? तिकडे सबस्टेशन एक बारके पिलर नाहीच आहेत. जेव्हा जेव्हा कायर्क्रम होतात आता जेंव्हा संत निरंकारीचा कार्यक्रम झाला तेंव्हा दिड लाख माणसे आली होती. दिड लाख माणसे त्यामध्ये बसली आणि त्या मैदानाचा सगळा सत्यानाश करून गेली. गवत लावलेले चार महिने गवत वाढविले सर्व खणून, खड्डे वगैरे मारून त्याची वाट लावली. १८-१८ टनांचे ट्रक आतमध्ये गेले आणि सगळे खेळपटटया, आपण लावलेले गवत सगळयाचे नुकसान म्हणजे त्यामागे आपण त्या निरंकारीवाल्यांकडून किती भाडे घेतले आणि कार्यक्रम झाल्यानंतर आपले किती नुकसान झाले? हे कोण मोजणार.

**दिपक खांबित** :-

तेव्हा तुम्ही रोज जायचे. आम्ही पण यायचो आपण सर्व काम तुमच्या म्हणण्याप्रमाणे करून घेतले.

**मिलन म्हात्रे** :-

पण मेहनत फुकट गेली. ट्रक आतमध्ये घुसले. चार महिने आपण पावसाळयात गवत लावले, आणि वाढविले आणि त्यांचे ट्रक त्यांच्यावर फिरले. एका ट्रकचा किती लोड होतो? अठरा - अठरा टनाचे फुल माल भरलेले ट्रक त्यामध्ये फिरले. माझा सांगायचा दूष्टीकोन की कायर्क्रम पुढचा होतो. काय आहे आपले ते क्रिडांगण आहे. मोठया व्हेईकलला अलाउड करायचे की नाही करायचे हे कोणी ठरवायचे.

**अनंत पाटील** :-

गोडावून मध्ये जे पाईप आहेत ते हयाच कामासाठी आणले. की इतर कामासाठी आणले आहेत.

**मा. सभापती** :-

आपल्याकडे ते राखीव ठेवायला लागतात. त्यांना किती लागतो ते त्यांना माहित असेल की किती पाईप लागणार ते . एक इंचाचा वगैरे जास्त लागत नाही. मोठे पाईप नाही. पाण्याचे पाईप एक इंची लाइन

**अनंत पाटील** :-

सरकारी सर्व्हे झाल्याशिवाय लाल मातीचा भराव करु नका. सरकारी सर्व्हे होउ दे. सॉल्ट डिपार्टमेंटची जागा आणि कलेक्टरची जागा किती त्याचा सर्व्हे झाल्यानंतर तुम्ही लाल मुरूमाचा भराव टाका.

**मा. सभापती :-**

सर्वेचा प्रश्न येत नाही.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब हे काम किती दिवसात पूर्ण होईल ?

**दिपक खांबीत :-**

चार महिन्यात.

**मिलन म्हात्रे :-**

चार महिने नाही आता कार्यक्रम चालु होईल.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो) :-**

सन्मा. सदस्य आपण येत्या काही दिवसातच या जागेची मोजणी झाल्यानंतर एवढी शासनाची जागा आहे. परवाच्या सभेत जिल्हाधिकारी साहेबांशी देखील चर्चा झाली आणि ही जागा आपल्याला लवकरात लवकर अलॉट होईल ही मोजणी झाल्यानंतर आणि या ठिकाणी आपण जो खर्च प्रस्तावित केला माझी खांबित यांच्याशी चर्चा झाली. तिथे आपण चेन्जींग रूम वगैरे बांधायचा. तर आता जागा ताब्यात घेतल्याशिवाय आपण जर त्याच्यावर मोठा खर्च केला तर ते बरोबर होणार नाही. म्हणून जागा अगोदर ताब्यात घेण्यासाठी कारवाई तात्काळ पध्दतीने करा आणि ती जेवढी जिल्हाधिका-यांच्या अखत्यारितील जागा आहे. तेवढी जागा अगोदर संपादन करण्याचा प्रयत्न करा. बाकी ती जागा आहे संपादन करण्यासाठी सॉल्ट डिपार्टमेंटला अगोदरच पत्र दिले होते. त्याच्यापुढे काय कार्यवाही झाली माहिती नाही त्याची मी आज माहिती घेतो. आणि ही सर्व माहिती घेउन आपण लवकरात लवकर चेंजिंग रूम जे आहे तिथे जर आपण जास्त खर्च वाढवत गेलो अननेसेसरी उदया कोणी खर्च नाकारला प्रॉब्लेम झाले तर आपण जागा ताब्यात घेण्याची प्रोसेस अति तात्काळ पध्दतीने घेउ काल की परवाच कमिशनर साहेबांनी या खर्चाला मान्यता दिली आहे की अति तात्काळ पध्दतीने मोजणी करून घ्यावी.

**हेरल बोर्जीस :-**

तात्काळ करून घेण्याचे एकच कारण आहे डिसेंबर जानेवारीमध्ये तिथे विविध स्पर्धा होतात. ब-याचशा शाळेला आपण ते ग्राउंड देतो आणि तिथे त्यांचे वार्षिक कार्यक्रम पार पडतात. पण हे काम तात्काळ याच्यासाठीच आणि सभापती साहेब मी आपणास एक विनंती करीन हे काम पूर्ण करण्यासाठी एक स्वतंत्र अभियंता आपण नेमावा आणि त्याअभियंत्याला त्या फक्त कामासाठी जबाबदार धरावे.

**अशोक पाटील :-**

केळकर साहेब, आपण तात्काळ कामाला सुरूवात केले. धन्यवाद. आपल्या कारकिर्दीत दहा-पंधरा वर्षापुर्वी माझ्या मते हे काम आपण मुख्याधिकारी असताना सुरू झालेले आहे. आणि आता आपण तात्काळ सर्वे करून त्या कामाला गती देता त्याबद्दल धन्यवाद. परंतु आपल्या डिर्पाटमेंटकडे माहिती असेलच की, या मैदानासाठी टोटल किती जागा रिझरव्हेशनखाली ॲक्वायर केलेली आहे. आणि त्याच्यामध्ये कलेक्टरची जागा किती आहे? आणि सॉल्ट डिपार्टमेंटची जागा किती आहे? याची माहिती आम्हाला मिळेल का?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

त्याची मोजणी करण्याकरिता आपण जे शासनाकडे पैसे टी.एल आर कडे भरायचे आहेत.

**अशोक पाटील :-**

निदान सात-बारा उता-याच्या रेकॉर्डवर असेल की, कलेक्टरची लॅन्ड एवढी आहे आणि सॉल्ट डिपार्टमेंटची एवढी आहे. असा काही उल्लेख असेल का नाही? टाउन प्लॉनिंगकडे काही थोडीफार माहिती घेतली असेल की नाही. ढोबळ माहिती तर आहे की नाही.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

ती माहिती आहे.

**अशोक पाटील :-**

टाउन प्लानिंगकडे माहिती असेल तर विचारा.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, आपण मैदान ठराविक एका संस्थेला किंवा शाळेला किंवा अन्य कुठल्या व्यक्तिला तीन महिने चार महिन्याकरिता देतो. हे मैदान फार मोठे आहे. परंतु काही छोटे सामने भरवायचे असतील. नंतर आलेल्या व्यक्तींना सांगितले जाते की हे मैदान आम्ही या संस्थेला इतके रुपये भाड्याने इतक्या महिन्यांकरिता दिलेले आहे. मैदान पाच-दहा एकर आहे. तुम्ही एकदा पावती फाडली की दहा एकरला त्याचा क्लेम लागला तसे झाले नाही पाहिजे. क्रिकेटसाठी त्यांना ठराविक एरियाचे मैदान द्या, आता एखाद्याला कोणालातरी क्रिकेट खेळायचे आहे, परंतु कबड्डीचा संघ आला आणि आम्हाला थोडी या सभागृहापुरतीच जागा पाहिजे. तर त्याला नाकारले जाते ही पद्धती गेल्या अनेक वर्षापासून चालू आहे. तर ते तसे न करता एका ऐवजी तुम्ही चार पावत्या फाडल्या तरी काही हरकत नाही.

**दिपक खांबित :-**

शासन निर्णयाप्रमाणे पुढे आपल्याला देत जायचे. फक्त खेळाकरिता द्यायचे आहे.

**मिलन म्हात्रे :-**

तो शासन निर्णय आम्हाला द्या. याच्या बरोबर विषय आणला तर शासन निर्णय द्यायला पाहिजे होता. सरळ सांगून टाकतात या व्यक्तिला आम्ही दिलेले आहे आणि पुढे देता येणार नाही, आणि नाही म्हणून सरळ उत्तर येते. आम्हाला दिलेले आहे. ही पद्धत चुकली आहे आणि आपण त्याचा सुधार करा आणि त्याची देण्याची पद्धतीपण ठरवा कारण एकाला चार महिन्याचे दिले की, बाकीचे कोणही त्यामध्यसे फिरायचे नाही.

**मा. सभापती :-**

क्रिकेटवाल्यांसाठी दोन किंवा तीन खेळपट्टया द्यायचे. बाकी गरिब देखील तिथे खेळायला येतात त्यांना देखील ग्राउंड उपलब्ध पाहिजे. म्हणून त्यांना किती द्‌यायचे ते आपल्या ॲग्रीमेंटमध्ये ठरवा.

**याकुब कुरेशी :-**

अध्यक्ष महोदय, त्याचप्रमाणे वर्षात दोन वेळा मुसलमान बांधवाचे दरवर्षी सालाबादप्रमाणे तिथे ईदची नमाज होते. त्यांना सुद्धा त्या नमाजाकरिता जो पर्यंत दुसरी जागा उपलब्ध होत नाही तोपर्यंत त्यांना ती जागा देण्यात यावी. जसे मागे देत आलो त्याचप्रमाणे याच्यापुढेही देत राहावे. अशी मी एक विंनती करतो. पण समजा आज मी मुद्दा मांडला नाही तर मला ते मुसलमान लोक विचारतील तुम्ही असताना हा ठराव झाला.

**नितीन ठाकूर :-**

सभापती साहेब, आता सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे बोलले की, एकालाच मैदान देउ नका. दोघातिघांना खेळायला द्या. तर माझी अशी सुचना आहे आम्ही गेल्या पाच वर्षापासून मिरा भाईंदरमध्ये मिरा भाईंदर कला क्रिडाचे आयोजन त्या नेताजी सुभाषचंद्र मैदानावर करतो. आता ठिक आहे. गेल्या वर्षापासून आम्हाला चांगली सुविधा मिळते. मातीचा भराव होतो. व्यवस्थित साफसफाई होते. पण त्याच्या अगोदर आम्ही स्वतः उभे राहून साफसफाई करायचो. दगड, कचरा काढायचो तेव्हा अशी स्थिती नव्हती. आता ग्राउंडची व्यवस्था चांगली आहे. यावर्षी सुद्धा कला क्रिडा महोत्सव आहे. त्याकरिता आम्ही ग्राउंडची परवानगी घेतलेली आहे. त्या काळात आम्ही दुस-या कोणाला देउ शकत नाही. आमच्याकडे सर्व गेम असतात. तसेच आम्हाला ग्राउंड आखायचे असते. ह्यामधून थोडे ॲडजेस्ट करावे हीच विनंती करतो.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त साो.) :-**

कला क्रिडासाठी तर आपले ग्राउंड आहे.

**मिलन म्हात्रे :-**

माझा सांगण्याचा असा दृष्टिकोन होता की, एखाद्या क्रिकेटच्या क्लबला तुम्ही दिले तर तो काय बोलतो संपूर्ण ग्राउंड आम्ही घेतले. कला क्रिडामध्ये सगळे असते. तुमचे सर्व प्रकारचे खेळ आहेत. मी त्या कला क्रिडाला येतो. त्याचा आम्हाला विरोध नाही. पण यापुढे जे तुम्ही एका माणसाला मोनोपॉली म्हणून देउन टाकता आणि मग ते ग्राउंड सगळयांना नाकारायचे हे चुकीचे आहे. ते चार-चार महिन्याकरिता घेतात. वर्ष, सहा महिने, चार महिने चालू असते.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.) :-**

यामध्ये ग्राउंडमध्ये फक्त माती भराव आणि याचाच सध्या विचार करा कारण त्या ग्राउंडचे लेआउट करावे लागेल.

**अशोक पाटील :-**

आता सर्वे करा नंतर ले आउट करा. नंतर खर्च करा.

**शिवमुर्ती नाईक (मा. उपआयुक्त साो.) :-**

ले आउट कशासाठी ते तुम्हाला सांगतो जर इमारतीचे शेड कपडे बदलायला तयार केले नंतर ते तोडावे लागू नये, कारण जे दोन रस्ते आहेत त्या बाजूला शॉपिंग करायचे कंपाउन्ड वॉल काढायचा आहे आणि आतल्या बाजुला त्याचे प्लॅनिंग करावे लागणार आहे. शेड बांधायचे आणि परत तोडायचे हे नको आहे. फक्त भराव आणि गवताचा विचार करावा.

**अशोक पाटील :-**

आमचा मुद्दा तो नाही. हे सर्व विकसित करत असताना मुळ जागा हा सभापती साहेब थोडा सिरियसली मुद्‌दा घ्या. आपण लाखो रूपये खर्च करित आलो आहोत अजून करतोय. अशीच

परिस्थिती पूर्वेला नवघर पोलिस स्टेशनची झाली. जी जागा कलेक्टरची होती तिकडे नगरपालिकेची व्यायामशाळा, तलाठी कार्यालय होते. त्या पोलीस स्टेशनची जागा बांधण्यासाठी पोलिस स्टेशनने जबरदस्ती अद्यावत इमारत बांधली. त्यानंतर रिव्हेन्यु खात्याकडून ऑब्जेक्शन आले. तो विषय पेपरामध्ये गाजला आणि वाद झाला. आणि ते खर्च करून बसले. इमारत बांधली तसे आपल्या मैदानाचे होउ नये. त्यासाठी सभापती साहेब हा स्पेशल विषय घेउन तुम्ही प्रशासनावर वारंवार याचा पाठपुरावा करा. या जमिनीच्या मालकी संदर्भात तुम्ही काय प्रक्रिया केली? कारण बरेच वर्ष हा विषय या सभागृहात येतो आणि आम्हाला फक्त आश्वासने मिळतात की, ती जागा लवकर ताब्यात घेईल. आता सुरूवात मोजणीपासून सुरू होत आहे. आता तिची मोजणी होणार नक्की त्यासाठी किती एकर जागा ॲक्वायर केली त्याचेसुद्धा आपल्याकडे माहिती नाही.त्याच्यात सॉल्ट खालची किती ? त्याच्यात कलेक्टरची जागा किती? याची देखील आपल्याला पूर्ण माहिती नाही आणि त्याच जमिनीवर आमच्या बांधवाचा मालकी हक्क आहे. ते कायदेशीर कब्जेदार आहेत . त्यांना देखील अजून पर्यंत न्याय मिळाला नाही. या मालकी हक्कासंदर्भात हा विषय पुन्हा नव्याने घ्या. आणि त्याचा योग्य तो निर्णय या सभागृहात झाला पाहिजे.

**मिलन म्हात्रे** :-

आता जे मालकी हक्काचे सांगितले त्यावर रितसर हिअरिंग लावा. त्याना सर्व सादर करायला लावा म्हणजे वाद हळूहळू कमी होईल. रुलिंग झाले का? ते अगोदर घ्या. म्हणजे पुढच्या कार्यक्रमाला मोकळे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त साो) :-**

सन्माननीय सदस्य अशोक पाटील यानी जे आता सांगितले की आपले जे नेताजी सुभाषचंद्र बोस क्रिडांगण आहे. या क्रिडांगणाच्या मालकी हक्काचा जो प्रश्न आहे. तो लवकरात लवकर सोडवण्याच्या प्रयत्नात आहोत.

**मिलन म्हात्रे** :-

क्रिडागणाच्या मालकी हक्काचा प्रश्न नाही. क्रिडांगणामधील काही ठराविक जागेच्या मालकी हक्काचा प्रश्न कारण जिल्हाधिका-यांच्या मालकीचा आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

जिल्हाधिका-यांच्या मालकांचा जागा आपल्याला लवकरात लवकर प्राप्त होईल. त्याच्यामध्ये सॉल्ट डिपार्टमेंटची जी जागा आहे. त्यासाठी आपण अगोदरच शासनाकडे एन.ओ.सी. मागितलेली आहे आणि त्यांची एन.ओ.सी. अदयापपर्यत आपल्याला प्राप्त झालेली नाही. परवा जे त्यांचे डेप्युटी कंन्ट्रोलर आहेत. त्यांच्याशी माझी फोनवर चर्चा झाली आणि त्यानंतर त्यांच्याशी चर्चा होउन त्यांनी पण सांगितले की जर विकास आराखडयामध्ये ही जागा जर असेल तर विकास आराखडयाचा तुमचा जो प्लॅन आहे तो आमच्याकडे पाठवा आणि त्याची जी किंमत आहे ती किंमत व्हॅल्युएशन आपल्याला काढावी लागेल आणि त्यानंतर आम्ही तुम्हाला कळवितो आणि त्याप्रमाणे आता मी त्यांच्याशी चर्चा केली की या जिल्हाधिका-याच्या पूर्ण हयाचे सर्वेक्षण झाल्याशिवाय आपल्याला पुढील कार्यवाही करता येणार नाही . कारण पहिल्या स्टेपला जिल्हाधिका-यांची जी जागा आहे ती जवळजवळ माझ्या माहितीप्रमाणे बारा एकरच्या जवळपास जागा आहे. ती अगोदर ताब्यात घेउ. नंतर शिलोत्री आणि सॉल्ट डिपार्टमेंटची जागा आहे. अशा स्टेप बाय स्टेप तिन्ही जागा ताब्यात घेण्याचा प्रयत्न आपण लवकरात लवकर करु.

**मिलन म्हात्रे** :-

प्रशासनाकडून आपण उत्तर दिले. शिलोत्र्यांनी तुमच्याकडे पत्रव्यवहार केला त्याला वर्ष झाली. त्यांना तुम्ही रितसर बोलावून हे उत्तर तुम्ही त्यांना लेखी पाठवून द्या. त्यांच्याच केलेल्या अर्जावर जे एक वर्षापासून किंवा दहा वर्षापासून पेंडिंग आहेत. म्हणजे हे जे सातत्याने आपण पत्रव्यवहार करतो पण आपल्याकडून काही रिस्पॉन्सच नाही.

**अशोक पाटील :-**

तुम्ही जी कलेक्टर लॅन्ड सांगता तिथे पुर्णपणे झोपडपट्टी वसलेली आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

शिलोत्र्यांसोबत मी इथे मुख्याधिकारी असताना जवळ जवळ आठ ते दहा सभा घेतलेल्या आहेत. सर्वांचे सहकार्य मला लाभलेले आहे. आणि त्यांच्याशी चर्चा करूनच आपण तेथे ग्राउंड काढले कारण मी त्यांना सांगितले की आपलीच मुले येथें खेळणार आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांचे सहकार्य आपल्याला आहे, आपले सहकार्य कुठे आहे ?

**धनराज अग्रवाल :-**

शिलोत्री ते तुम्हाला देणार का ?

**अशोक पाटील :-**

शिलोत्री संघाचा मी उपाध्यक्ष आहे मला माहिती आहे नक्की काय प्रासिजर झालेली आहे. जाऊ द्या परत काढू नका परंतू निदान याच्यापुढे त्यांना न्याय मिळावा हा आपला प्रयत्न राहिल आणि तुम्ही जी कलेक्टर लॅन्डवर टोटली झोपडपटटी वसलेली आहे. आता मैदान नाही. मैदान टोटली सॉल्ट डिपार्टमेंटच्या जागेवर आहे.

**प्रकरण क्र. १७० :-**

सुभाषचंद्र बोस मैदान सुस्थितीत ठेवणेकामी विविध व्यवस्था करणेबाबत विचार विनिमय करणे.

**ठराव क्र.**

imara¹Baa[-Mdr mahanagarpailaka h_It Baa[-Mdr³p´ yaoqao sauBaaYacaMd` baaosa ho ekmaova KoLacao maOdana AsaUna sadr maOdanaacaa vaapr ivaivaQa iËDa spQaa-¸ maa.mahapaOr caYak spQaa-¸ ivaivaQa Saalaoya saaMskRtIk kaya-Ëma par paDNao va sqaainak maulao va naagarIk maaozyaa p`maaMNaat vaapr krIt Asatat.

sadrcao maOdana sauisqatIt zovaNaosaazI maOdanaamaQyao laala maatI TakUna maOdana samataola krNao KoLp+yaa tyaar krNao¸ raolaIMga krNao [. kamao kravayaacaI Aahot.

varIla sava- kamao krNaosaazI $.9.00 laxa evaZa Kca- Apoixat Aaho. sadrcaa Kca- krNaosaazI maOdana va iËDa saMkUla yaa laoKa iSaYaa-KalaI pUroSaI trtUd ]plaQba Aaho. trI sadrcyaa Kcaa-sa ih saBaa maMjaurI dot Aaho.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. मिलन म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**मा. सभापती,**

**स्थायी समिती सभा**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १७१ चे वाचन केले.)

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय, आपल्याकडे शहर अभियंता आणि कार्यकारी अभियंता आहे. पण त्याचे सर्टिफिकेट धोकादायक इमारतीला चालत नाही का ?

**अशोक पाटील :-**

कोर्ट मानत नाही.

**शरदचंद्र वैरागडे :-**

याच्यामध्ये बरेचदा हा जो आपण रिपोर्ट देतो त्यामध्ये हा रिपोर्ट आपल्या महानगरपालिकेच्या अधिका-यांनी दिल्यानंतर बराचसा तो चॅलेन्ज होतो. तुम्ही महानगरपालिकेकडून बोलता किंवा त्यांच्याकडून तो रिपोर्ट दिला कधी कधी ते शक्यपण असते. काहीतरी ऑफिसरने कुणाच्या तरी प्रेशर खाली देता येते आणि जेव्हा फेरतपासणी केली जाते. तेंव्हा आपण इंजिनिअरिंग कॉलेजलाच रिफर करतो. त्यादृष्टीने असे आहे की खरोखर जी बिल्डींग आहे ती धोकादायक आहे की नाही हे ठरवायचे नवी मुंबई आणि उल्हासनगरमध्ये इंजिनिअरिंग कॉलेजतर्फे करण्यात येते. त्याचे जे रिपोर्ट असतात. त्यामध्ये बरेचसे टेस्ट घ्याव्या लागतात नॉन डिस्कटेटिव्ह टेस्ट त्याला म्हणतात. आणि काही रिस्कटेटीव्ह टेस्ट पण घ्याव्या लागतात. टेस्ट घेतल्यानंतर लॅबॉरेटरीमध्ये टेस्ट करतात नंतर ती

बिल्डींग उभी राहण्यास सक्षम आहे किंवा पाडावी हे ठरविले जाते. त्यासाठी इंजिनिअर कॉलेज लागतात.

**धनराज अग्रवाल** :-

तुम्ही इकडे तळमजला प्लस दोन मजले एकवीस हजार ,चार मजले तेहतीस हजार, सात मजले पन्नास हजार, आणि प्रवास भत्ता पंधराशे ते कोण देणार ?

**दिपक खांबित** :-

मा. आयुक्त यांनी सरदार वल्लभभाई इंजिनिअरिंग कॉलेज हयांचाशी पण पत्रव्यवहार करून त्या कॉलेजने हे ठरविले हे दर आपण त्यांना भरायचे आणि त्यानंतर जी धोकादायक बिल्डींग आहे. त्या बिल्डींगच्या मालकाकडून आपल्याला वसुल करायचे आहेत.

**धनराज अग्रवाल** :-

एक तर त्यांची बिल्डींग पडतेच आहे तर ते तुम्हाला परत पैसे देणार का ?

**दिपक खांबित** :-

धोकादायक इमारत पाडतो त्याचा खर्च वसूल करायचे असते.

**धनराज अग्रवाल** :-

बिल्डींग नसणार ते लोक बेघर होणार ते तुम्हाला पैसे देणार का ?

**रिटा शाह** :-

आपल्याकडे इंजिनिअरने दिले की, सदर बिल्डिंग धोकेदायक आहे. पण महानगरपालिकेकडे ट्रांझिस्ट कॅम्प आहे का? तुम्ही सदर बिल्डिंग खाली करून घेणार तर कुठल्याबेसवर तुम्ही खाली करून घेणार.

**धनराज अग्रवाल :-**

साहेब, बिल्डिंग बिल्डरच्या हिताप्रमाणे पाडण्यात येते असे येथे चालले आहे. पंधरा वर्षापुर्वी किर्ती इस्टेटमध्ये तुम्ही स्टे आणला होता. पण आजपण तो किर्ती इस्टेट तसाच आहे. तो अजून पडलेला नाही आहे. कोणीतरी बिल्डर आला आणि सांगितले ही बिल्डिंग पडणार आहे आणि तुम्ही ती पाडून टाका. त्यावेळी ग्रामपंचायत असेल किंवा नगरपालिका असेल तर ॲक्शन घेउन ती बिल्डिंग पाडायला गेले होते. पण स्थानिक नेते तिथे उभे राहून त्या बिल्डिंगला पाडायला दिले नाही. येथे रस्त्यावर एक माळयाची बिल्डिंग नगरपालिकेच्या बाजूला आहे. ती पडणार होती का? तरी तुम्ही पाडून घेतली आणि त्या दुकानदारांना आजपर्यंत काही मिळालेले नाही.

**रिटा शाह :-**

साहेब, हा जो विषय आपल्याकडे आणलेला आहे. धनराज अग्रवाल साहेबांनी सांगितले की कुणाचे प्रेशर असेल आणि असे काहीतरी घडते. सिटी इंजिनिअरने देखील सांगितले असे प्रेशरखाली काही घडते. म्हणून हा रिपोर्ट कोर्टात चॅलेंज झाला तेव्हा ही जी संस्था आहे त्याचे कोर्ट मान्य करते ते मी ही मान्य करते. आणि जो विषय आणलेला आहे तो चांगला विषय आहे. ही बिल्डिंग खरोखर धोकेदायक आहे. ते इंजिनिअर आपल्याला सर्टीफिकेट देणार आहेत. त्याच्याकरता आम्ही हा ठराव मांडून देतो. पण आपल्याकडे मुख्य विषय काय आहे. धोकेदायक बिल्डिंग कुठलीही असू दे. ३७ बिल्डिंग आहे त्याच्यामध्ये दोन-चार लोकांनी प्रेशर केले असेल तर तीस बिल्डिंग आपल्याकडे धोकेदायक आहेत. ती बिल्डिंग धोकेदायक आहे म्हणून त्या बिल्डिंगचे सर्टीफिकेट आले का नाही आहे. पण ती बिल्डिंग खाली करून आपल्याकडे ट्राझिस्ट कॅम्पची व्यवस्था आहे का?

**धनराज अग्रवाल :-**

आता आपण जी धोकादायक बिल्डिंग पाडणार ती कुणाच्या परवानगीने पाडणार, कोणी सांगितल्यावर पाडणार. आपल्याला रिपोर्ट कोण देणार?

**शरदचंद्र वैरागडे :-**

पी.डब्लू.डी. आपल्याला रिपोर्ट देतो.

**धनराज अग्रवाल :-**

पी.डब्लू.डी. डिपार्टमेंटचे आतापर्यंत चालत होते आणि आता आपली महानगरपालिका झाली आणि आपण शहर अभियंता येथे आणलेला आहे. त्याचे चालणार नाही असे आहे का?

**दिपक खांबीत :-**

साहेब, कोर्ट केस झाले आहेत.  कोर्टामध्ये सगळया केसेस गेल्या आहेत. आतापर्यंत सहा आणि दोन दिवसापूर्वी दोन म्हणजे आठ केस कोर्टामध्ये आहे. आणि ते कोर्टात गेल्यावर कोर्ट त्यांच्याकडून सर्टीफिकेट मांगते.

**धनराज अग्रवाल :-**

हे जे विषय आहेत त्यात पैसे कोण भरणार?  त्यांना तुम्ही जागा ॲग्जेस करून देणार काय?

**दिपक खांबीत :-**

साहेब, आपण त्यांना बिल पाठवणार आहोत.

**धनराज अग्रवाल :-**

बिल्डरने आणले हे तुम्ही तोडून टाका तर तो पैसे भरणार हे मला माहित आहे.  आणि तो जो भाडोत्री आहे तो कुठे जाणार.  पैसे त्यांच्याकडे नाही आहे.  आणि बिल्डर त्यांना जागा ही देत नाही आहे.  पहिले सांगतात, जागा देउ ॲग्रीमेंट देउ पण प्रत्यक्षात तसे दिले जात नाही.

**रिटा शाह :-**

साहेब, ह्याच्यामध्ये महत्त्वाची गोष्ट अशी आहे, धनराज अग्रवाल साहेब बोलतात ते खरे आहे. पण आता आपल्याकडे जो विषय आणलेला आहे ते ही मान्य करते की, त्याची गरज आहे.  कारण कोर्ट केस होतात चॅलेंज होतात, सर्व काय आहे. पण कुठलीही धोकादायक बिल्डिंग खाली करून घेण्याच्यापूर्वी तुम्ही ट्रांझिस्ट कॅम्पची व्यवस्था करा.  कारण मागच्यावेळेला चंद्रलोक आणि सुर्यलोकच्याबाबत जे घडले तेव्हा आपल्याला माहित आहे, लोकांचे सामान रस्त्यावर फेकले गेले होते. तसाप्रकार आपल्याकडे व्हायला नाही पाहिजे.  महानगरपालिकेचे कर्तव्य आहे.  जसे बी.एम.सी.मध्ये आहे तिथे ट्रांझिस्ट कॅम्पची व्यवस्था आहे.  आपल्याकडे पण त्यांना दुसऱ्या जागेवर राहण्याची व्यवस्था केली पाहिजे. व त्यानंतर तुम्ही ती बिल्डिंग खाली करून घ्या.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती महोदय, हा जो विषय आहे दूधारी शस्त्रासारखा आहे.  ह्या मॅडमनी जे सुर्यलोकचा उल्लेख केला.  तेव्हा मी स्वतः त्यावेळेला बघितले आहे.  नगरपालिका प्रशासनातर्फे फायरबिग्रडच्या कर्मचाऱ्यांच्या, बाहेरच्या गुडांचा वापर करून त्या लोकांना ओरबाडून बाहेर काढले आणि ती सुर्यलोक बिल्डिंग ह्या दोन तीन महिन्यापूर्वी तिचे आर.सी.सी. ठोकून ठोकून पाडली.  तुम्ही ती बिल्डिंग खाली करून दहा वर्ष गेली.  दहा वर्षामध्ये आपल्याला एफ.एस.आय. वाढवून मिळेल. चौदा माळयाचे टॉवर बनवायला मिळतील हे स्वप्न त्यावेळेचे राजकारणांनी बघितले आणि ती बिल्डिंग खाली केली गेली. ज्या बिल्डिंग खाली करण्यात आल्या होत्या, त्यांचे बारी-दरवाजे काढले होते व सांगाडा तसाच होता. ज्या सांगाडयाकरिता तुम्ही चॅलेंज केले की, ही धोकादायक आहे ही बिल्डिंग पडणार आहे.  पण तो सांगाडा व्यवस्थित आहे आणि ती माणसे पडली, दरवाजे-खिडक्या काढून घेतल्या गेल्या आणि फक्त सांगाडा तसाच राहिला.  हा जो विषय आला आहे तर अगोदरचे सन्मा. सदस्य पैशांच्या वसूलीच्याबाबत बोलले, माझी अशी या ठरावाबाबत सूचना आहे ह्या स्थायी समितीचा सदस्य ह्या नात्याने ही जी रक्कम आपण लावलेली आहे ती त्या सर्वे नंबरला स्टीकअप करा. त्या ठिकाणी जो विकासक आहे जो डेव्हलप करेल तसे आपण डेव्हलपमेंट चार्जेस घेऊन त्याला त्याच्या पावत्या देतो, तशा प्रकारे ही रक्कम पहिल्यांदा वसूल केल्याशिवाय तिकडचा प्लान पास करू नका.  मग ती वसूली तुमची बरोबर होणार.  वसूलीचा विषय संपेल.  ॲथोरीटी तुम्ही नेमा.  त्या ॲथोरीटीच्या ओपीनियनची फार गरज आहे.  कारण हायकोर्टामध्ये आमच्यासमोर अशा बहुतेक केसमध्ये आमच्यासमोर असे होते. मी तुम्हाला याबाबत एक उदाहरण देतो.  पाण्याची जी स्कीम होती त्याच्यामध्ये अनेक पाईप रिजेक्टेड निघाले. स्वतः मा. नामदार आर. आर. पाटील साहेबांनी पवई आयटीची कमिटी नेमली आणि त्यांनी अपले जवळ जवळ पाच पंचवीस पाईप रिजेक्ट केले आहे.  टेकनिकल कमिटी तुम्हाला नेमायला लागणार.  आणि राहिला तो त्यांच्या फीचा प्रश्न, ट्रव्हलिंगचा प्रश्न.  ही सगळी अमाऊंट तुम्ही एकत्रित करा.  म्हणजे तुम्ही जे दिले आहे ते नाही आहे.  ह्याच्यामध्ये टेस्टींग रिपोर्ट आहे का?  जे टेस्टींग रिपोर्ट फायनल बिल संस्था पाठवेल ते बिल कॉस्ट टू कॉस्ट त्याच्या व्यतिरिक्त जर काय लागत असेल तर ती अमाऊंट ॲड करून ती अमाऊंट वसुल केल्याशिवाय त्या सर्वे नंबरमध्ये रि-डेव्हलपमेंट करिता जो कोण विकासक आपल्याकडे प्रस्ताव सादर करील त्याला सगळयात पहिले त्याची वसुली करावी. त्या पावतीचा नंबर त्या प्लानवर टाकावा आणि मग प्लान मंजूर करावा.  अशी माझी या सभेला विनंती आहे.

**धनराज अग्रवाल :-**

हा खर्च दाखवला आहे. त्याच्यामध्ये नुसता माळा दाखवला आहे. माळावाईज आहे का. की, एरियावाईज आहे.

**दिपक खांबीत :-**

माळावाईज आहे.

**चंद्रकांत वैती :-**

मिलन म्हात्रे साहेबांनी ज्या सूचना केल्या आहेत ते खरोखर महत्त्वाचे आहेत. आपल्या उल्लेखामध्ये असे आले आहे की, काही इमारती धोकादायक आहेत ते डिक्लर केले गेले आहे. ते आजही पडलेल्या नाहीत. मग ह्याच्यामध्ये कोणीतरी व्यक्तीशहा काहीतरी हेतू ठेवून केले जाते. जर आपण शासकीय अभियांत्रिकी संस्थेची नेमणूक केल्यानंतर त्याच्यामध्ये जे निश्चित होईल की ती खरोखर धोकादायक आहे की नाही. त्याला चॅलेंज नसणार. म्हणून येथे ठराव देखील मांडला गेला आणि ह्या सूचनांसह या ठरावाला मी अनुमोदन देतोय.

**रिटा शाह :-**

साहेब, आपण अनुमोदन करा हा विषय अतिशय चांगला आहे. त्या ठरावात आपण माझी सूचना देखील घ्या. कुठलीही बिल्डिंग धोकेदायक आहे म्हणून आपल्या संस्थेने डिक्लर केली व डिक्लर केल्यानंतर आपल्याला ती बिल्डिंग पाडावी लागणार. ती बिल्डिंग पाडायच्या अगोदर जसे जिल्हाधिकारांनी केले कुठलाही सामान कुणाचे उचलून बाहेर टाकायचे अशी पद्धत करू नका. तुम्ही महानगरपालिकेच्या हिशोबाने तुम्ही कुठलीही धोकेदायक बिल्डिंग खाली करण्याच्या अगोदर त्या लोकांची दुसरीकडे व्यवस्था करा. ट्रांझिस्ट कॅम्पची व्यवस्था केल्याशिवाय तुम्ही कुठलीही बिल्डिंग खाली करू शकत नाही. अशी माझी सूचना आपण ह्याच्यामध्ये नमूद करा.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, रिटा मॅडमनी जी सूचना केली आहे. ती अगदी उत्तम आहे. पण त्याच्यापुढे जाऊन मी सांगतो आपल्या मिरा भाईंदर शहरात आपल्या विभागामध्ये भौगोलिक दृष्ट्या जिल्हाधिका-यांच्या जागा हेक्टरने आहे. त्या जागांवर जर आपण ट्रांझिस्ट कॅम्प केले व ती अशा लोकांना आपण ठराविक कालावधीकरिता ॲग्रीमेंट करून त्यांना दिले तर, असे होउ शकेल का? ते आपण बघा. आपल्याला स्पेशल वाटल्यास आपण वेगळा ठराव घ्या. काही जागांची मागणी करा. जिल्हाधिकारी त्याला नाही बोलतील असे मला वाटत नाही. त्याची अमाऊंट आपण त्यांना देऊ. आपल्याला ट्रांझिस्ट कॅम्प करणे गरजेचे आहे. शहरामध्ये जसजशी वस्ती वाढणार व दुसरी गोष्ट अशी की, मिरा रोडला टॉवर कललेला आहे. तो जर कोसळला तर दुस-या बिल्डिंगवर कोसळून तो रोडवर येणार. ही संस्था जर तुम्ही नेमली तर त्याला पहिले काम तुम्ही त्याचे द्यावे. त्याचा निकाल पहिला लावण्यात यावा.

**दिनेश नलावडे :-**

सभापती महोदय, आपण हा जो विषय आपल्याकडे आणलेला आहे त्याच्यामध्ये डिफरन्स काय? आपल्याकडे अशा काही इमारती आहेत त्या इमारतींना लाईट नाही, सेफ्टी टँक नाही, पाणी नाही. पण ह्या इमारती तुम्ही कशात पकडणार. त्याठिकाणी लोक राहतात. तिथे घाण आहे. उघडयावर सांडपाण्याची विधी होते. मग तुम्ही अशा बिल्डिंग धोकादायक इमारतीमध्ये घेणार काय? आम्ही याबाबत आपल्याकडे पत्र दिले आहे.

**याकुब कुरेशी :-**

नलावडे साहेब, हा विषय सभेत नाही. आपण सभापतींना ह्या विषयावर विषयपत्रिकेवर विषय घ्यायला लावा. व आपण त्यावर व्यवस्थित चर्चा करू या.

**मा. सभापती :-**

रस्ता आणि उड्डाण पुलाकरिता जे सभासद नेमले आहे. त्याच्यावर समितीचे अध्यक्ष मॉरस रॉड्रीक्स व सदस्य याकुब कुरेशी, धनराज अग्रवाल, अनंत पाटील, अशोक पाटील, मिलन म्हात्रे व चंद्रकांत वैती हे राहतील. व आपण मला चांगले सहकार्य कराल अशी मी आशा बाळगतो.

**प्रकरण क्र. १७१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील धोकादायक इमारती ठरविणक कामी शासकीय अभियांत्रिकी संस्थेची नेमणूक करणे व खर्चास मंजूरी देणे.

**ठराव क्र. १५२ :-**

imara¹Baa[-Mdr mahanagarpailaka h_It ekUNa 34 Qaaokadayak [maartI Aahot. sadr Qaaokadayak [maartIpOkI 06 [maartIbaabat nyaayaalayaat davao sau$ Aahot. varIla p`maaNao sava- [maartIbaabat mahanagarpailakocyaa baaMQakama ivaBaagaamaaf-t p`aqaimak phaNaI k$na p`qamadSa-naI Qaaokadayak vaaTlyaanao Qaaokadayak zrvaUna naaoTIsaa bajaaivalaaolyaa Aahot. [maartI Qaaokadayak jaahIr kravayaacao Asalyaasa %yaakrIta taMi~k dRYTyaa inarIxaNa va Non-Distructive Testing GaoNao AavaSyak Aaho. sadrcaI kamao SaasakIya AiBayaaMi~kI saMsqaomaaf-t krNyaat yaotat. mahanagarpailakonao Aajapya-t ASaap`karo kaya-vaahI k$na Qaaokadayak [maartI zrivaNyaabaabat kaya-vaahI na kolyaanao maa. nyaayaalayaamaQyao mahanagarpailakocaI taMi~k baajaU maaMDta yaot naahI. maa. nyaayaalaya SaasakIya AiBayaaMi~kI saMsqaaÀmahaivadyaalaya yaaMcyaakDIla tpasaNaI k$na p`maaNap~ saadr kolyaasa to ga`ahya QarIt Asato.

mahanagarpailakonao mahanagarpailakosa javaL Asalaolyaa sardar pTola ka^laoja Aa^f [MijainaArIMga yaa SaasakIya AiBayaaMi~kI mahaivadyaalayaaSaI saMpk-saaQaUna p~ vyavahar kolaa Asata %yaaMnaI mahanagarpailakocyaa AavaSyaktonaUsaar ASaa [maartIcaI phaNaI k$na du$stI krNao Sa@ya Aaho ikMvaa naahI ³Qaaokadayak´ yaa p`karo tpasaNaI krNyaakrIta KalaIla p`maaNao dranao kama krNaar Aahot.

1. [maart ³tL † daona majalao´ $. 21¸000À¹
2. [maart ³tL † caar majalao´ $. 33¸000À¹
3. [maart ³tL † saat majalao´ $. 50¸000À¹
4. p`vaasaBa<aa BaoT (Visit) $. 1¸500À¹

varIla p`maaNao [maartIcaI phaNaI k$na AavaSyak %yaa taMi~k baabatIkrIta caacaNaI Gao}na p`yaaogaSaaLot ivaivaQa namaUnao tpasaUna sadr saMsqaa mahanagarpailakosa Ahvaala saadr krNaar Aahot. trI sardar pTola ka^laoja Aa^f [MijainaArIMga yaa saMsqaomaaf-t mahanagarpailaka h_It Asalaolyaa sava- Qaaokadayak [maartIMcaI phaNaI k$na Ahvaala GaoNao va yaapuZIla sauQda Qaaokadayak vaaTNaa¹yaa sava- [maartIMcaI phaNaI k$na Gao}na Ahvaala doNaosa sadr saMsqaokDUna maatIcao namaunao tpasaUna rsto iDJaa[-na k$na GaoNaosa va sadr kamaI varIla p`maaNao dranao haoNaarI doyako Aagaa} r@kma p`dana krNaosa hI saBaa maMjaurI dot Aaho.

सुचक :- श्री. रिटा शाह. अनुमोदन :- श्री. चंद्रकांत वैती.

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-

**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी ठिक २.३० वा.**

**सभापती**
**स्थायी समिती,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगर सचिव,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**